पुणे मराठी ग्रंथालय
42 नाटक
क्रमांक— १६५
016477

# संत तुकाराम

## संगीत नाटक.



पुणे मराठी ग्रंथालय
व. क्रमांक नाटक १६५
अनुक्रमांक ३३००

प्रकाशक

बाबाजी दौलतराव राणे.

श्रीविठ्ठलप्रसन्न

# संत तुकाराम

## संगीत नाटक.


संपादक व प्रकाशक.

बाबाजी दौलतराव राणे,

मालक, राजापुरकर नाटक मंडळी.



आवृत्ती १ ली.] [५००० प्रती.

हें पुस्तक घर नंबर ४३४, ठाकुरद्वाररोड—मुंबई, येथें इंदुविजय कंपनीच्या "इंदुप्रकाश" छापखान्यांत मालकांकरितां रा० रा० दामोदर सांवळाराम यंदे, यांनीं छापिलें; व रा० रा० बाबाजी दौलतराव राणे मालक, राजापुरकर नाटक मंडळी, यांनीं मुंबई येथें प्रसिद्ध केलें.

सन १९१२.

किंमत १० आणे

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या ॲक्टाप्रमाणें रजिस्टर करून रंगभूमीवर प्रयोग करणें, पुस्तक छापणें, विक्री करणें, भाषांतर करणें, फेरफार करणें वगैरे सर्व प्रकारचे हक्क बाबाजी दौलतराव राणे, यांनीं आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

नाट्यकलेचा उपयोग करावा तसा होतो, असें आजपर्यंतच्या इतिहासावरून व्यक्त होतें. पौराणिक कथानकांचा किंवा ऐतिहासिक प्रसंगाचा आधार घेऊन नाटकें व कादंबऱ्या रचून जनांचें मनोरंजन करण्याची व त्याबरोबरच त्या प्रसंगाविषयींचें महत्व जनाचित्तावर ठसविण्याची अप्रतिम कला मोठमोठ्या अभियुक्त नाट्याचार्यांनीं व कादंबरीकारांनीं प्रगट केल्याकारणानें आजमित्तीला एतद्विषयक उत्तम वाङ्मय अस्तित्वांत आलें आहे. ह्या परिपाठास अनुसरून आपल्या महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या कित्येक साधुसंतांच्या उपलब्ध असलेल्या जीवनवृत्तांच्या आधारावर नाटकरचना करून लोकरंजनाबरोबरच त्या त्या संतांविषयींचें प्रेम व आदरबुद्धि वृद्धिंगत करावी, व जनचित्ताची प्रवृत्ति सन्मार्गाकडे होईल असें करावें. हा माझा आज पुष्कळ दिवसांचा संकल्प असून तदनुसार भगवद्भक्त शिरोमणी पुंडलीक व दामाजी ह्या साधुद्वयांच्या चरित्रांच्या आधारावर नाट्यरचना करवून त्या नाटकांचें स्वरूप जनचित्ताकर्षक होईल असा प्रेमपुरःसर परिश्रम मी केला. त्यांत मला चांगलें यश आलें; व अशा प्रकारचीं नाटकें भावीक व धर्मशील गुणग्राहकांला आवडतात असें माझ्या प्रत्ययास आलें. म्हणून मला आणखी एका महासाधूंच्या जीवनवृत्ताच्या आधारावर नाट्यरचना करण्याचें उत्तेजन आलें; आणि साधुवर्य तुकारामबावा यांच्या प्रसिद्ध झालेल्या गद्यपद्यात्मक चरित्राच्या आधारानें हें प्रस्तुत नाटक रचिलें आहे.

या नाटकांत जागजागीं आलेले अभंग व अभंगांचे चरण तुकारामबुवांचे मूळचेच आहेत. प्रसंगाला अनुरूप वाटल्यामुळें कांहीं पदें जुन्या प्रासादीक कवींचीं घेतलीं आहेत व कांहीं पदें रा० दत्तात्रय विष्णू तिनईकर यांजकडून योग्य तो मोबदला देऊन करवून घेतलीं आहेत. त्याचप्रमाणें या नाटकांतील कांहीं भाषणें रा० **शंकर विनायक वढावकर** यांस योग्य वेतन देऊन त्यांजकडून तयार करवून घेतलीं आहेत.

ह्या कृतीची हस्तलिखित प्रत व प्रवेशादिकांची व्यवस्था अवलोकन करून माझे मित्र **श्रीयुत कृष्णाजी अर्जुन केळुसकर, श्रीयुत रामराव बाळकृष्ण कीर्तिकर, श्रीयुत धोंडिबा पांडुजी बनकर, श्रीयुत यशवंतराव तानाजी माणगांवकर** व **श्रीयुत अनंत वामन बर्वे** यांनीं अनेक सूचना केल्या. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. ह्या माझ्या सगळ्या मित्रांच्या साहाय्यानें ही कृति मी रसिक जनांस समर्पण करीत आहें. तिचा ते यथोचित आदर करून आपल्या देशांतल्या पुण्यप्रताप साधुशिरोमणीविषयींचें आपलें प्रेम व भाक्ति हीं व्यक्त करितील अशी पूर्ण उमेद आहे.

तसेंच माझे मित्र **श्रीयुत दामोदर सांवळाराम यंदे** यांनीं व इतर सद्गृहस्थांनीं ही कृति छापून तयार करून प्रसिद्ध करण्याच्या कामीं मला मनःपूर्वक सहाय्य केल्याबद्दल मी त्यांचाहि अत्यंत आभारी आहें.

मुंबई, ता० ५ माहे जुलै सन १९१२.

रसिकजन कृपाभिलाषी,

**बाबाजी दौलतराव राणे.**

मालक, राजापूरकर नाटक मंडळी.

॥ श्रीविठ्ठल प्रसन्न. ॥

# संत तुकाराम संगीत नाटक.

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ... 
दा. नों. 3300

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला—( स्थळ–तुकारामाचें घर. )

( तुकाराम मुलांसह भजन करीत आहे. )

तुकाराम— पद—( मलिन वस्त्र परिधान, )

प्रभातकाळीं उठोनि सकळीं वनमाळी गावा ॥
सद्भावें पद-कमलीं संतत आश्रय मागावा ॥
राम कृष्ण हरि विठ्ठल केशव घेउनियां नांवा ॥
ब्रह्मानंदीं मग्न होउनी प्रत्यय जाणावा ॥
नश्वर हा संसार असा निज आत्मा बोधावा ॥
परमार्थीं मन जडवुनि शाश्वत मोक्षचि साधावा ॥
प्रेमळ छंदें आळवुनी प्रभु हळुहळु वळवावा ॥
सगुणें निर्गुण जाणुनि आत्मस्वरुपीं मिळवावा ॥

पद—( चिरिया चोंच, )

हरिचा छंद घेउं । हरिनामिं रत होउं ॥
सांवळी सगुण भावुं । हरिमूर्ति ध्याऊं ॥
गोविंद–हरि–राम । मुनि–जन–मन–विराम ॥
मिळवुं चित्सुखधाम । आराम पावूं ॥
जन्मुनि सफल काज । व्हाया त्यजुनि लाज ॥
श्रीकृष्ण गुरुराज । पदकमल सेवूं ॥

( शेणपोतेरं करीत असलेली जिजाई संतापून येते. )

**जिजाई**—( एकेकाला झोडपते, ते पळतात. ) हात् तुमचीं टाळकीं फुटलीं तीं; निघा इथून. मेल्यांनीं टाळ कुटून कुटून माझं नी साऱ्या जगाचं डोकं उठवलं आहे. घालूं का टाळक्यांत हें मडकं ?

**तुकाराम**—नको. तें तुझ्याकरतांच ठेव. आह्मी खात्रीनं सांगतों कीं, आमच्या डोक्याशीं मडकं फोडून चोंच मारायची वेळ आह्मी येऊंच देणार नाहीं. तूं आपल्या स्वतः करितां मात्र तें मडकं संभाळून ठेव. पांडुरंग ! पांडुरंग ! ( मुलें तसाच गजर करतात. )

**जिजाई**—( संतापून मुलांस मारते ) आईग, या मेल्यांना मारून मारून माझा हात दुखवला, पण या कोडग्यांनां त्याचं कांहींच नाहीं.

**तुकाराम**—नसायचंच. आह्मी हरिभक्त वज्रदेही आहोंत, तेव्हां आमचं लवमात्र वांकडं न होतां, उलट तुझ्याच हाताला इजा व्हायची.

**जिजाई**—पुरे पुरे तें हरिभक्तांचं वर्णन. तुम्हीं नवरे पडलांत म्हणून, नाहीं तर टाळकुटेबुवा, त्या मुसळानं तुमचं सुद्धां टाळकं शेकलं असतं; नी मग बघितलं असतं, वज्रदेह्याचं टाळकं फुटतं कीं, माझ्या मंगळाईच्या रानांतल्या लांकडाचं मुसळ फुटतं ?

**तुकाराम**—छेः तुझ्या त्या फुसक्या मंगळाई-बहिरोबासारख्या देवतांचा क्षोभ होऊन, आकाश जरी कडकडून पडलं, तरी आम्ही हरिभक्त-हरीचे दास नुसतं 'हूं' कीं 'चूं' देखील करणार नाहीं.

**जिजाई**—कोडगेच तुम्ही. कशाला 'हूं' कीं 'चूं' कराल ? तुम्ही मुळीं लाजच कोळून प्यालां आहांत. अहो, लोकं तुम्हाला इतकीं नांवं ठेवतात, शिव्या देतात, मारतात सुद्धां,-पण त्याची तुम्हाला थोडी तरी आहे का खंत ?

**महादेव**—अग आई, खंत नाहीं म्हणून तर बाबा संत !

**जिजाई**—मसणांत गेले ते संत. सगळे मेले माझा अंत पाहायला बसले आहेत. लांकडांच्या माळांचं गळ्यांत लोढणं अडकवलं, टिळे-मुद्रा करून गोपिचंदनाचा फडशा उडवला, टाळ कुटून कुटून भांडीं महाग केलीं, म्हणजे झाले वाटतं संत ?

**तुकाराम**—चाललंच आहे.—

**अभंग**—( हीनदीन जात मेरी, )

**एका हातीं टाळ एका हातीं चिपळीया ॥**
**नाचती नाना छंदीं वाजविती टाळिया ॥**

**जिजाई**-पुरे पुरे तें! (तसेंच वेडावीत.) एका हातीं टाळ नी एकीं हातीं भोपळा । आणखी भीक मागायला सगळा गांव मोकळा ॥ रांडेच्यांनो, या मेल्या उनाड संतांना, कष्टानं मिळवायला नको, पण गिळायला मात्र इतकं-इतकं-हवं. बायकापोरांना संभाळायला नको, पण कामापुरत्या माम्या मात्र हव्यात. ( तुकाराम हंसतो, ती वेडावते ) ह्यॅ ह्यॅ ह्यॅ ह्यॅ ! दांत विचकून हंसायला काय झालं ? पटली वाटतं अंतर्यामीं ओळख ?

**तुकाराम**—ती केव्हांच पटली आहे. या जगांत आमच्या कोण-कोणाशीं आणि कसकशा गांठी पडणार, हें आम्ही जन्म घेतला, तेव्हांच ओळखून ठेवलं आहे. जगाच्या उत्पत्तीपासून आह्मी आहोंतच; आणि म्हणूनच आम्ही अभंग, आमचा देह अभंग, आत्मा अभंग, वाणी अभंग, सर्वस्व अभंगच अभंग !

**काशी**—ते अभंग राहिले चोपडींत, पण भुकेनं आमचीं पोटं दुभंगताहेत, त्याची काय वाट ?

**जिजाई**—त्याची वाट ही अशी. ( तिला धक्का मारते. )

**महादेव**—आई-आई, ती वाट नव्हे, काशीची पाठ आहे पाठ.

**जिजाई**—तर मग मेल्या, तुझीच आधीं घेतें गांठ. ( त्याला मारायला जाते, तो पळतो, ती पाठीमागं जाते, इतक्यांत मंबाजी शिष्यांसह येतो. )

**मंबाजी**— **पद**—( कोइ कछु कहोरी, )

**भज नरा सतत बजरंगा रे ॥ भज० ॥**
**जय जय हनुमान् स्मरतां बलवान् ।**
**यमहि शिवेना अंगा रे ॥ भज० ॥**

**कां भलभलते स्मरसि देव ते ।**
**न धरि तयांच्या संगा रे ॥ भज० ॥**
**मंबाजी गुरु महंत सांगे ।**
**सुलभ मार्ग भवभंगा रे ॥ भज० ॥**

—आहाऽलख !

**जिजाई**—(प्रवेश करून) आले मेले कफल्लकाच्या घरीं अहलख ! बाई बाई बाई ! या मेल्या भोंदूंनीं तर अलीकडे अगदीं ताळच सोडला.

**महादेव**—अग आई, हे भोंदू नव्हत, इथले प्रसिद्ध साधु, मंबाजी आहेत—

**जिजाई**—अरे, मंबाजी असो, नाहींतर बंबाजी असो. मला काय त्या मेल्याची भाजी करायची आहे ? कांरे भिकारडयांनो, जातां मुकाट्यानं कीं झोडपूं एकेकाला या सोट्यानं ?

**तुकाराम**—(तिला आंवरून) हं–हं. अशी पिसाळलेल्या कुत्री-प्रमाणं वाटेल त्याच्या अंगावर धांवतेस याला काय म्हणावं ? आपल्या घरीं जें कांहीं असेल, तें द्यावं आणि साधु-संतांना संतुष्ट करावं.—

**अभंग.**

**संत हेचि देवमूर्ति । तुका म्हणे सांगूं किती ॥**

**जिजाई**—आलं का पुनः "तुका म्हणे" ! मग जिजाई तरी कां न म्हणे ?—

**"जिजाई म्हणे संत लुच्चे । त्यांचे घ्यावे गालगुच्चे ॥"**

—दळायला बसल्यें म्हणजे मला देखील किती तरी कवनं सुचतात ! पण मला कुठं आहे तुमच्यासारखा असा रिकामटेकडा चळ !

**तुका०**—या बोवासाहेब. (पायां पडून) आपल्याला काय पाहिजे ?

**जिजाई**—त्याला माती, दगड, शेण, चिखल पाहिजे. तें तरी आहे कां तुमच्या घरांत ?

(तुकाराम ओंजळभर पीठ मंबाजीला वाढूं लागतो, तोंच जिजाई रागानं तें पीठ मंबाजीच्या तोंडावर उडवते.)

**मंबाजी**—( तोंडावरचं पीट झाडीत रागानं ) चल, दूर हो—साधुत्वाचं ढोंग करणाऱ्या दुष्टा, नष्टा, खष्टा, पापिष्टा,—

**जिजाई**—( त्याच्या अंगावर धांवून ) तुझा बाप दुष्ट, नष्ट, खष्ट, पापिष्ट.

**मंबाजी**—( स्वगत ) ही याची अवदसा जिथं तिथं आम्हाला नडते. रांड मरत पण नाहीं.

**जिजाई**—कांरे ए मेल्या, साधु म्हणवतोस, नी रागानं कशालारे तणतणतोस ? मग तुझ्यापेक्षां हे आमचे धोंडोबा बरे. कुणाच्या अंगावर कुत्र्याप्रमाणं वसू वसू करून तरी जात नाहींत. खरंच, तर मग आमच्या या खुळ्याच्या अंगींच खरं साधुपण आहे. मी वेडी—उगीच त्यांना रोज वेडंवांकडं बोलतें.

**तुका०**—बुवामहाराजांनां राग कां आला ? माझ्याकडून अपराध घडला असल्यास क्षमा करा. ( पाय धरतो. )

**मंबाजी**—(लाथेनं झिटकारून) चल दूर हो, पापी चांडाळा—-

**जिजाई**—मेल्या बोकडा, तुझ्या पायाला किडे कां नाहीं पडले ? माझ्या नवऱ्याला लाथ मारतोस ? थांब, तुझे पायच मोडून टाकतें ( धांवून अंगावर जाते, तुकाराम अडवितो. ) आग लागो या शांत स्वभावाला ! या मस्त टोणग्यानं लाथ मारली, तरी तुम्हाला राग येत नाहीं ?

**तुकाराम**—रागच काय पण आह्मी सगळेच विकार धुवून, अंतर्बाह्य निर्मळ झालों आहों. अग, सत्पुरुषांच्या पायाच्या स्पर्शानंच आमचा उद्धार होतो. **आले संत पाय ठेविती मस्तकीं । इहीं उभय लोकीं धन्य झालों ॥** बुवासाहेब, आह्मांला क्षमा करा.

**मंबाजी**—आतां क्षमा ? लुचा, तूं हलकट, वाणगट, कुणबट असून, तूं कवनं करतोस ? वेदांचे अर्थ मराठींत आणतोस ? गुलामा, वेद आह्मां ब्राह्मणांचे ! आह्मी वेदोनारायण ! आह्मीच वेदशास्त्रसंपन्न ! कवनशक्तीही आमचीच ! ' जें न देखे रवि तें पहाणारे आह्मी कवि ! ' आह्मी कवीश्वर, कविराजराजेश्वर ! आणि तूं मूर्खेश्वर ? तूं कवनं करतोस ?

**जिजाई**—करूं जा, त्यांत तुझ्या बापाचं काय गेलं ? कवनं करायचा मक्ता तुला एकट्यालाच कोणत्या गाढवानं दिला आहेरे ? अं ? ( वेडावून ) म्हणे ' यंव करूं नको नी टयंव करूं नको ' कराहो तुह्मी आपलीं कवनं. खुशाल करा. वाटेल तितकीं करा. मी सुद्धां तुह्माला मदत करीन.

**तुका०**—बुवासाहेब, माझी पामराची योग्यता ती काय ? पण—

**अभंग.**

**बोलिलों जैसें बोलविलें देवें ।**
**माझें तुम्हां ठावें जाति-कुळ ॥**

**मंबाजी**—म्हणूनच म्हणतों कीं, तुझं जाति-कुळ हलकं असून तुला कोणत्या देवें बोलविलें रे ? कोणता देव तुझ्याशीं बोलतो ?

**तुका०— वाचेचा चालक झाला दावी वर्म ।**
**उचित ते धर्म पांडुरंग ॥**

**मंबाजी**—कांय ? तुझ्या ' वाचेचा चालक ' तो पांड्या झाला ? आन् वेदाचे अर्थ मराठींत आण असं त्यानं तुला सांगितलं ?

**तुका०**—महाराज,—

**ॐतत्सदितिसूत्राचें सार ।**

**मंबाजी**—अरे अरे अरे ! ओ३म् ? गुलामा, ॐकराचं नांव घेतोस ? ओ३म् हें आम्ही ब्राह्मणांनींच म्हणायचं.

**जिजाई**—ओंब नाहीं, पण बोंब मारायचं मात्र असेल.

**तुका०— कृष्ण विष्णु हरि गोविंद गोपाळ ।**

**मंबाजी**—चुप-पुन्हां देवाचं नांव ?

**तुका०— मार्ग हा प्रांजळ वैकुंठींचा ॥**

**मंबाजी**—पण तो मार्ग तुम्हा कुणबटांचा नाहीं.

**तुका०— सकळांसी येथें आहे अधिकार ।**

**मंबाजी**—नाहीं नाहीं. आम्हां ब्राह्मणांच्या सेवेवांचून तुम्हां शूद्रांना कसलाहि अधिकार नाहीं.

**तुका०**— **कलियुगीं उद्धार हरिनामें ।।**

**मंबाजी**—निर्लज्जा, माझ्या समक्ष कवनं करतोस? मी कोण आहें?

**जिजाई**—भीकमाग्या आहेस.

**मंबाजी**—हरामखोरा, यापुढं धर्मबाह्य मार्गाचा उच्चार करशील, तर तुझी जीभच कापून टाकीन.

**जिजाई**—मी तुझं नाकच कापून टाकीन.

**तुका०**— **तुका म्हणे—**

**मंबाजी**—'तुका म्हणे'? कोण रे हा रांडलेक तुका?

**जिजाई**—मेल्या, हा तुझा बाप नव्हे का? नी मी तुझी आई बरं का.

**मंबाजी**—चोरा, या मंबाजीबुवा महाराजाप्रमाणं तूंहि आपलं नांव कवनांत घालतोस? ठीक आहे. तुला चवदावं रत्नच दाखवलं पाहिजे.

**तुका०**— **तुका ह्मणे आह्मां भय काय करी? ॥**

**मंबाजी**—काय करी? अस्सा ठेंचून टाकीन.

**तुका०**— **आमुचा कैवारी पांडुरंग ॥**

**मंबाजी**—पहातों कीं आतां-तो पांडुरंग तुझा कैवारी कसा होतो तो? (शिष्यांस) धरारे या ढोंग्याला. बांधा गुलामाच्या मुसक्या, आणि घेऊन चला पाटलाकडे.

**जिजाई**—आणखी माझे हात कांहीं केळीं खायला गेले नाहींत. मीच तुम्हां सगळ्यांच्या मुसक्या बांधत्यें नी पाटलाच्या बापाकडे घेऊन जात्यें. म्हाद्या, अग रांडे काशे, तिकडचं एखादं चऱ्हाट, नाहीं तर दावं आण. थांब. नाहीं तर मीच आणत्यें. (आंत जाते.)

**तुका०**—(ती गेल्यावर.)—

**तुका ह्मणे सत्य-कर्मा व्हावें साह्य ।**
**घातलीया भय नर्का जाणें ॥**

**मंबाजी**—अरे चांडाळा, रांडलेका, दुरात्म्या, पाप्या. आम्ही जातीनं श्रेष्ठ, कृतीनं सुष्ट, आचरणानं वरिष्ठ,-इतकंच नव्हे,-तर 'शापादपि शरादपि' हा अधिकार आम्हां ब्राह्मणांचा असतां,

नीचा, ढोंग्या, कुणबटा, आम्हांलाच नर्कांची भीति घालतोस ? लुच्चा, या महाविरक्त, महातेजस्वी, महाप्रतापी, महापुरुषाचा–या श्रीमंबाजी बुवा महाराजांचा–प्रताप तुला ठाऊक नाहीं ? बजरंगाच्या कृपा-प्रसादानं तुला शापून भस्म करीन आणि रौरव नर्कांप्रत पोंचवीन. ठीक आहे, ( शिष्यांस ) चलारे. बापहो—

**मंबाजी—** पद—( हाहारे संतो संत, )

**बोला हो बोला मारुति अंजनि-बाला ॥**
**नातरि बसेल अंतीं झोला ॥ बोला० ॥**
**चुकवी तोच मृत्युचा घाला ॥**
**चकवी घोर थोर कलिकाला ॥**
**सुखवी देउनि आत्मसुखाला ॥**
**ऐशा बजरंगीं रंगुनि डोला ॥ बोला० ॥**
**सेवक सुग्रीवाचा झाला ॥**
**स्कंधीं वाहियलें रामाला ॥**
**पार्थासाठीं स्तंभीं बसला ॥**
**ऐसा उदार अंतर भोला ॥ बोला० ॥**
**हसेल तो नर फसेल त्याच्या बसेल माथा टोला ॥**
**फोल म्हणुं नका डोलत ऐका –बा–जी**
**कविच्या बोला ॥ बोला० ॥**

( सर्व जातात, जिजाई येते. )

**जिजाई—**कुठं ? कुठं आहे तो मेला बोकेसंन्यासी ?

**तुका०—**अग–अग, हें काय करतेस ? अंगांत वारं आलं कीं काय ?

**महा०—**आजोबांकडची मंगळाई अंगांत आली असेल.

**जिजाई—**हानू तुझं मढं गेलं, मेल्या पळपुट्या. पळालास म्हणूनच वांचलास.

**तुका०—**छेः छेः छेः छेः असं करूं नये.—

**संतांसी क्षोभवी कोण्याहि प्रकारें ।**
**त्याचें नव्हे बरें उभय लोकीं ॥**
**देवाचा तो वैरी शत्रु दावेदार ।**

**जिजाई**—( वेडावून) नी तुम्ही माझे दावेदार.

**तुका०-पृथिवीही थार नेदी तया ॥**

**रामकृष्ण हरि! रामकृष्ण हरि!! रामकृष्ण हरि!!!**

**जिजाई**—तो हरि बसलाहे आपल्या घरीं, पण आतां पोटाला हवी आहे भाकरी, त्याचा विचार कोण करी!

**तुका०**—काय बेटं,-वितीएवढं पोट, पण तेंच भरायची सर्व ठिकाणीं खोट. महादेवा, चल. आपण वैकुंठीं जाऊन त्या पांडुरंगालाच मुळीं या पोटाची सोय विचारूं. चल जाऊं.

**जिजाई**—( अडवून ) कुठं जाऊं? म्हणे, जाऊं! **बसा इथं.** माझ्या मंगळसूत्राचे धनी व्हायच्या पूर्वीं, बायका-पोरांचं पोट भरायला कां नाहीं शिकलां? थांबा, खांबाशीं बांधून ठेवून, मीच तुम्हाला इथं वैकुंठ दाखवत्यें.

**तुका०**—अयम् विशेषः! पांडुरंगाची मर्जी!

**जिजाई**—पांडुरंग्याची कशाला; माझी मर्जी.

**तुका०**—बरं, तुझी मर्जी. तूं तरी पांडुरंग-स्वरूपींच आहेस.

**जिजाई**—माझं खेटर आहे, त्या पांड्याचं स्वरूप. मी माझ्या मंगळाईचं रूप आहें. तीच तर माझ्या नवसाला पावते. तिला एखादं संकट घालायची खोटी कीं, आलीच धांवून.

**महादेव**—हो. मुसळ घेऊन!--

**मंगळाई माउली-ग माय माझी मुसळ घेऊन धांवली।**

**जिजाई**—( त्याला धपके मारून ).--

**नि-मेल्या, तुझ्या बोकांडीं येऊन बैसली ॥**

**महादेव**--( पाठ चोळीत नाचत. )--

**ही माय माझ्या बोकांडीं येऊन बैसली ॥**

**जिजाई**--( तडफडून ) आतां किनाई माझा जीव मला नकोसा झाला आहे. वाटतं कीं, सगळ्यावर पाणी सोडावं.

तुका०--वः तें तर सर्वांत उत्तम. आम्ही पण तेंच सांगतों कीं, सर्वस्वावर पाणी सोड आणि वैकुंठीं चल. ( जाऊं लागतो. )

जिजाई—अगबाई ! हे खरंच चालले ! ए मेल्या म्हाद्या, ए रांडे काशे, धांवा धांवा लवकर. तो तुमचा बाप पळून चालला ना ? धरा, आडवा, ठेवा बांधून त्याला ( तुकारामाला परत आणतात. )

तुका०—अरे ! अरे ! ! अरे ! ! ! देवा पंढरीनाथा, या भयंकर मायापाशांतून अजून कां सोडवीत नाहींस ?—

पद—( कास घालोनि बळकट, )

**अगा हे सांवळया सगुणा ॥ गुणनिधि नाम नारायणा ॥**
**वसुदेव-देवकीनंदना ॥ बाळ रांगणा बाळकृष्णा ॥**
**नाहीं सुख कांहीं संसारीं ॥ राहूं सांग कैसा हरी ॥**
**अवघ्या नाशिवंतापरी ॥ राहशी दूर विठ्ठला ॥**

( जाऊं लागतो. )

जिजाई--अगबाई ! आतां काय करूं या कर्माला ? पुन्हा हे डोक्यांत राख घालून निघून गेले, तर घरांत एकटी भूतासारखी कशी राहूं नी शोधायला तरी कुठं जाऊं ? ( उघड ) म्हटलं, आतां मी रागावत नाहीं. कांहीं मागत नाहीं. संसारखर्च काटकसरीनं मी चालवत्यें. पण आपण घरांतून जाऊं नये.

तुका०—छेः छेः आतां घर पाहिजे कुणाला ?—

**विठ्ठल गाईन विठ्ठल पाहीन। पायींच राहीन विठ्ठलाचे ।।**

जिजाई—पण माझं-माझं ह्मणणं तरी ऐकून घ्या.

तुका०—आजपर्यंत पुष्कळ ऐकलं. आतां—

**विठ्ठलावांचोनी आणिक ते वाणी ।**
**नायकें मी कानीं आपुलीया ॥**

मुलें--बाबा, आह्मां मुलांकडे तरी पहाहो.

तुका०--पुष्कळ पाहिलं; पण आतां--

**विठ्ठल पाहीन मस्तक वाहीन ।**
**श्रीनाम घेईन विठ्ठलाचें ॥**

**जिजाई**--मीही त्या विठ्ठलाचं नांव घेतें, पण--(गयावया करून) आतां इथून आपण जाऊं नये.

**तुका०**--पांडुरंग !--

**तुका म्हणे आह्मी विठ्ठलाचे दास ।**
**येथें रहायास योग्य न हों ॥**

**जिजाई**—( तडफडून ) आपल्या सोन्यासारख्या बायका-मुलांची दया येत नाहीं, असला कसला हा निर्दय बाप ?

**तुका०**—अग, तें पूर्वींच होऊन गेलं.--

**बाप मेला न कळतां । नव्हती संसाराची चिंता ॥**

**जिजाई**--तेव्हां नसेल, चिंता, पण आतां ?

**तुका०**--आतां काय ?—

**विठो, तुझें माझें-राज्य । नाहीं दुसऱ्याचें काज ॥**

**जिजाई**--दुसऱ्याचं नसोच काज, पण आपल्या बायकोची तरी लाज !

**तुका०**--वाहवा !—

**बाईल मेली मुक्त झाली । देवें माया सोडविली ॥**

**जिजाई**--तुह्मी मुलीं माझी मरायचीच वाट पहातां आहां! पण या पोरांची काय वाट ?

**तुका०-पोरें मेलीं बरें झालें । देवें मायाविरहित केलें ॥**

**जिजाई**--आतां काय करूं यांच्या तोंडाला ? माझ्या अंगाचा नुसता भडका होतो, हें ऐकून. कसं झालं तरी मी त्यांची आई आहेना!

**तुका०-आई मेली मज देखतां । तुका म्हणे हरली चिंता ॥**

**जिजाई**--आतां किनई तुमच्या पायांशीं डोकं फोडून जीव द्यायची मला वेळ आणलीत. आतां पुढं मी काय म्हणत्यें, तें तरी ऐका.

**तुका०**--ऐकायच्या वेळेला पुष्कळ ऐकलं. आतां आणखी काय ऐकूं ?

**जिजाई**--असं ऐकायला सांगत्यें कीं, मी माझ्या माहेराहून एक दोन-तीन-चार विसा रुपये आणले आहेत, ते घेऊन त्याच्यावर कांहीं व्यापार-धंदा तरी करा म्हणत्यें.

**तुका०**--होय का ? मग हें पहिल्यानंच सांगायचं कीं नाहीं ! बायकांना अक्कल नसते म्हणतात, तें हेंच. अग, आधीं भांडवल द्यायचं, आणि मग पुढं बोलायचं. आण पाहूं ते रुपये. ( ती आंत जाते. ) देव तरी मोठा विलक्षणच आहे. नसते मायामोहाचे पाश उगाच आमच्या घरीं पाठवतो ! ( जिजाई रुपयांची पुरचुंडी घेऊन येते. ) काय ? आणलेस रुपये ? दे पाहूं माझ्याजवळ.

**जिजाई**--थांबा अगोदर, पण हे रुपये घेऊन यांचं काय कराल ?

**तुका०**--दुसरं काय करायचं ? आपलं सर्व तऱ्हेनं कल्याण होईल, असा व्यापार करायचा !

**जिजाई**--जळ्ळे तुमचे व्यापार ! मागं एकदां इथं घाटावर मीठ विकत घेतलंत नी तें कोंकणांत नेऊन विकलंत. बरं, कोंकणांतून कांदे विकत आणलेत, नी ते इथं घाटावर विकलेत. हा कसला मेला उलटा व्यापार !

**तुका०**--त्यावेळीं थेट घसरलंच खरं. पण आतां काय करूं, तें तूंच सांग.

**जिजाई**--( विचार करून ) हो. बरी आठवण झाली. हल्लीं आपल्या देहू गांवीं मिर्च्या स्वस्त आहेत, त्याच विकत घेऊन त्यावर कांहीं कमाई करा.

**तुका०**--पण मिर्च्यांचा व्यापार मोठा तिखट, कदाचित् तो तुझ्या डोळ्यांना पाणी आणील.

**जिजाई**-कांहीं आणीत नाहीं. तुम्हीं नीट जपून करा म्हणजे झालं. हे घ्या रुपये. मी इंद्रायणीवर जाऊनं पाणी आणत्यें. ( जाते. )

**तुका०**--( ती गेलीसें पाहून ) चला. एक अवदसा गेली, आतां ही दुसरी अवदसा-( पैशाकडे पाहून ) कशी जाईल, याचा विचार केला पाहिजे. ( पाहून ) अरे ! पण हे आमचे ब्रह्मवीर

आलेच कीं. ( कांहीं ब्राह्मण येतात. ) या, वेदोनारायण, आपल्याला काय पाहिजे ?

**ब्राह्मण**—बाबारे, आम्हांला कांहीं धर्म पाहिजे, पण तूं तर भिकारी दिसतोस ?

**तुका०**—मी तर भिकारीच आहें, पण सध्यां माझ्याजवळ हें आहे, तें तर घ्या; आणि आमच्या पांडुरंगाची भरपाई करा बरं का ! ( रुपये वांटतो. )

**ब्राह्मण**—हो. हो. या कलियुगांत आम्हां ब्राह्मणांच्या रूपानंच देव वास्तव्य करतो आहे.

**तुका०**—सत्य आहे. लुटा तर मग आमचं घरही लुटा. हं चला. आटपा. आमची ती कैदाशीण येण्याच्या अगोदर गाडग्या मडक्यां-सुद्धां सगळं घेऊन जा. ( ब्राह्मण घर लुटतात ).

**महादेव**—बाबा रुपये वांटून टाकलेत, घर लुटीवलंत, आतां आई काय म्हणेल ?

**तुका०**—ती काय वाटेल तें म्हणूं दे, पण तूं आपलं हें म्हण.—

पद—( धरि मना सतत, )

**हरि तुझ्याविण न कुणि वाली रे ।**
**संकटकालीं या भवजालीं ॥ हरि० ॥**
**विभव अवकळा कवटाळिण ही ।**
**वळवित ख्यालिखुशालीं ॥**
**परि लवकर तव अनुभव दावुनि ।**
**सोडिव रे वनमाली ॥ हरि० ॥**
**तुका तुजकडे बघे यावया ।**
**ओढित परि ही खालीं ॥**
**तव करुणाकर देउनि घे वर ।**
**विठाबाई माऊली ॥ हरि० ॥**

## प्रवेश दुसरा—( स्थळ—बजरंग-मठ. )

( मंबाजीचे शिष्य भजन करीत आहेत. )

**शिष्य—** **पद**—( मोरे मन भाई, )

**बजरंग पैया ॥ भजो मेरे भैया ॥**
**बडा समिंदर पार उतरकर सितामाइ मिल जाय ॥**
**रावनसुखकू आग लगाकर लंकाभी पार जलाया ॥**
**इंद्रजितकी सकति लगे तब लछमनजी गिर जाय ॥**
**एक पलखमें द्रोनागिरकू लाया उन्होकु उठाया ॥**
**भगतराज सिरताज बडा है मंबाजी कविराय ॥**
**उन संतनकू भोग चढावे ओहि अमरसुख पाया ॥**

**मंबाजी**—( प्रवेश करून रागानं ) बस्स. पुरें करा तें भजन. यावेळीं भजन बिजन कुछ नहीं होना. माझा मानभंग !

**तुंबाजी**—काय ? तुमचा मानभंग ? या तुंबाजीबुवांचे गुरु मंबाजी बुवा-यांचा मानभंग ! तर मग भजन बंद ! आरती बंद ! नैवेद्य बंद ! हा मारुती सुद्धां आतां जखडबंद !

**मंबाजी**—मूर्खच आहेस !

**तुंबाजी**—( दुसऱ्या शिष्यास ) मूर्खच आहेस !

**मंबाजी**—चला, सर्व इथून चालते व्हा. बाहेर जाऊन बसा, आणि माझ्या ध्यानाचा भंग करणारं कुणी आलं, तर त्याला आंत सोडूं नका.

**तुंबाजी**—( इतर शिष्यांस उद्देशून तेच शब्द बोलतो ) पण गुरुजी, तुमच्या जिव्हाळ्याचं,–हं–म्हणजे तसंच कुणी फक्कड माणूस आलं तर ?

**मंबाजी**—( डोळे फाडून ) अरे, प्रत्यक्ष आमचे वडील आले, तरी आंत सोडूं नकोस. मी आतां ध्यानस्थ होतों.

**तुंबाजी**—(एकीकडे) कायमचे स्वस्थच व्हानां ! ( इतर शिष्यांस बोलून ) चलारे गुलामांनो, गुरुजींना एकांत करूं द्या.

**मंबाजी**—हरामखोरा ! मारुतीजवळ कसलारे एकांत ?

**तुंबाजी**—( स्वगत ) तें मारुतीला ठाऊक कीं मला ठाऊक. ( तेच शब्द इतर शिष्यांजवळ उच्चारून ) मूर्ख कुठले, चला बाहेर. ( जातात ).

**मंबाजी**--( स्वतःशीं ) हरामखोर तुक्या ! कवनं करतो !—पण करीना ? माझ्या बापानं तरी कधीं कवनं केलीं आहेत ? आणखी तो चोर वेदांचे अर्थ मराठींत आणतो ! आणीना ?—त्यांत माझ्या आजोबाचं काय वेंचतं ? वेदाच्या नांवापलीकडे, त्यांत मला तरी काय कळतं ! पण तो गुलाम कुणबट साधु बनला आहे, साधु ! आणखी तेंच तर मला बाधूं लागलं आहे. तरी म्हटलं आतांशा माझा धंदा मंदावत कां चालला ?—तर जो मूर्ख उठतो तो त्या तुक्याच्या पायां पडतो, त्याच्यां भजनीं लागतो, त्याला नजराणा पाठवतो, पण म्हणावं लुच्या, ज्याचं त्याला आणि गाढव ओझ्याला. ( डोळे मिटून बसतो. )

**रंभा**—( प्रवेश करून ) गुरुजी, अहो गुरुजी, ही बघा तुमची रंभा आली आहे रंभा.

**तुंबाजी**--( तिला अडवून ) अग चल. तूं रंभा ऐस, नाहीं तर प्रत्यक्ष जगदंबा ऐस. मी कांहीं तुला आंत सोडणार नाहीं.

**मंबाजी**--काय मूर्ख आहे पहा. गाढव हिला कशाला आडवतो ? ( मोठ्यानं ) जय बलभीम ! जय हनुमान ! जय बजरंग ! ! !

**रंभा**—गुरुजी,—अहो गुरुजी, हा पहा—मेला लठ्या कसं कसं करतो आहे तो.

**मंबाजी**—तो कसं कसं करतो आहे, तें मलाहि दिसतं आहे, पण मी ध्यानस्थ बसतों, असं त्याला सांगून चुकलों आहें ना. (मोठ्यानं) जय बलभीम ! भक्तांकरतां तुझं नेहमीं मुक्तद्वार असतं !

**रंभा**--( तुंबाजीस ) ऐकलंस ?—ऐकलंस मेल्या ! मारुतीचं नेहमीं मुक्तद्वार असतं.

**तुंबाजी**—अग, मारुतीचं मुक्तद्वार असेल; पण आमच्या गुरुजींच्या द्वाराला केव्हां केव्हां अडसर घालून ठेवावा लागतो मला.

**मंबाजी**--( स्वतःशीं ) काय करूं रे! यावेळीं मला इतका संताप आला आहे कीं, या हरामखोराचं नरडंच दाबून प्राण घ्यावा. ( उठल्यासारखं करून ) अरे! पण मी ध्यानस्थ बसलों आहें. ( मोठ्यानं ) जय बजरंग! तुझ्या भक्तांना आडवणं, हें मोठं पाप आहे!

**रंभा**—( तुंबाजीस ) ऐक, मेल्या, कान फोडून ऐक. माझ्या-सारख्या भक्तिणीला अडवणं, हें मोठं पाप आहे, असं प्रत्यक्ष गुरुजीच ओरडून सांगताहेत.

**तुंबाजी**—होय. पण ते तुला नाहीं सांगत. आमचे गुरुजी समाधिस्थ होऊन, मारुतीच्या रंगमहालांत गेले आहेत, तिथं त्यांना रामानं अडवलं, म्हणून ते शंखध्वनि करताहेत.

**मंबाजी**—( हात-पाय रागानं आपटून, स्वतःशीं ) अरे अरे अरे! संतापानं माझ्या अंगाचा या वेळीं नुसता भडका होत आहे. त्या भडक्यात या पाजीची होळी करून जाळून टाकावं, असं वाटतं. ( ज़रा उठून ) पण मी ध्यानस्थ बसण्याचं निमित्त केलं आहें. छेः आतां नाहीं माझ्यानं रहावत. करावंच झालं आतां आपलं ध्यान-विसर्जन. ( उघड ) जय हनुमान्! कोण आहे बाहेर?

**तुंबाजी**—( जवळ येऊन ) काय आज्ञा गुरुजी?

**मंबाजी**—( स्वगत ) देवाज्ञा आहे तुला! ( उघड ) चोरा, मोठ-मोठ्यानं ओरडून माझ्या ध्यानाचा भंग केलास? देऊं आतां शाप?

**तुंबाजी**—(स्वगत) खुशाल द्या. कावळ्याच्या शापानं गुरं थोडींच मरतात? ( उघड ) पण गुरुजी, मीं काय केलं? तुमच्या ध्यानाचा खरोखर भंग करणारी ती रांड—

**मंबाजी**—( संतापून ) काय? रांड?

**तुंबाजी**—तसं नव्हे. तुमची आवडती शिष्या रंभा.—

**मंबाजी**—रंभा? मग शुंभा, अशा नाजुक भक्तांना अडवूं नये, हें कसं कळलं नाहीं तुला?

**तुंबाजी**—पण आपल्या बापालाहि आंत सोडूं नको, असं तुम्हीच सांगितलंत. मग आईला तरी कशी आंत सोडूं आपल्या ?

**मंबाजी**—फाजिलपणा पुरेकर. नंदीबैल कुठचा !

**तुंबाजी**—( स्वगत ) याच पशुपति पुढचा !

**मंबाजी**—जा, दे तिला आंत सोडून, आनू तूं बाहेर ऐस. आतां मात्र कोणालाहि सोडूं नकोस आंत.

**तुंबाजी**—कां गुरुजी, इतका आज बंदोबस्त !

**मंबाजी**—रंभेला उपदेश द्यायचा आहे.

**तुंबाजी**—आज अनुग्रह होण्याची पाळी आहे वाटतं ! तिची पुण्याई फळलीशी दिसते. पण गुरुजी, तुमच्या एकांतांत मारुतीचं शेपूट आड येईल तें !

**मंबाजी**—मूर्ख आहेस. आज बजरंगाचाच कांहीं साक्षात्कार रंभेला व्हायचा आहे !

**तुंबाजी**—तर मग इतकीं युगं ब्रह्मचारी असलेला बजरंग मंबाजी बोवांच्या संसर्गानं रंगलाल बनणार तर ! भक्ताच्या आधीन देवता, म्हणतात त्या अशाच कीं काय कोण जाणें ! ( उघड ) अहो रंभाबाई, जा, आंत जा. तुम्हाला मारुती बोलावतो आहे.

**रंभा**—मेल्या ! मारुती रे मला कशाला बोलावील ?

**तुंबाजी**--आज प्रत्यक्ष त्याच्याकडून तुमचा स्वीकार-नव्हे त्याचा तुम्हाला साक्षात्कार-होणार आहे म्हणे. गुरुजी सांगतात.

**रंभा**—अगबाई, मग माझं नशीबच उघडेलं म्हणायचं.

**तुंबाजी**—नशीब म्हण किंवा स्वर्गसुखाचं द्वार म्हण, कांहीं तरी उघडेल खरं. तें पहा उघडलं, शिर आंत. ( स्वगत ) आज गुरुजींची उपदेशक्रिया जरा आडून पाहिली पाहिजे. ( लपून बसतो ).

**मंबाजी**—( रंभा मारुतीचं दर्शन घेऊन येईपर्यंत, स्वगत ) हा बेटा तुंबाजी, फारच मस्त झाला आहे; पण त्याच्याशिवाय आमचं चालत नाहीं. आमची अंदरकी सब बात वो जाने, असं झालं

आहे, तेव्हां सध्यां त्याला संभाळूनच घेतलं पाहिजे. ( रंभा येऊन पायां पडते. ) या तुम्ही रंभाजी. काय सांगूं रंभे, आतांच तूं माझ्या ध्यानांत आली होतीस.

**रंभा**—म्हणजे ? ध्यान माझं चाललं होतं कीं, मारुतीचं ?

**मंबाजी**—नाहीं. ध्यान चाललं होतं मारुतीचंच, पण तिथं तुझ्याशीं माझा संबंध होताच.

**तुंबाजी**—( स्वगत ) हो. मारुतीला साक्ष ठेवून.

**रंभा**—गुरुजी, मोठ्यानं तरी बोलूं नका. कुणीं ऐकलं, तर तोंडांत शेण घालतील.

**तुंबाजी**—( स्वगत ) अंः त्यांत काय ? गुरुजी तेंहि खातील, आन् पुनः आपले झक मारायला असे तयार राहतीलच !

**मंबाजी**—तुम्हां प्राकृत जनांचं घसरतं, तें इथंच. तुमच्या सारख्यांशीं लौकिकी व्यवहार करण्यांत आम्ही थोडे रंगेल दिसलों, तरी ध्यान-धारणेंत आम्ही तितकेच वैराग्यशील असतों. रंभे,–तुझं माझ्यामागं नेहेमीं टुमणं असतं कीं, मला मारुतीची भेट करवा, मला मारुतीचं दर्शन करवा, तेव्हां त्याच संबंधांत मारुतीरायाशीं माझं खलबत चाललं होतं, समजलीस ?

**रंभा**—मग तुम्ही मोठमोठ्यानं बोलत होतां, तें कुणाशीं ?

**मंबाजी**—अग, प्रत्यक्ष मारुतिरायाशीं. रंभे, तूं मोठी भाग्यवान्, मोठी पुण्यवान्, म्हणूनच–आमच्या सहवासानं कां होईना–तुला आज आमचा आणि मारुतिरायाचा संवाद ऐकायला मिळाला–म्हणूनच आम्ही तुम्हां लोकांना सांगत असतों कीं, लाडक्यांनो,—

**मंबाजी गुरु म्हणे साधुसंग करा ।**
**होईल सोयरा तिन्ही लोकीं ॥**

**तुंबाजी**—( त्याच सुरांत. ) **होईल सोयरा न्याया नरकीं** ॥ जेहेत्ते, नरकीं न्यायला बरं का ।

**रंभा**— खरं ?

**मंबाजी**—अगदीं खरंच खरं.

**रंभा**—तर मग गडे, मला मारुतीचं दर्शन करवाच. म्हणजे मारुतीराय मला भेटून माझ्याशीं बोलतील तरी.

**मंबाजी**—थांब. मी मारुतीरायाला पुन्हां विचारतों, म्हणजे तुझ्या-माझ्यांत चूक व्हायला नको. तूं जरा दूर हो, आणि डोळे मिटून उभी रहा.

**तुंबाजी**—( स्वगत ) बरोबर, असल्या भोंदु गुरुच्या माकडचेष्टा उघड्या डोळयांनीं पाहून उपयोगच नाहीं. भक्तांची डोळेझांकच यांच्या कामाची !

**मंबाजी**—( अंगांत वारं आल्यासारखं करितो ) ठीक आहे; आपली आज्ञा रंभेला कळवतो. ( पूर्वस्थितीवर येऊन ) ऐक-लंसना रंभे, आमचे मारुतीराय काय म्हणाले तें ?

**रंभा**—( आश्चर्यानं ) अं ? मारुति कधीं काय म्हणाला ? तुम्हींच तर कायसंसं बडबडलां.

**तुंबाजी**—( एकीकडे ) म्हणजेच मारुति कोकलला. या कलि-युगांत असलेच चिनशेपटीचे मारुति राहिले आहेत.

**मंबाजी**—रास्त आहे. देवाची वाणी आणि तुम्हां पाप्यांच्या येऊं नये कानीं. असंच आहे तें. बरं, रंभे, तुला तो तुक्या माहीत असेलच ?

**रंभा**—तुक्या ? तुक्या कोण ? तुकाराम महाराज कीं काय ?

**मंबाजी**—अग मसणांत गेला तो महाराज ! चंगी-भंगी-ढोंगी कुठला ! आमचे बलभीम म्हणाले,–तूं मूळची स्वर्गस्थ रंभा, तुझ्या हातून शुकाचा तपोभंग झाला नाहीं म्हणून इंद्र-शापानं तुला मृत्यु-लोकीं जन्म घ्यावा लागला.

**रंभा**—( जरा खुशालून ) अस्सं ! अगबाई ! पण मला कांहीं कुठं आठवत नाहीं तें !

**मंबाजी**—रास्त आहे. इंद्र-शापानं तुला पूर्वजन्मींचं स्मरण नाहीं. प्रिये रंभे, मीहि पूर्वी चित्ररथ गंधर्व असून, तुझा कैवार

घेतल्यामुळं मलाहि हा मनुष्यजन्म घ्यावा लागला, आणि म्हणूनच आपला उभयतांचा योग इथं जमून आला. तेव्हां तुला पुन्हां स्वर्गलोकीं जायचं असेल, इंद्राचं वैभव भोगायचं असेल, आम्हां गंधर्वांच्या मांडीवर लोळायचं असेल, तर लाडके, तूं या जन्मीं त्या तुक्याचं ढोंग बाहेर काढलं पाहिजेस.

**रंभा**—पण गुरुजी, तुकाराम महाराज ढोंग करीत नाहींत, असं म्हणतात.

**मंबाजी**—( जरा रागानं) हेंच तें ! आम्हां ईश्वरावतारी लोकांच्या शब्दांवर विश्वास न ठेवला, तर देवाचा कोप होईलच, पण आम्हां सत्पुरुषांचासुद्धां शाप मिळेल.

**तुंबाजी**—( एकीकडे ) हो, आणि या डोमकावळ्याच्या शापानं तूं या जन्मीं वेश्याच रहाशील, आणि म्हातारपणीं थेरडी होशील.

**रंभा**—पण गुरुजी, तुकाराम महाराजांवर बजरंगाचा इतका राग कां ?

**मंबाजी**—( रागानं ) पुन्हा तेंच. असं विचारणं अधिकाराबाहेरचं आहे. अग, साधुसंत होणं हा अधिकार आम्हां ब्राह्मणांचा.

**तुंबाजी**—( एकीकडे ) हो. यांच्या वाडवडिलांनीं साधु होण्याचा मक्ताच घेतला आहे जसा कांहीं !

**मंबाजी**—पण हा शूद्र तुक्या आमची सेवा-चाकरी सोडून साधु बनतो.—

**तुंबाजी**—( एकीकडे ) विठोबाला भजतो, नेहमीं एकादशी करतो, पंढरीला जातो, महत्पाप ! महत्पाप ! ! करतो. आणि यांचं हें केवढं पुण्यकृत्य चाललं आहे पहा !

**मंबाजी**—सारांश काय ?--तर मेनकेनं जसं विश्वामित्राचं कुत्रं केलं, त्याप्रमाणं-तूं स्वतःच्या उद्धाराकरतां,-त्या तुक्याचं गाढव करून,—

**तुंबाजी**—( एकीकडे ) गाढवावर गुरुजीला बसवून,—

**मंबाजी**—लक्षांत ठेव. सर्व जगभर धिंड काढ ! माझा बजरंग तुला सद्गति देईल !

**तुंबाजी**-(स्वगत) हो. एकदम शेंपटावर बसवून, स्वर्गाला पोंचवील!

**रंभा**--बरं तर, बघत्यें प्रयत्न करून.

**तुंबाजी**—( एकीकडे ) जपून करा, नाहीं तर तोंड वासून पडाल.

**रंभा**—जात्यें तर मग आतां गुरुजी.

**मंबाजी**—जातेस! (डोळे मिचकावून) अशीच जातेस! (विचार करून) बरं, जा तर मग. पण-पण आज बजरंगाची सेवा कांहींच झाली नाहीं. दिवसा नाहीं फावलं तर रात्रीं; पण सांगितल्या सेवेंत अंतर होऊं नये समजलीस. रात्रीं तरी आरतीच्या वेळीं ये.

**तुंबाजी**—(एकीकडे) म्हणजे जेहेत्ते शेजारतीच्या वेळीं, बरं का?

**मंबाजी**—जा आतां, तुला माझा पूर्ण आशीर्वाद आहे.

पद ( छांडो छांडोजी मोरे, )

**मंबा०—होई विजयी तूं रंभे शुभांगे। अनंग रंग ढंगें।**
**रंभा—प्रसाद परी मागें॥ मी सुमंगला.**
**मंबा०—रतिहुनि कुशला, परि गमत भय मला,**
**तुक्या फसविल तुजला,**
**रंभा—हरिन ढोंगें॥**
**मंबा०—होई विजयी०॥**
**रंभा—घ्या न संशया, गुरुवर सदया,**
**झणीं मळविन तुकया,**
**मंबा०—जनीं मिळविसि विजया,**
**रंभा—विषयरंगें॥**

(मंबाजी, रंभेला कुरवाळीत असतां मध्येंच तुंबाजी येतो. त्या-
लाच चुकून कुरवाळतो व खजील होऊन मनांतल्या
मनांत चडफडत उभा राहतो ).

**तुंबाजी**--गुरुजी, जेवण तयार आहे म्हणून कळवायला आलों होतों; पण तुम्हीं आपलं भलतंच करूं लागलांत.

मंबाजी--अरे, आग लागोरे त्या जेवणाला नी तुझ्या तोंडाला--

तुंबाजी--( स्वगत ) कां ? माझं तोंड खरखरीत लागलं.

मंबाजी—मी आज अजिबात उपाशीं राहून बजरंगाला संकट घालणार. जा. ती मारुतीपुढची मेवा-मिठाईची परडी माझ्यापुढं आण.

तुंबाजी--( मिठाईची परडी हातांत घेऊन ) पण गुरुजी, तुम्ही आज उपास करणार म्हणतां ना ?

मंबाजी--( रागानं ) अरे, मी उपासच करणार. पण बजरंगाला नैवेद्य दाखविला पाहिजेना ?

तुंबाजी—मग तुम्हाला तसदी कशाला ? मी नैवेद्य दाखवतों.

मंबाजी--गध्धा आहेस. तूं बाहेर जा. मारुतीचं उग्र स्वरूप तुला पाहवणार नाहीं. अरे बाबा, आज मारुती फार खवळणार आहे.

तुंबाजी—(मारुतीकडे पाहून स्वगत) हा मारुती खवळण्याचं लक्षण कांहीं दिसत नाहीं; पण बहुतकरून हा-( मंबाजीकडे बोट करून ) आमचा चिनशेपट्या मारुती खवळणार आणि मेवा-मिठाईचा फन्ना पाडणार. पाहूं बरं, कोणता मारुती खवळतो तो. (बाजूला उभा राहतो.)

मंबाजी –( नैवेद्य दाखवून ) जय बजरंग, जय बलभीम, बापा कृपा कर, ( पेढा खातो. )

तुंबाजी—( स्वगत. ) आणि खा पेढे भराभर!

मंबाजी—आज मी अगदीं निराहार उपास करणार; अन्न खाईन--( पेढा खातो. )

तुंबाजी—( स्वगत ) तर शेणखाईन म्हणावं.

मंबाजी—तुक्याची विशाद काय ? तुक्या म्हणजे कोण ?

तुंबाजी—मथुरेचा पेढाच ( मंबाजी भराभर पेढे खातो ) अरे बापरें, आज आमचे गुरुजी सबंध पेढे खाऊन सगळे हलवाई तोंडीं लावून उपास करणार कीं काय ?

( पंडितराव, हिरोजी. फर्जंद, दोन नोकर नजराण्यासह येतात. )

**पंडित०**—अहो, महाराज आंत आहेत का ?

**तुंबाजी**—महाराज ! कोणते महाराज ? अहो, हल्लीं आमच्या गांवांत महाराजांचं पेंव फुटलं आहे. देवळांत बसलेले बजरंग महाराज, स्वयंसिद्ध आमचे गुरु मंबाजी महाराज, त्यांचा पट्टशिष्य मी-तुंबाजी-महाराज, आतांच जे इथून गेले, ते रंभाजी महाराज वगैरे वगैरे बरेच महाराज आहेत, त्यांपैकीं तुम्हाला कोणते महाराज पाहिजेत ?

**पंडित०**--(एकीकडे हिरोजीस) चुकून या महाराजांकडे आलोंच आहों; तेव्हां यांची जरा परीक्षा पहावी. (तुंबाजीस) अहो, आह्मी तुमच्याच गुरुजींच्या दर्शनाकरतां आलों आहों ?

**तुंबाजी**—तर मग जरा उभे रहा. मी श्रींनां वर्दी पोंचवतों. (आंत जाऊन) गुरुवर्य, दर्शनाकरतां बाहेर भक्त आले आहेत.

**मंबाजी**—( रागावून ) झक मारतात ते भक्त, त्यांना सांग कीं बुवासाहेब ब्रह्मानंदीं तल्लीन झाले आहेत. असल्या चिन्मयावस्थेंत महाराजांचं दर्शन होत नाहीं. बुवांची समाधि लागली आहे म्हणावं.

**तुंबाजी**—का हाता-तोंडाची लढाई लागली आहे म्हणावं ? (उघड) अहो गुरुजी, त्यांनीं भला भक्कम नजराणा आणला आहे नजराणा !

**मंबाजी**—( संतापून ) मग पाजी मनुष्या, हें मला आधीं कां नाहीं सांगितलंस ? जा लवकर त्यांना आंत घेऊन ये. जय मारुति-राय ! जय बजरंग ! तुझ्या दरबारीं राव आणि रंक सारखेच ! ( ते येताहेतसें पाहून ) वास्तविक आम्ही निःसंग ! आम्हाला काय पर्वा आहे ? पण बजरंगा, तुझी आज्ञा, म्हणून या पापी जगांत दिवस काढायचे. ( ते पायां पडतात ) बजरंग तुमचं कल्याण करो. या बसा. अरे, यांना आसन दे. कसं काय ? कोण आपण ? कुठं असतां ? काय करतां ? कुठं जातां ? कुठं राहतां ? कशाला आलां ? जायचं कुठं ? काय काम आहे ? झटदिशीं बोला.

**तुंबाजी**—( स्वगत ) अबबबबब ! हें तोंड कीं तोफखाना ? या प्रश्नांची उत्तरं द्यायला, शतमुखी रावणाला बोलावलं पाहिजे.

**पंडित०**—आम्ही पुण्याकडे असतों. महाराजांची फार कीर्ति ऐकली, तेव्हां साहजिकच दर्शनाची उत्कंठा झाली.

**मंबाजी**—( फुशारून ) व्हायचीच, व्हायचीच ती. एकूण आम्ही नको नको म्हणत असतां, आमची कीर्ति पुणें प्रांतीं पसरली म्हणायची.

**पंडित०**—अहो, पुणें प्रांतींच काय !–पण तिकडे सोलापूर प्रांता-पर्यंत तुकाराममहाराजांच्या साधूपणाची कीर्ति जिकडे तिकडे पसरली आहे.

**मंबाजी**—( स्वगत ) अरे, आग लागोरे त्याच्या कीर्तीला आणि त्याच्या तोंडाला. ( उघड ) अहो दुसऱ्या एका वैराग्यशाली समर्थांची विमलकीर्ति तुमच्या कानीं अद्याप कशी गेली नाहीं.

**पंडित०**—नाहीं कां ? श्रीसमर्थ रामदास स्वामींची ख्याति चोहों-कडे ऐकूं येते.

**मंबाजी**—( स्वगत ) मेलारे तो लंगोट्या, अरेच्या, हे हरामखोर माझं मुळीं नांवसुद्धां घेत नाहींत. ( उघड ) कायहो, तुम्हीं जगांतल्या सर्व साधु-संतांची यादी ऐकवायला आलांत कीं कुणांच्या दर्शना-करितां आलांत ?

**पंडित०**–आम्ही तुकाराम महाराजांच्या दर्शनाकरितां आलों आहों.

**मंबाजी**—(संतापून) मूर्खांनो, त्या कुणबटाची या ब्राह्मण साधु-पुढं थोरवी गातां ! ( हातांत पाणी घेऊन ) बजरंगा, या सर्वांना—

**तुंबाजी**—( पंडितरावास ) हं हं हं हं । अहो, तुम्ही जाणून बुजून सापाच्या शेंपटीवर पाय देतां, याला म्हणावं काय ? अहो, जग प्रसिद्ध, जगमान्य, लोकप्रिय, महासिद्ध, महापुरुष, श्रीसमर्थ मंबाजी बुवा महाराज म्हणतात, ती हीच विभूति बरं ! रागानं शापवाणी उच्चारली नाहीं, तोंच पाय धरून शरण जा, नाहीं तर आतां कांहीं तुमची धडगत नाहीं.

**पंडित०**—खरं कीं काय ? वहावा ! हा पण अलभ्य लाभच झाला म्हणायचा. असल्या पराक्रमी मूर्तीचं सहज दर्शन झालं, हें आमचं

भाग्यच म्हणायचं. (मंबाजीस) महाराज, क्षमा करा. आपल्यासारख्यांना आम्ही तुकाराम महाराज समजलों, ही आमची चूक झाली.

**तुंबाजी**—( एकीकडे ) महाचूक झाली ! गारगोटीला हिरा समजणं म्हणजे काय ?

**मंबाजी**—बजरंगाच्या प्रेरणेनं लवकर उमजलां, हें ठीक झालं, नाहींतर मोठा अनर्थ गुजरला असता. आतां हें शापोदक मलाच पिऊन टाकलं पाहिजे. जमिनीवर टाकीन तर तितकीच जमीन जळून जाईल. ( पितो. ) अहो, आम्ही हनुमान् भक्त मोठे जाज्वल्य असतों.–पण आपली स्तुति आपण करा कशाला ! अग्नीच्या तापाहून माझा संताप अधिक आहे.–पण आपली थोरवी आपणच गा कशाला ? मी विश्वामित्रासारखा मोठा तपोनिष्ठ उग्र ब्राह्मण आहें.–पण आपलं महत्त्व आपणच सांगा कशाला ?

**तुंबाजी**—( स्वगत ) आणि यांच्यासारखे लुच्चे, सोदे, पाजी, हेच आहेत. पण आपोआपच तें उघड होत आहे, मग आपण तरी तें मुद्दाम उघड बोला कशाला !

**पंडित**०—बरं,महाराजांनीं या अल्प नजराण्याचा स्वीकार करावा.

**मंबाजी**—कशाला–कशाला ? बजरंगाच्या कृपेनं आम्हाला कांहीं कमती नाहीं. रिद्धिसिद्धि हात जोडून उभ्या आहेत. आतां तुमच्या मनाचा विरस होऊं नये, म्हणून मी–ही–भेट–घे–तों. ( घेतो. )

**पंडित**०—पण ही भेट शिवाजी महाराजांनीं पाठिवली आहे.

**मंबाजी**—काय म्हणतां ? वहावा ! शिवाजीमहाराजांची आम्हां साधु-संतांच्या चरणावर फार भक्ति आहे, हें पाहून मनाला मोठा संतोष होतो. बरं, शिवाजीराजांना आमचा एवढा निरोप कळवा कीं, सवडींत सवड करून एकदां बजरंगाच्या दर्शनाला या म्हणावं. हें मोठं जागृत देवस्थान आहे म्हणावं. आजच्या या देणगीनं बजरंग मोठा संतुष्ट झाला आहे म्हणावं. आणखी म्हणावं, तो आपली गदा घेऊन,–तुमच्या मागं धांवतोच आहे म्हणावं.

**तुंबाजी**—(स्वगत) गरुजींच्या टाळक्यांत घालतो आहे म्हणावं.

**मंबाजी**—बजरंगाच्या ठिकाणीं निष्ठा ठेवा म्हणावं. त्यांना आमचे अनेक आशीर्वाद आहेत म्हणावं. काय समजलां ?

**पंडित०**—(स्वगत) काय समजायचं, तें सारं समजलों. (उघड) बरं, येतों आतां आम्ही.

**मंबाजी**—ठीक आहे. या. जपून जा बरं. या धामधुमीच्या काळांत प्रवास करणं मोठं धोक्याचं झालं आहे. माझा बजरंग पाहून घेईल त्यांना. (तुंबाजीस) अरे, प्रसादादाखल यांना थोडा निर्माल्य दे.

**तुंबाजी**—(स्वगत) थोडा कां ? चांगला टोपलीभर देतों. म्हणजे कचरा काढायचा माझा त्रास तरी चुकेल. ( निर्माल्य देतो. )

**पंडित०**—बरं, आज्ञा असावी. ( जरा चालून ) अरे, बदमाष हरामखोरा, तुझं तकलादी साधुपण लवकरच बाहेर काढतों. (जातात.(

**तुंबाजी**—( पुढं होऊन जवाहिराचं ताट उचलून ) गुरुजी, हा पोषाख आणि हें जवाहीर, बजरंगाला चढवूं का ?

**मंबाजी**—( हिसकावून घेऊन, तें भराभर अंगावर चढवीत ) मूर्ख आहेस, बजरंगाला रे हें काय करायचं आहे ! बोलून चालून तो ब्रह्मचारी !

**तुंबाजी**—मग, गुरुजी, तुम्ही नाहीं का–ब्रह्मचारी ?

**मंबाजी**—( वरमून ) मी ब्रह्मचारीचरे, पण-पण-त्यांत असं आहे–(गुटमळून) म्हणजे आम्ही राजयोगी आहोंत. आम्हाला फकिरी आणखी अमिरी सारखीच. बरं, तूं बाहेर जा, नाहीं तर कुणी तरी एकदम आंत येईल. ( तो कुरकुरत जातो. ) लोक तरी किती मूर्ख ! ते मला खरोखरीचाच साधु समजतात. वास्तविक पाहुं गेलं, तर इतर धंद्याप्रमाणं, साधुपणा हा एक पैसे कमविण्याचा धंदा आहे. विन भांडवलावर, कनक आणि कांत यांची लयलूट करण्या-सारखा जर कोणता धंदा असेल, तर तो हा साधुपणा ! (इतर शिष्यां-सह तुंबाजी धांवत येतो. )

**तुंबाजी**—गुरुजी–गुरुजी, धांवा, पळा, लपा, दडा. गांवभर हत्यारबंद लोकांची गर्दी उडाली असून, त्यांनीं साधु, संत, बावा, बैरागी, यांचा शोध चालवला आहे.

**मंबाजी**—हा मूर्खा, मग त्यांना इकडे कां नाहीं आणलंस? त्यांच्या मनांतून आमची पूजा बांधायची असेलें.

**तुंबाजी**—(स्वगत) तुमची खेटरपूजा बांधायची आहे. (उघड) अहो गुरुजी, बावावैराग्यांना ते चाबकाखालीं झोडपताहेत.

**मंबाजी**—( घाबरून ) खरं कीं काय ?

**तुंबाजी**—नाक, कान कापून, गाढवावरूनें धिंड काढताहेत.

**मंबाजी**—( मटकन खालीं बसून ) अग आईग !

**तुंबाजी**—आंगभर डागण्या देताहेत.

**मंबाजी**—अरे बापरे !

**तुंबाजी**—तोंडांत घाण भरताहेत.

**मंबाजी**—शि ! शि !! शि !!! अरे देवारे ! पण कायरे, बाळ—

**तुंबाजी**—( स्वगत ) तुंब्याचा आतां बाळ झालों अं ?

**मंबाजी**—( घाबरत ) बाळ तुंबाजी, ते लोक हिंदु आहेत कीं, मुसलमान आहेत ?

**तुंबाजी**—(मंबाजीच्या दाढीला हात लावून) त्यांपैकीं कुणाचीच दाढी इतकी लांब नाहीं.

**मंबाजी**—तर मग तीं मुसलमानांचीं पोरं असतील. अरे पोरांना दाढी नसते.

**तुंबाजी**—'पोरांना दाढी नसते आणि बायकांना मिशी नसते,' हें मलाहि समजतें; पण गुरुजी, त्यांपैकीं कित्येकांच्या दाढीचे आंखूड खराटे झाले आहेत खराटे !

**मंबाजी**—अरे, पण आम्ही बावा वैराग्यांनीं, असं त्यांचं घोडं तरी काय मारलं ?

**तुंबाजी**—ते म्हणतात, हे बावा-बैरागी मोठे सोदे असतात. उपासाच्या निमित्तानं, चोरून पेढे, बरफी खातात, शिष्यीण म्हणवून तिला कुशींत घेतात, साधु म्हणवून, जवाहीर वापरतात,—

**मंबाजी**—(संतापून) मग जवाहीर वापरायला काय हरकत आहे ?

**तुंबाजी**—ती हरकत ठेवा बाजूला. पण सध्यां शेंडिची फारकत व्हायची वेळ आली आहे. ( पाहून व घाबरून ) अरे बापरे ! आलेच ते. ( मंबाजीला पुढें लोटून ) करा आतां त्यांना हरकत. मी आपला मारुतिच्या पाठिमागं लपतों. बजरंगा, संभाळरे बाप्पा ! नाहीं तर आमच्या बरोबर तुझीहि शेंडी जायची. ( लपून उभा राहतो. )

**मंबाजी**—अरे पण गाढवाच्या लेका, पुढं होऊन त्यांना सांग-कीं, हें हिंदूंचं पवित्र देवालय आहे. ( एकमेकांस पुढं लोटतात ) अरे बापरे ! आलेच ते. आतां कुठ पळावं ?

( पंडितराव, हिरोजी वगैरे मुसलमानी वेषांत येतात. )

**पंडित०**—अबे ए, पळून जानेकी बात छोड देव. वो है किधर, ये पहिले बताव. (धरतात व बताव, बताव म्हणून सर्व ओरडतात. )

**मंबाजी**—(कांपत) बतावतों हो ! पण क्या बताऊं तें तर सांगा !

**पंडित०**—अपनेकू जो बुवा महाराज कहलाता है, वो बुवा महाराज है किधर, ये बताव.

**मंबाजी**—हं. हं. तर मग हेच ते बुवा महाराज. ( तुंबाजीला दाखवतो. )

**तुंबाजी**--अरेच्या ! मी कधीं बुवा महाराज बनलों ! (पंडितरावांस) नाहीं हो. हेच आमचे गुरु मंबाजी बुवा महाराज. ( स्वगत ) लफंगे.

**मंबाजी**—( दांत-ओंठ खात ) गद्धया, माझं नांव कशाला सांगितलंस ?

**तुंबाजी**—( त्याचप्रमाणें ) मग, तुम्ही तरी मला कशाला दाखीवलंत ?

**पंडित०**--( गचांडी मारून ) अबे ए हरामखोर, तूं फकीर होके, ये जवाहिर कहांसे चोरी करके लाया ?

**मंबाजी**—( कांपत ) चो-चो-चोरी नव्हे हो. ही-ही-शि-शि-शिवाजी राजानं भे-भे-भेट पाठवली आहे.

**पंडित०**—अच्छा. तो वोहि शिवाजी हमकू बताव. ए बम्मन, घबराव मत. वो शिवाजी कौनसेबी तरकीबसे हमारे कब्जेमें देंगा, तो हमारे बादशहाके तरफसे इस्सेभी जियादा इनाम मिलेगा.

**मंबाजी**—(स्वगत धीरानें) अरे वः हें तर फायद्याचं कूळ आहे. मी उगाच घाबरलों–( उघड ) अहो, शिवाजीलाच काय–पण त्याच्या लोकांना सुद्धां मी पकडून देतों. म्हणजे तुमच्या बक्षिसाच्या आशेनं मी हें बोलतों, असं मात्र समजूं नका.

**पंडित०**—अच्छा. बक्षिस नहीं होना, तो हम देतेभी नहीं.

**मंबाजी**—( चमकून ) तसं नव्हे हो ! बक्षिस तुम्ही द्याच. मी तें इतक्याच करतां घेणार कीं, तुम्ही मुसलमान आमच्या देवळांत आल्यामुळं आमचं हें देऊळ विटाळलं.

**तुंबाजी**—( एकीकडे ) हो. आमचा मारुति बाटून मुसलमान झाला. इस्का नाम बडे मिया हनुमानखान.

**मंबाजी**—तेव्हां, या देवळाची आतां शांति केली पाहिजे. मला स्वतःला म्हणाल,–तर कांहीं नको. आमचा बजरंग, हेंच आमचं सगळं भांडवल.

**तुंबाजी**—( एकीकडे ) दलालसुद्धां तोच.

**पंडित०**—हां–हां. हम समज गये. ए बम्मन, पहिले ये तो लेव. ( जवाहिर देतो. ) पिछेसे तेरे बदन भर देयेंगे.

**मंबाजी**—व्हावा ! यांना म्हणतात दरबारी लोक. फारच दिलदार आहां बुवा. नाहींतर मघां आलेले ते शिवाजीचे रानटी लोक. खापरे चोर बेटे ! आणखी शिवाजी तर काय विचारतां !–चोरांचाच मायबाप ! शुद्ध अल्लड पोर, पक्का चोर, टवाळखोर, दरवडेखोर,–

**पंडित०**—( वेष टाकून ) चुप रहो हरामखोर ! बेरडा, आमची पाठ वळली नाहीं, तोंच असला बदमाषपणा करतांना, तुला तुझ्या ब्राह्मण जातीची, साधुपणाची, हिंदुत्वाचीसुद्धां लाज वाटली नाहीं ? थांब. तुझ्यासारखे वैराग्याचं सोंग आणणारे—

**हिरोजी**—वीतभर पोटाकरतां थापा देऊन, लोकांना लुबाडणारे–

**पंडित०**—उपदेशाच्या नांवानं, भोळ्याभाबड्या स्त्रियांनां फसवणारे––

**हिरोजी**––टिळे–मुद्रा करून, दुसऱ्यांच्या सुवर्णमुद्रा उपटणारे–

**पंडित०**—जे कोणी ढोंगी साधुसंत असतील, त्यांना आमचे शिवाजीमहाराज कसे ठेंचतात हेंच तुला आतां दाखवतों. बांधारे या मात्रागमनी दगलबाजाला, आणि घेऊन चला शिवाजी महाराजां-कडे. होऊं दे या पाजीचा कडेलोट.

**मंबाजी**—( घाबरून ) कडेलोट! अग आईग! बजरंगा, आतां तुझी काय वाट?

**तुंबाजी**—( स्वगत ) बजरंगाला मी संभाळीन.

**मंबाजी**—आतां मला कोण संभाळील?

**पंडित०**—तुला आतां तोरणागडाखालचीं गिधाडं संभाळतील.

**मंबाजी**—अग आईग! बाळ तुंबाजी-

**तुंबाजी**—(स्वगत) जा गुरुजी, आतां इकडची सोडा काळजी!

**मंबाजी**—आतां आमच्या मठाचं कसं होईल?

**तुंबाजी**—( स्वगत ) मठाधिपति मी होईन.

**मंबाजी**—आणि बजरंगाला नैवेद्य-कोण दाखवील?

**तुंबाजी**—( स्वगत ) तें सगळं कांहीं मीच करीन आणि मघाचे उरलेले पेढेहि खाईन.

**मंबाजी**—पंडितराव, मला क्षमा करा. तुम्ही गोब्राह्मण प्रति-पालक शिवाजी राजांचे सरदार आहांत. तुम्ही ब्राह्मण आहां, मीहि ब्राह्मण आहें, निदान ब्राह्मणांनीं तरी ब्राह्मणाचा जीव घेऊं नये. मी चुकलों, झक मारली, शेणखाल्लं, पण कृपा करून आतां मला जिवदान द्या. मी शरण आहें. ( पाया पडतो. )

**पंडित०**—आतां गुलामाला कसं ब्रह्मज्ञान आठवूं लागलं आहे पहा. अहो मंबाजीबुवा, तुह्मी ब्राह्मण आहां आणि गयावया करून आमचे पाय धरतां आहां, म्हणूनच या वेळीं मी तुम्हाला जिवदान देतों. पण मी काय सांगतों, तें नीट लक्षांत ठेवा. अहो, साधु, देव आणि धर्म यांच्या नांवावर लोकांना लुबाडणं, म्हणजे भयंकर पातकं करणं होय. तुह्मी भाविक लोकांना खड्ड्यांत पाडण्याकरतां, या लोकीं खड्डा खणता आहां, पण यमलोकीं तुमच्या करतां नर्ककुंडाचं नवीन बांधकाम चालू आहे, याचा तुम्ही कधीं विचार केला आहे काय?

अरे ढोंगी मनुष्या, आतां तरी सावध हो आणि पश्चात्ताप करून, हे बेढंग सोड, सन्मार्गानं वाग. त्यांतच तुझं इहपरलोकीं कल्याण आहे. ( घरोबरच्या लोकांस ) अरे, ह्या सोडून या चांडाळाला, आणि सर्व चीजवस्त घेऊन चला इथून. पातक्याचा अल्प सहवाससुद्धां पातकीच बनवील ! ( दिलेलं जडजवाहीर, पोषाक वगैरे सर्व हिसकावून घेऊन जातात. )

**मंबाजी**—( त्याच्या पाठीमागून रागानं धावत ) लुच्चे, पाजी, हरामखोर, लोकरच गेलात म्हणूनच सुटलात, नाहीं तर माझ्या तपोतेजानं तुम्हांला शापून भस्म करून टाकलं असतं.

**तुंबाजी**—(स्वगत) मग हें तुमचं तपोतेज मघा कुठं शेण खायला गेलं होत ?

**मंबाजी**—(स्वगत) असो, चला. जिवावरचं जवाहिरावरच गेलं. थोडी अब्रुही गेली;–पण अब्रू म्हणजे काय ? अब्रूच ती ! मानली तर गाडीभर, नाहीं तर काडीभर ! ( शिष्यांस ) चलारे, ए हरामखोरांनो, बजरंगावरचं संकट टळल्याबद्दल, थोडं भजन करूं या.

**तुंबाजी**—आणि माराच्या धाकानं वांईट झालेलं तोंड हा प्रसाद खाऊन जरा गोडहि करु या !

**मंबाजी**— पद—( महाविर जिनवर, )

**वज्ररंगा भवभयहारी । झणिं धांव संकट वारी ॥**
**प्रिय दासा या तव प्रभुजी । नच दुजा कुणी कैवारी ॥**
**निज भक्त सखा तूं असुनी। छळिती आम्हां रिपु भारी॥**
**तव प्रबल गदा करिं धरुनी । झडकरी अरि संहारी ॥**
**करि तळमळ गुरु मंबाजी । हो तया सदा सुखकारी ॥**

( मंबाजी व शिष्य आनंदानं नाचत जातात. )

---

## प्रवेश तिसरा—( स्थळ–तुकारामाचें घर. )

**जिजाई**—( डोक्यावर दगड घेऊन ) सोडा, सोडा, मला. त्या तुमच्या काळतोंडया पांडयाचं या दगडानं डोकं ठेचतें, नी त्याचीं पूडच करतें.

**तुकाराम**—अग पण-अग पण, चांडाळणी, माझ्या पांडुरंगानं तुझा अपराध तरी काय केला आहे ?

**जिजाई**—अपराध काय ? माझ्या बापाकडून आणलेले रुपये तुम्हांला मिर्च्यांचा व्यापार करायला दिले, ते त्या पांडयाचं रूप घेऊन आलेल्या भटुरग्यांच्या मढयावर घातलेत, घरांत होतं नव्हतं तेवढं सगळं लुटवून दिलंत. कां ? तर म्हणे त्या घर बुडव्याची भरपाई केली म्हणजे आपल्या घरांत सोन्या-चांदिची भरपाई होईल. म्हणून आज सकाळपासून आतांपर्यंत त्या लुच्चाची वाट पाहिली, पण मेला चोरटा एकदां तरी येऊन भेटायचा होता. आणि आपण काय माती खातो त्यांतला थोडा वाटा तरी धाडून द्यायचा होता ?

**तुका०**—मुद्दलांतच तोटा, मग नफ्याचा वाटा कुठून मिळणार ?

**भाव तैसें फळ । न चले देवापाशीं बळ ॥**
**तुका म्हणे केलें । मन पाहिजे चांगलें ॥**

**जिजाई**—'आजपर्यंत चांगलें केलें तेवढें पुरें झालें;' आतां त्या काळतोंडयाच्या नांवावर मी पुन्हां फसायची नाहीं बरं. मेल्यानं आमच्या हातांत दिली आहे झोळी नी आपण गिळतो आहे साखर-पोळी. फुटका मणि नाहीं आमच्या गळां नि या मेल्याची पहावी तर वैजयंती माळा !

**तुकाराम**—पण आपल्याला तरी त्यानं काय कमी केलं आहे ?

**विठ्ठल नामाचीं भूषणें । तुका म्हणे त्यालों लेणें ॥**

**जिजाई**—चुलींत गेलं तें लेणें नि तीं विठ्याचीं भूषणें. या गळ्यातल्या माळा चुलींत घातल्या तर एक वेळचा तरी सैंपाक होईल का ?

**तुकाराम**—तें पांडुरंग जाणें.

**जिजाई**—पांडया नाहीं मी जाणें. खबरदार त्या पांडयाची थोरवी पुन्हां पुन्हां माझ्यासमोर गाइलीत तर. त्या मेल्याचं नांव ऐकलं कीं माझ्या कपाळाला तिडिकच उठते.

**तुकाराम**—उठायचीच—

**सूकरासी विष्ठा माने सावकाश ॥**
**मिष्टान्नाची त्यास काय गोडी ॥**
**श्वानासी भोजन दिलें पंचामृत ॥**
**तरी त्याचें चित्त हाडावरी ॥**

**जिजाई**—त्या पांड्याच्या मढ्यावरी!

**तुकाराम**—अग चांडाळणी! जरा सरळ बोल. माझ्या पांडुरंगानं सर्व कांहीं दिलं आहे, देतो आहे आणि देईलही. पहा—

**खावें ल्यावें द्यावें ॥ जमाखर्च विठ्ठल नांवें ॥**

(पंडितराव व हिरोजी वगैरे येतात)

**जिजाई**—(वेडावून) 'विठ्ठल नांवें.' ठीक आहे, तर मग आधीं जातें नी त्या मेल्या विठ्याचा जमाखर्चच तपासतें. (जाऊं लागते, तोंच पंडितराव वगैरेस पाहून) अगबाई! हे कोण? कोण हो तुम्ही? आम्हां नवरा-बायकोचा प्रेमसंवाद चोरून ऐकणारे तुम्ही कोण टिक्कोजी मोरे? बोलता कीं नाहीं? नाहीं बोलत?-वाचा बसली? कलथा आणून दातखिळी उघडूं? (आंगावर धांवते.)

**तुकाराम**—अग पण-अग पण, जरा दमानं घे. पुरी विचारपूस न करतां वाटेल त्याच्या अंगावर गुरगुरतेस हें काय? याहो तुम्ही, अहो हरिभक्त, या बसा. तुम्ही फार दमून आलांत. तुमचे मी पाय रगडतों. तुमच्या पायांची धूळ माझ्या मस्तकावर पडूं द्या. अग, थोडंसं साखर-पाणी घेऊन ये—

**जिजाई**—साखर-पाणी नाहीं, पण चिखल-पाणी आणतें.

**तुकाराम**—माझ्या सौंगड्यांनां फार तहान लागली असेल?

**जिजाई**—सोस पडून तडफडून मरत कां नाहींत मेले.

**तुकाराम**—अरे! अरे!! अरे!!! संतसोयरे आपण होऊन माझ्या घरीं आले, पण मी हा असा अभागी. आतां यांची पूजा कोणत्या उपचारानं व्हावी?

**जिजाई**—चांभाराच्या देवाची खेटरानं पूजा करावी.

तुका०—पाय हृदयाशीं घट्ट धरूं ? कीं हा देह यांच्यावरून ओंवाळून टाकूं ? काय करूं ? ( विचार करीत घरांत जातो. )

जिजाई—एकेकाला चांगले झोडपा नी द्या हांकून. तुमच्यानं होत नसेल तर मला सांगा. येतांना कांहीं बरोबर आणायचं सोडलं, आणि आमचं सत्व न्यायला आमच्या घरीं आले कशाला मेले ? कायरे मेल्यांनो, आलांत तसे कोकलत जातां कीं हा दगड— ( दगड उचलूं लागते ).

पंडित०—हं. हं. मातोश्री, आतां दगड उचलण्याचे श्रम घेऊं नका.

जिजाई—घेऊं नका म्हणजे, मी घेईन. मेल्यांनो, आम्हां नवरा-बायकोत मधें लुडबुड करणारे तुम्ही रे कोण ? काय हो तोंडपुजे, कोण तुम्ही ? कुठून आलांत ? कशाला आलांत ? काय काम तुमचं ? काय नांव तुमचं ? कोणी पाठवलं किं आपणच आलांत ?

पंडित०—आम्हाला आमच्या राजेसाहेबांनीं पाठवलं आहे. माझं नांव पंडितराव.

जिजाई—काय पंढरिराव ! पंढरिचे राव म्हणतात ते तुम्हीच का ? तर मग आणारे मेल्यांनो, माझं त्रिभुवनाचं राज्य आणा, माझं सोन्याचं गांव आणा, माझं पंचपक्वान्नाचं ताट आणा, काय नाहीं ? अरे नाहीं तर नाहीं, पण आमचीं गाडगीं-मडकीं नाहींशीं केलीत, तीं तरी आणून द्या, म्हणजे झाडपाला तरी त्यांत उकडून खाऊं.

पंडित०—मातोश्री, आतां झाडपाल्याची कां इच्छा करता ? हीं घ्या पंचपक्वान्नांचीं ताटं. आमच्या शिवाजी महाराजांनीं, हे दागदागिने, शेले-शालू, जड-जवाहीर तुमच्यासाठींच पाठवलं आहे.

जिजाई—अगबाई, खरं किं काय ! तर मग उगिच ग बाई मीं यांना भलतं सलतं बोललें ! माझ्या जिभेला मुळिं हाडच नाहीं. ( जिभेला चिमटा घेऊन ) करशिल रांडे, करशिल पुन्हा बळवळ ? ( आनंदानं नजराणा उघडून पाहूं लागते. )

पंडित०—तसंच हें भरजरी छत्र, चौरि-अबदागीर, मशाल-दिवटी.

जिजाई—दिवटी ? आणि दिवटी पेटवायला तेल नाहीं का दिलं ?

**पंडित०**—सर्व कांहीं दिलं आहे. आपला योगक्षेम नीट चालावा म्हणून ही गाव-इनामिची सनद आणि हे पांच हजार होन रोकड दिले आहेत.

**जिजाई**—खरं किं काय? का त्या खुळ्या बरोबर मलाहि आपली खुळि बनवतां?

**पंडित०**—मातोश्री, हें सगळं खरं आहे.

**जिजाई**--(पाहून) अबबबबब! आतां यांतलं काय काय म्हणून घेऊं? कितीक घेऊं? हें घेऊं किं तें घेऊं? कुठं ठेऊं नि करुं तरी काय यांचं? बघूनच माझं पोट भरलं. हर्षवायूनं तें फुटेल देखील; बाळ म्हादेव, अग माझे काशे, कुठं मसणांत गेलीं कुणाला ठाऊक. छे बाई; या गोट-पाटल्या, नथ-बुगड्या, ठुशी-चंद्रहार, हे इतके दागिने घालायचे कुठं आणि कस कसे म्हणून? अग आईग! आतां मात्र मला वेड लागणार; मग हे दागिने कोण रांड घालणार? अरे ए मेल्या म्हाद्या, अग ए टवळे काशे, या-या-लौकर या; आणि माझ्या आनंदाचे थोडे थोडे वांटेकरि तरी व्हा. सगळाच आनंद मला एकटिला सोसवणार नाहीं. (पोरें येतात व नजराणा पाहून आनंदित होतात.)

**महादेव**—अरे बापरे! आई आई, कायग हें?

**काशी**—कुठून आणलंस?

**महादेव**—कुणिं दिलं?

**जिजाई**—कुणिं दिलं; माझ्या माहेरची मंगळाई प्रसन्न झाली, माझा खंडोबा पावला.

**महादेव**—तुझा खंडोबा पावला आणि बाबांचा पांडोबा नाहीं काग धांवला?

**जिजाई**—पांडोबा खाड्यांत गेला.

**महादेव**—तुझा खंडोबा खाड्यांत गेला.

**जिजाई**—अरे मेल्या. बरं, इकडे या मला एवढं उचलूं लागा, आणि काय जाईल तेवढं तुम्हीहि न्या; चला उचला. (वस्त्रालंकार उचलूं लागतात, तोंच तुकाराम येऊन तें सर्व हिसकावून घेतो.)

**तुकाराम**—हं खबरदार. कोणाच्या बापाचा माल घेऊन चाललांत ? हा तुकाराम जिवंत असतां त्याच्या घरांत या झोटिंगाचा आणि या अवदसेचा फेरा ? (स्वगत) विठ्ठला, ज्यांत आम्हांला आनंद नाहीं, सौख्य नाहीं, प्रेम नाहीं, अशा या मनाला मोह पाडणाऱ्या वस्तु आमच्याकडे धाडतोस तरी कशाला ? आम्हीं मागतों एक आणि तूं देतोस भलतंच. आमचं मागणं एवढंच कीं—

**जेणें माझें चित्त राहे तुझ्या ठायीं ॥**
**अखंड तें देईं प्रेमसुख ॥**

**जिजाई**—देवा, आतां कायरे करूं ? जय आई मंगळाई, जाखाई, जोखाई, म्हसोबा, बहिरोबा, खंडोबा, जोतिबा, माझ्या माहेरच्या देवांनो, सगळेजण धांवत या नि या आमच्या पिशाच्या मानेवर बसून त्याला शुद्धिवर आणा. ( वैतागानं ) म्हटलं, मी काय म्हणतें तें ऐकलं का ?

**तुका०**—हो हो. हें विष आपल्या घरांत नको हेंच ना तुझं म्हणणं ? ठीक आहे. न्याहो, परत न्या हा नजराणा.

**जिजाई**—( त्याच्या अंगावर खेंकसून ) आतां काय करूं ? ' परत न्या ' असं कधीं म्हटलं मी ? ( रागानं हातपाय आपटते. )

**तुका०**—तोंडानं म्हणायला कशाला पाहिजे. नवराबायकोची भाषा मुळिं डोळ्यांनींच चालते. उचलाहो हें इथून. हें पाहून तिच्या अंगाची आग झाली, डोकं दुखूं लागलं, पहा ती संतापानं फूं फूं करूं लागली. बघा, बघा, झालाच तिच्या अंगाचा भडका, लागली थैमान करायला; उचला, उचला आधीं इथून हें.

**जिजाई**—चला, व्हा बाजूला. माझ्या अंगाचा कसा संताप झाला आहे. ( रागानं बोटं मोडते. )

**तुका०**—पाह्यलंत ? तुमच्या ह्या करण्यानं ती अधिक संतापली. एखादे वेळेला ती या नजराण्याला लाथ सुद्धां मारील. पण लक्ष्मिला लाथ मारूं नये, तूं आपली घरांत जा कशी.

**जिजाई**—नकोग बाई ! कुठं तरी जाऊन जीव द्यावा पण कुणाची चाइलं होऊं नयेरे देवा ! ( रडत बसते. )

**पंडित**०—महाराज—

**तुकाराम**—अरे हो ! आमच्या या कितॅनरंगांत मी तुम्हाला विसरलोंच. ही आमची नेहमींचीच कथा आहे; आणखी या कथेंत ही आमचं ध्रुपद धरते. या कथेंत तुम्हाला कांहीं तथ्य वाटलं तर घ्या, पण, ( नजराण्याकडे बोट दाखवून ) असलं कुपथ्य मात्र पुन्हां आमच्याकडे आणूं नका. बाकिच्यां कुपथ्यानं एकटा रोगीच गार पडतो, पण यानं रोग्यासह वैद्य मरतो. ( शिवाजी येऊन बाजुला उभा राहतो. )

**शिवाजी**—( स्वगत ) अहाहा ! केवढं हें प्रचंड वैराग्य ! अशा वैराग्यापुढं प्रत्यक्ष लक्ष्मि जरी येऊन उभी राहिली, तरी तिलासुद्धां लज्जेनं खालीं मान घालावी लागेल.

**पंडित**०—बुवामहाराजांनीं आमचं म्हणणं तरी ऐकून घ्यावं. साधुसंतांच्या पुण्याइनंच राज्याला बळकटि येते, हें जाणून शिवाजी-महाराजांनी हें सर्व चरणापाशीं अर्पण केलं आहे; आणि आपल्या भेटिची इच्छा दर्शविली आहे.

**तुकाराम**—अहो, असल्या अर्पणावर आम्हीं कधींच तर्पण सोडलं आहे; तेव्हां त्यांना म्हणावं, भेटिचं नांवच काढूं नका. बरं, शिवबाजवळ येऊन आम्ही मागावं तरी काय ? आमची आशा जळली आहे, तृष्णा भीक मागत फिरते आहे, पांडुरंगानं आम्हांला वैकुंठिची जहागिरी दिली आहे, प्रतिवैकुंठ अशा पंढरिची मिरास दिली आहे, आम्ही अगदीं संतुष्ट आहोंत. तुमच्या राजाला कळवा कीं तुम्ही मात्र न्यायानं आणखी नीतिनं राज्यकारभार चालवा, अनाथांनां साह्य करा, धर्माचं रक्षण करा, पृथ्वीचं पालन करा, त्या योगानंच तुमचं कल्याण होऊन त्रैलोक्यांत ख्याति होईल. आमच्या भेटिचं कांहीं कारण नाहीं. आम्ही निःसंग, निरिच्छ आहोंत. आम्हाला कांहीं कमी नाहीं. आमचा भांडारी कुबेर आहे.

**जिजाई**—अहाहा! दिवे ओवाळा दिवे! म्हणे कुबेर यांचा भांडारी, पण धड मडकं सुद्धां नाहीं यांच्या घरीं!

**पंडि०**—महाराज, भेटीचा आपण अंगीकार न केल्यास महाराजांचा मानभंग--( जीभ चावून )--छे छे, मनोभंग होऊन त्यांना अत्यंत वाईट वाटेल!

**तुका०**—तसं त्यांनीं आपल्या मनाला वाईट वाटून घेण्याचं कारण नाहीं. आम्हांला थोडंच त्यांच्याजवळ कांहीं मागायचं आहे? आणि आम्हाला जरूरच लागली, तर भीक कांहीं कमी नाहीं. वस्त्र नाम चिंध्या रस्त्यावर पुष्कळ मिळतात. उशाला पाषाण घेऊन भूमिशय्येवर निजतां येतं. आकाश पांघरतां येतं. बरं, त्यांतून तुमचे राजे आम्हांला देऊन देऊन तें काय देणार? त्यांच्या जवळ आहे काय? आमच्या त्रिभुवनाच्या अफाट राज्यापुढं शिवाजीच्या टीचभर राज्याची काय मातब्बरी आहे? आमच्या राज्याला जरी सीमा नाहीं, अंत नाहीं, कुणालाही कसलाच कुठं अटकाव नाहीं, तरी आमचा राज्यकारभार सुयंत्र चालला आहे; आणि विठ्ठल नामाचा करभार, बिनहरकत आम्हाला पोंचतो आहे. आहे का तुमच्या राजाच्या आंगीं हें सामर्थ्य?

**शिवाजी**—( पुढं येऊन. ) मुळींच नाहीं, म्हणून तर दर्शनाकरतां धांवून आलों, ( पायां पडतो ).

**जिजाई**—अगबाई! हाच का तो शिवाजी राजा! त्यानं या आमच्या खुळ्याचं सगळं बरळणं ऐकलं वाटतं. आतां यांची काय अवस्था करिलग बाई! कारट्यांनो कुठें गेलांत रे, धांवा लौकर, आधीं राजाच्या पायावर डोकं ठेवा, लोळण घ्या, आतां तुमच्या बापाची कांहीं धडगत नाहींरे मेल्यांनो! ( पाया पडते. )

**शिवाजी**—मातोश्री, भिऊं नका. माझ्याकडून तुम्हाला बिलकुल त्रास होणार नाहीं. मी तुमचं लेंकरूं आहे. आणखी तुम्ही माझ्या मातोश्री आहांत.

**जिजाई**--मी कसली बाबा तुझी मातोश्री ! राजाची आई नी गांवांत भीक मागून खाई. नांव सोनुबाई नी हातांत कथलाचा देखील वाळा नाहीं.

**शिवाजी**—मातोश्री, आपण निराश कां होतां ? हें जडजवाहीर सगळं आपल्या करतांच आहे.

**जिजाई**--तें बाबा आम्हांला देऊं नकोस, पण या खुळ्याला बांधून नेउं नकोसरे माझ्या बाप्पा ( पाया पडते. )

**तुका०**—शिवबा, आम्ही पंढरिचे वारकरी, आम्हांला हें जवाहीर काय करायचं आहे ? आम्ही वैष्णव सोनं माती मोल समजतों. आम्ही हरिभक्त मानपान तृणासमान मानतों. ऐश्वर्याला आम्ही विष्णुदास गोमांस समजतों. त्याचा स्पर्श आमच्या अंगाला नको. तें पाहून आम्हाला किळस वाटतो. ओकारी येते. त्याला आम्ही शिवणार नाहीं. फार तर काय-आम्ही त्याच्याकडे ढुंकुनही पाहणार नाहीं. आमच्या सुखाचा ठेवा एक पांडुरंग आहे. तुमच्या मनांतून आम्हांला कांहीं द्यायचंच असेल, तर विठ्ठलनामामृत प्यायला द्या. विठ्ठलनामाचाच अहेर करा. घोडा, अबदागीर, विठ्ठलनामच द्या. आमच्या डोक्या-वर विठ्ठलनामाचंच छत्र असूं द्या. आम्हाला सुखी झालेलं पहायचं असेल, तर विठ्ठलाचंच नांव द्या. आणि आम्हांला आनंद व्हावा अशी इच्छा असेल तर आपल्या राज्यांत घरोघर तुळसीवृंदावनं उभारा. आबालवृद्धांसह एकादशीव्रत करा. गळ्यांत तुळसीमाळेचं भूषण मिरवा. मुखांत अखंड हरीचं नाम ठेवा, आणि आपल्याला हरीचे दास म्हणवा, म्हणजे त्यांतच आम्हाला आनंद, आनंद, आनंद, आहे.

**शिवाजी**—सत्य, सत्य, सत्य, त्रिवार सत्य. सत्याला स्मरून आजपासून मी या पांडुरंगाच्या व्रताला आरंभ करतों, हीच या चर-णाची शपथ. खरोखर महाराज, आपल्या रूपेनं आज माझे ज्ञानचक्षु उघडले, माझे खरे शत्रु मला दिसले, षड्रिपूंच्या छातींत धक्का बसला, संसारबंधन ढिलं पडलं, मायेनं आपलं तोंड काळं केलं, शत्रूंच्या तदा-

तून मेलों; पांडुरंगाचं दर्शन झालं, कधीं न पाहिलेलं तेज दृष्टिगोचर झालं आणि हृदय आनंदमग्न झालं.

**तुका०**—यालाच साक्षात्कार म्हणतात. जिवानं शिवाला ओळखलं. बस्स. आतां तुम्ही मुक्त आहां. राजा जनकाप्रमाणं तुम्ही विदेही आहांत. तुम्हाला आतां कसलंच भय नाहीं. अहाहा काय सांगावं ?—

पद—( माझें नवलाचें पाखरूं, )

**"असा धरिं छंद ॥ जाइ तुटोनियां भवबंध ॥ असा० ॥ छंद लागला टिटविला ॥ सप्त सागर शोषित केला ॥ मैनावंतिनें कृतार्थ केला ॥ गोपिचंद ॥ जाइ० ॥ दुधाचा सागर उपमन्युला ॥ ध्रुव तो अढळपदीं स्थापिला ॥ मार्कंड्यानें यम हटविला ॥ चालिला मंद ॥ जाइ० ॥ तिन देह जड भरताला ॥ रावण रामरूप तो झाला ॥ गोपि चढल्या वैकुंठाला ॥ यशोदानंद ॥ जाइ० ॥ अशा या छंदें कितिएक तरती ॥ नराचे नारायण ते होती ॥ दिनबंधु आपुला करिती ॥ निजसुखकंद ॥ जाइ० ॥"**

**शिवाजी**—तथास्तु ! तर मग हाच उपदेश आम्हाला मिळाला. आतां आम्हाला कसलीच आशा उरली नाहीं. राज्यप्राप्ति हें आम्हाला बंधनं वाटतं. गड, कोट, किल्ले, हे आम्हाला तुरुंग दिसतात. आप्तबांधव शेणसड्यांतले किडे भासतात. विषयभोग विषाप्रमाणं दिसतात. ऐश्वर्य अंधारकोठडी प्रमाणं वाटतं. जगातलं कांहींच दिसत नाहीं. आम्हाला तें कांहीं नको. पंडितराव, घ्या हीं वस्त्रं भूषणं. हिरोजी, ही तरवार संभाळा. तुमची आमची हीच भेट. आपला ऋणानुबंध संपला. सर्वस्व-त्याग करून आतां आम्ही श्रीरामचंद्राप्रमाणं वनवासी होणार !

**पंडित०**—आणि आम्हाला कोणाचे स्वाधीन करणार ? हीं काळीं तोंडं घेऊन आम्ही मासाहेबांकडे कसं जावं, आणखी त्यांना काय सांगावं ?

**जिजाई**—मी तरी तेंच म्हणतें. अहो तुम्ही अब्रूची चाड अगदिंच कशी सोडलीत ? आपल्या संसाराची राखरांगोळी केलीत ती केलीत,

पण हा बिचारा राजा, त्याचा थाटामाटाचा संसार, त्याची सुद्धां वाताहत करून सोडलीत! आतां हें महापाप फेडाल तरी कुठं? अहो खुळोबा, ऐकायला येतं का? या राजाची बायको माझ्याकडे आली नि म्हणूं लागली कीं रांडे, तुझ्या नवऱ्यानं माझा नवरा वेडा केला, तर तिला तोंड दाखवूं कशी आणि तिची समजूत तरी करूं कशी?

**शिवाजी**—मातोश्री, त्याची तुम्हाला काळजी नको. माझ्याकरतां कुणालाही दुःख मानायचं कारण नाहीं. पंडितराव, आईसाहेबानां दंडवत् सांगा. झालेलं सर्व वर्तमान कळवा. माझा तानाजी आणि तुम्ही सर्व माझ्या ठिकाणीं आईसाहेबानां व्हा. हिंदुधर्म रक्षण करण्याचा त्यांचा हेतु तडीला न्या. जा तुम्ही. मनांत खेद मानूं नका. येतों आम्हीं. (तुकारामाला) बरं महाराज, आपल्याला अर्पण केलेल्या या नजराण्याची आतां काय व्यवस्था करायची?

**तुकाराम**—ब्राह्मण, अतिथि, गोरगरीब यांनां वांटून टाकायला धर्माज्ञा आहे.

**जिजाई**—आणि त्यांतलं थोडं घरांत ठेवायला कुणाच्या बापाचं भय आहे?

**शिवाजी**—तर मग मेवामिठाईचा श्री पांडुरंगाला नैवेद्य दाखवून, तो प्रसाद आपण ग्रहण करून, आपल्या हातानंच आम्हाला द्यावा.

**तुकाराम**—ठीक आहे. गोपाळकाल्याची सर्व सिद्धता करा. गांवांतल्या बाळगोपाळांना बोलवा.

**जिजाई**—शेण खायला बोलवा. चला बाई, मला आपलं तोंड इथून काळं करूं दे. या दुस्मानाची करणी माझ्याच्यानं कांहीं उघड्या डोळ्यांनीं पाहवणार नाहीं. (जाऊं लागते तुकाराम तिला अडवतो.)

**तुकाराम**—तर मग डोळे मिटून अंतरदृष्टिनं माझ्या पांडुरंगाकडे पहा; म्हणजे मरतांना भयहि वाटणार नाहीं नी अंतकाळच्या वेदनाहि होणार नाहींत. इकडे पाहिलंस कां? तुला सोनं पाहिजेना? तो-बघ सुवर्णाचा मेरु.

**जिजाई**—(पाहून) सुवर्णाचा मेरू? अहो तो तर भामनाथ डोंगर.

**तुका०**—तर मग इकडे पहा. तुला हिरे हवेतना ? तें–चन्द्र, रत्नांच्या अनंत राशिचं कोठार रत्नाकर.

**जिजाई**--( पाहून ) रत्नाकर ? जळली मेली ती तर इंद्रायणी नदी.

**तुकाराम**—हेंच तें. अग एकाग्र चित्तानं डोळे फाडफाडून तिकडेच पहात उभी रहा, म्हणजे माझा पांडुरंग रत्नाची ताटं भरून घ्या–घ्या म्हणतो आहे असं तुला दिसेल. ( तसा देखावा दिसूं लागतो, जिजाईला तें कांहीं दिसत नाहीं म्हणून ती रागानं जाते. ) अहाहा ! बाळगोपाळ जमले, मनाला मोटा आनंद झाला; ( संत संतिणी जमतात. ) आतां करूं या गोपाळकाला.

( तुकाराम सर्वांना प्रसाद वाटतो, आणि पुर्ढील पद्याच्या अनुरोधानं भजन, नाच चालला असतां पडदा पडतो. )

**पद**—( तरि निरोप झडकरि, )

**घ्या मुकुंद मुरारि गोविंद ॥ आनंदकंद घ्या हा छंद ॥**
**घ्या मुकुंद । घ्या मुरारी । घ्या गोविंद । घ्या मुकुंद० ॥**
**गोपबाला करुनि गोळा मांडि काला सांवळा ॥**
**अंत नाहीं त्या सुखाला होय सकलां आनंद ॥ घ्या० ॥**
**वाजवि कान्हा वाद्यें नाना गाति तनाना व्रजललना ॥**
**हाल हुंबरी फुगड्या टिपरी खेळति नारीनरवृंद ॥ घ्या०**
**रामभजन सब सार मिठाई सुधारसोंका सिंध ॥**
**कहे तुका और छंद छोरके भजो भाइ गोविंद ॥ घ्या० ॥**

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला—( स्थळ–अरण्य. )

( वैराग्य वेषांनं शिवाजी येतो. )

**शिवाजी**—धन्य, धन्य, तुकाराम महाराज. केवढी त्यांची योग्यता ! राजा हरिश्चंद्राप्रमाणं सत्वशील, श्रीरामचंद्राप्रमाणं एक-पत्नी व्रतस्थ, भीष्माचार्याप्रमाणं सत्यवचनी, कर्णाप्रमाणं उदार, शुकमुनींप्रमाणं वैराग्यशाली, आणि राजा जनकाप्रमाणं विदेही असा सत्पुरुष कुणाला पहायचा असेल, तर त्यानं तुकाराम महाराजां-चंच दर्शन घ्यावं. काय त्यांची योग्यता ! त्यांच्या दृष्टींत पूर्ण-वात्सल्य भरलं आहे. तोंडांत अमृत आहे. चित्तांत समाधान आहे. मुद्रेंत प्रसन्नता वास करते आहे. आत्मानंदांत ते सदा तन्मय आहेत. त्यांच्या स्पर्शांत संजिवनी आहे. माझं महत्भाग्य म्हणूनच त्या महा-त्म्याचं मला रोज दर्शन घडतं. माझी उंच्छृखल वृत्ति त्यांच्या उप-देशानं शांत झाली. वाटतं कीं आतां राज्याची घडामोड नको, आई-बाप, बायका–मुलं, आप्त–मित्र, यांची कटकट नको, तुकाराम महाराजांचा गोड सहवास, त्यांचा पवित्र उपदेश, आणि या अरण्य-वासांतील एकांत यांतच मनाला आनंद वाटतो.

( पंडितराव व हिरोजी सईबाईसह येतात. )

**पंडित०**—वाहवा ! पाळत ठेवल्याप्रमाणं, पत्ता तर बरोबर लागला. हं, वहिनीसाहेब, ती पहा महाराजांची स्वारी. जा. धांवत जाऊन त्यांचे पाय धरा, आर्जवं करा, प्रयत्नाची शिकस्त करा, पण महाराजांना पुन्हा आमच्यांत आणा.

**सई०**—( धांवत जाऊन मिठी मारते. ) असं काय मेलं माण-साला फसवावं. अस्साच्या अस्सा तुकाराम महाराजांच्या दर्शनाला जाऊन येतों, असं सागून जें इकडं यायचं, त्याला किती बरं दिवस झाले, आतां आधीं घरीं चलायचं ना ?

**शिवाजी**—घरीं ? कुणाच्या घरीं ? आतां घर आहे कुठं ? हेंच आमचं घर आणि इथं राहणारे आमचे आम्ही. तूं कोण ? आणखी मी तरी तुझा कोण ? चल हो चालती इथून. ( तिला दूर लोटतो. )

**सई०**—( शोकानं ) महाराज, नकाहो नका, असं म्हणूं नका. मी आपली धर्मपत्नी आहें. पतीच्या चरणाची सेवा करणं, हा पत्नीचा धर्म आहे, तो आपण मोडूं नये. आपला धर्म मी नी माझा धर्म आपण राखलाच पाहिजे. धर्म मोडला असतां आपणा उभय-तांचंहि हसं होईल. महाराज, मी पायां पडतें, पदर पसरत्यें, त्यांत आपल्या सहवासाची मला भिक्षा घाला. माझ्या सौभाग्याची, माझ्या सौख्याची, माझ्या जीवित्वाची, माझ्या पंचप्राणांची, अशी राखरांगोळी करून मला अनाथ करूं नका. ( मिठी मारते. )

**शिवाजी**—तर मग अनाथांचा नाथ तो परमेश्वर आहे, त्याला शरण जा. ( तिला लोटून देतो. )

**सई०**—( पाय धरून ) नाहीं, नाहीं. आपणच माझे नाथ, आपणच माझे परमेश्वर, आपणच माझं सर्वस्व, आपल्यामुळंच मी सनाथ झालें, मग आपणच जर मला टाकली तर माझी वाट काय होईल ? सांगा पाहूं, माझ्या सहवासाचा वीट कां आला ? द्या-द्या–पाहूं याचं उत्तर !

**शिवाजी**—उत्तर ! मायातीत होणं मोठं बिकट, हेंच याचं उत्तर. पण आतां आम्ही त्या मायेला ओळखलं आहे. ही माया दिसायला रतीसारखी सुंदर, पण वास्तविक तिच्या उलट केवळ तिक्ष्ण तीर आहे. हिचं आलिंगन मोठं सुखाचं, पण अंतर्यामीं दाह उत्पन्न करणारं. नेत्र कटाक्ष मोठा मार्मीक, पण मर्म विदारण करणारा. भाषण अत्यंत गोड, पण तें काळीज पोखरणारं. चुंबन अमृतमय, पण आंत काळकूट वीष भरलेलं, विलास म्हणजे आनं-दाचं सरोवर, पण आंत घाण भरलेली. हिचं राहणं टोलेजंग राज-वाड्यांत, पण त्यांत सर्वत्र सुन्या लावलेल्या. राणीसाहेब, मेहरबानी करून अशा ठिकाणीं आम्हाला पुन्हां नेऊं नका. तुम्ही इथून जा पाहूं.

**सई०**—( दुःखानं ) महाराज, अजून आपल्याला प्रपंच करायचा आहे. या वयांत हा वेदांत शोभत नाहीं. सांगा बरं, आपल्याला संसाराचा वीट कां आला ?

**शिवाजी**—कारण संसार हा दुःख मूळ आहे. संसाराविषयीं तुकाराम महाराज म्हणतात, '**सुख पहातां जवापाडें ॥ दुःख पर्वता एवढें**'॥

**सई०**—महाराज, माझ्याशीं लग्न केल्याबद्दल जर आपल्याला पश्चात्ताप होत असेल, माझा सहवास जर पापाचा वाटत असेल, तर मी आपला जीव देतें; पण वैराग्य घेऊन सासूबाईंच्या उतार वयांत त्यांनां अंतर देऊं नये. त्यानां असं रडवूं नये.

**शिवाजी**—मातोश्रींनां आज दुःख होऊन त्या रडतील ही, पण 'जमका अजब तडाका' चुकवून या नरदेहाचं सार्थक केल्याबद्दल पुढं त्यांनां आनंद होईल ! राणीसाहेब, नरदेहाची ही दुर्लभ पर्वणी वरचेवर येत नाहीं. विषयाचीं नीरस हाडं चघळण्यांत; स्त्री पुत्रांनां कवटाळण्यांत, त्यांच्या सुखानं माजण्यांत, दुःखानं विवळण्यांत, आजपर्यंत अनेक जन्म गेले. त्या त्या जन्मांतले आईबाप, स्त्रीपोरं, सगेसोयरे इष्टमित्र आज कुठं आहेत ? त्यापैकीं कुणाची आठवण काढणार, कुणाला कवटाळणार, कुणासाठीं रडणार, कुणासाठीं हंसणार, रुसणार, किंवा मरणार; सांगा सांगा राणीसाहेब ? मागल्या जन्मांतले कोणी जर आपले नाहींत तर आपण तरी त्यांचं काय लागतों.

**सई०**—पण महाराज, माझी अशी मान कापून जाण्यांत आपला कांहीं फायदा होणार नाहीं. आपण मोक्षाची इच्छा करीत असाल तर निपुत्रिकाला मोक्ष नाहीं. म्हणून म्हणतें, संसारांत राहून प्रपंच नी परमार्थ दोन्ही साधा. वंश विस्तार करून पितरांचा आशिर्वाद घ्या. पितृऋण, स्त्रीऋण, यांतून मुक्त झाल्याशिवाय आपल्याला मोक्षाचे अधिकारी कधींहि होतां येणार नाहीं.

**शिवाजी**—राणीसाहेब, सगळ्याचं ऋण जर मी फेडीत बसलों, तर माझ्याच्यानं कांहींच व्हायचं नाहीं; आणि या शरिराचा तर घटकेचा भरवंसा नाहीं. हा देह म्हणजे कच्च्या मातिचं मडकं आहे.

लहानशा धक्क्यानं तें केव्हां फुटेल याचा नेम नाहीं, म्हणून जो काळ चालला आहे तोच आपला समजून सत्कारणीं लावावा, म्हणजे पुढं पश्चात्ताप होणार नाहीं. आहार, निद्रा, ऐशआराम यांत निमग्न होणं म्हणजे ती पशुवृत्ति, श्वानवृत्ति होय. तोंडावाटे जर हरिनाम येत नाहीं तर तें तोंड नसून लोहाराचा भाता होय. कान जर हरिकीर्तन ऐकत नसतील तर ते भिंतीतलीं बिळं होत. डोळे जर प्रभू स्वरुप पाहत नसतील तर ते कांचेचे फुटके मणी होत. मस्तक जर प्रभू चरणांपुढं नम्र होत नसेल तर तें चिखलानं भरलेलं मडकं होय. हरिभजनाशिवाय चळवळ करणारी जिव्हा कर्णकटू बेडकाची जिव्हा होय. पूजन न करणारे हात अग्निचं जळण होय. तीर्थयात्रा न करणारे पाय झाडाचे बुंधे होत, आणि पांडुरंगा कारणीं न झिझविलेला देह प्रेतरूप होय. मग राणीसाहेब, विनाकारण अशा सजीव प्रेताचं ओझं वाहण्यांत अर्थ कोणता? नाना रूपं घेऊन, चौऱ्यायशीं लक्ष योनी फिरून, केलं काय? तर मढं वागवलं. मनाला जाणलं नाहीं, चित्ताला ओळखलं नाहीं, आत्मारामाची पर्वा केली नाहीं. पण तुकाराम महाराजांनीं आमच्या डोळ्यांवरचा भ्रम घालवला. सुंदर रूप दृश्य झालं. मंजुळ हरिगीत ऐकूं येऊं लागलं. कान मधुर प्रभुगुण गायला लागले. सर्व तऱ्हेनं अंगांत जीवनकळा आली. कोहम् शब्द विसरून गेलों. सोहम् शब्दाची ओळख पटली. आतां कांहीं नको. तुमचा–आमचा ऋणानुबंध सुटला. ती वाट तुमची आणखी ही वाट आमची. म्हणून म्हणतों जा तुम्ही परत. ( तिला लोटून जातो. सईबाई मूर्च्छित पडते. पंडितराव तिला सावध करतो. )

**सई०**—हाय! हाय! शेवटीं निष्ठुर होऊन गेलेच ना? देवा! माझ्या विनवणीचा कांहींच उपयोग झाला नाहीं कां रे? पंडितराव, आतां ते जिथं जातील तिथं मला गेलंच पाहिजे. त्या चरणांशिवाय मला गति नाहीं. पंडितराव, तुम्ही सारे घरीं जा. झालेलं वर्तमान सासूबाईंना कळवा. त्यांना माझा नमस्कार सांगा. मी आपलं काळं तोंड आतां सासुबाईंना दाखवायची नाहीं. तो राजवाडा आतां मला कोंडवाडा वाटतो. त्यांनीं प्रपंच सोडला, मीहि सोडला.

त्यांना संसारसुखाचा वीट आला, मलाहि कंटाळा आला. ते वनवासी, मी उदासी, ते तापसी. मी संतीण. ते बैरागी, मी जोगीण. ते तीर्थयात्रा पायीं करतील, मी पण अनवाणी फिरेन. ते कंदमुळं खातील, तर त्यांची उष्टिं सालपटं मी खाईन, ते जलपान करून राहतील, तर मी हवा भक्षण करून राहीन. सारांश, जी वाट त्यांची, तीच माझी. त्यांना कुणी नको, मलाहि कुणि नको, जा, जा, तुम्ही परत. ( शिवाजीच्या मागून धांवत जाते. )

**पंडित०**—वहिनीसाहेब, थांबा, थांबा. असं साहस करूं नका. छे, गेल्याच त्या. हिरोजी, आतां निदान तुकाराम महाराजांपर्यंत तरी त्यांना नेलंच पाहिजे. मारा धांव हिरोजी. ( धांवत जातात. )

---

## प्रवेश दुसरा—( तुकारामाचं घर. )

( जिजाई निजली आहे व तुकाराम भजन करीत आहे. )

**तुका०**— पद—( छत्रसुखासनीं. )

**नामसंकीर्तन साधन हें सोपें ॥**
**जळतील पापें जन्मांतरींचीं ॥**
**नलगे सायास जावें वनांतरीं ॥**
**सुखें येतो घरीं नारायण ॥**
**रामकृष्ण हरी विठ्ठल केशवा ॥**
**मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥**
**याहूनी आणीक नाहीं बा साधन ॥**
**तुका ह्मणे आण विठोबाची ॥**

राम–कृष्ण–हरी ! राम–कृष्ण–हरी ! ! राम–कृष्ण–हरी ! ! !

**जिजाई**—आतां निजूं द्या त्यांना आपल्या घरीं. बिचाऱ्यांची आपल्या बायकांच्या महालांत जायची तारांबळ झाली असेल, आणि अशा मध्य रात्रीं त्यानां इकडे बोलवायची यांना हुक्की आली आहे. पाप लागेल बरं. त्यांच्या बायकांचे शाप बसतील शाप.

**तुका०**—अग जा. मांजरीचे दांत तिच्या पिलांना कधींच लागत नाहींत. सीतामाई झाल्या, रुक्मिणी मातोश्री झाल्या, तरी त्यांची आम्ही लेंकरंच आहोंत.

**जिजाई**—पण लेंकरानं भलत्याच वेळीं त्रास दिला, तर थोबाड रंगवायला मातोश्री कांहीं कमी करणार नाहींत.

**तुका०**—पण सीतामाई किंवा रुक्मिणी मातोश्री, म्हणजे त्या कांहीं तुक्याच्या घरांतल्या अवदसा नव्हत.

**जिजाई**—हं. खबरदार. मला नाहीं ते खपायचं. काय मेला त्रास आहे पहा, पोटभर जेवायला नाहीं तर नाहीं, पण स्वस्थपणें झोंपायला सुद्धां त्या मेल्या पांड्याची आडकाठी आहे !

**तुका०**—त्याचं काय अडलं आहे. तुम्ही आपल्या स्वस्थ घोरत पडा. आम्ही पांडुरंगाचं नांव मनांतल्या मनांत घेत बसतों.

**जिजाई**—आणि मी आपली त्याच्या नांवानं बोटं मोडित पडतें. ( जांभई देऊन ) जयदेवा, म्हसोबा, भैरोबा कधीं पावता कोण जाणे बाप्पा!

( आंथरूण गुंडाळून डोकीवर घेते आणि दुसरीकडे निजायला जाते. )

**तुका०**—मेल्यावर पावतील कदाचित्. हैं. कोंबडया-बकऱ्यांचे बळी घेणारीं हीं शेंदरीं हेंदरीं दैवतं आपल्या भक्तांचं कितपत कल्याण करणार ! पांडुरंगा, आम्हाला ते म्हसोबा नकोत आणि ते बहिरोबा नकोत आमचा सर्व कांहीं तूं आहेस.

**पद** ( सुंदर तें ध्यान, )

**कृष्ण माझी माता कृष्ण माझा पिता।**
**बहीण बंधु चुलता कृष्ण माझा ॥**
**तुका म्हणे माझा श्रीकृष्ण विसावा।**
**वाटे न करावा परता जीवा ॥**

जय विठ्ठला, जय विठ्ठला, जय विठ्ठला. ( असं म्हणून तुकाराम भजन करित असतां, स्त्री-वेषधारी मंबाजी व मैत्रिणीसह रंभा येते.)

रंभा— पद—( अरे गोरी चालो, )

बोला बोला तुकाराम बोला । अलबेला ॥
बोला गडे बोला । तुकाराम० ॥
पाहूं चला । मन्मथ पुतळा । छबेला । रंगेला ॥
दिसाया उदासी । खरा सुखविलासी । मोहन-
मुरलीवाला । मनमोहन० ॥ जणुं मनमोहन० ॥
राधा सखीचा । कन्हैयाच साचा । सेवूं गडे
नंदलाला ॥ प्रिय सखयाला । बोला० ॥

( वरील पदाच्या तालावर सर्वजणी नाचतात. )

तुका०—पांडुरंग ! पांडुरंग ! ! पांडुरंग ! ! ! (सर्वांस नमस्कार करतो.)

रंभा—पांडुरंग ! पांडुरंग ! ! पांडुरंग ! ! ! ( सर्वजणी तुकारामाला नमस्कार करतात. )

तुका०—पांडुरंग ! ( उलट नमस्कार करतो. )

रंभा—म्हटलं, अगदीं एकटंच जागत बसून काय चाललं आहे ?

तुका०—हें रोजचंच आहे. बरं पण, आपण कोण ? आणि ही सर्व मंडळी आमचं कीर्तन ऐकायला आली आहे किं काय ?

रंभा—छे, छे. आम्ही तुमच्या कीर्तनासाठीं नाहीं आलों.

तुका०—तर मग, तुम्ही कीर्तन करून आम्हाला ऐकवतां ?

रंभा—होय, आम्ही भजन, कीर्तन, नर्तन सर्व कांहीं करतों.

तुका०—ठीक आहे—

करावें कीर्तन ॥ मुखीं गावे हरिचे गुण ॥

रंभा— पद—( मदभारिली नार, )

प्रिय सखया हे तुकया सुगुणसुंदरा ॥
कमलवदन मदनमूर्ति नरवर चतुरा ॥
हे मनोहरा ॥ अहो प्रिय सखया० ॥
विषयसुखा दवडुं नका तेविं तरुण वय फुका ॥
कोमल तनु शिणवुं नका विनती ही आयका ॥
रसिकनायका । आम्हि बायका । नव कुमारिका ॥

**यांसि वरुनि, हृदयिं धरुनि, धन्य करुनि,**
**रमणि सुखवरा ॥**

**तुका०**—अरे–अरे–अरे! हें तुमचं भजन किं रडगाणं ? हें कीर्तन किं कुत्र्याचं भुंकणं ? आणखी हें तुमचं नर्तन किं, धांगडधिंगा ? पुरे तें. तें ऐकून माझ्या कानठाळ्या बसल्या, डोकं भणभणून गेलं, अंतःकरण जळुं लागलं नि आत्मा तळमळुं लागला. ज्यांत माझ्या पांडुरंगाचं नांव नाहीं, माझ्या विठ्ठलाचे गुणानुवाद नाहींत, असलं तुमचं रडगाणं मला पुन्हां ऐकवूं नका. चला, व्हा चालत्या इथून.

**रंभा**—पण महाराज, आमचं आपल्याशीं नाजुक काम असलं तर ?

**तुका०**—माझ्याशीं ? आणि नाजुक काम ? आश्चर्य आहे बुवा ! अहो, पण मी नाजुक कामांतला माणूस नव्हे.

**रंभा**—आतां काय करावं ? अहो आम्हीं आपल्यासारख्या हरिभक्तांच्या दर्शनाकरितां आलों आहोंत.

**तुका०**—आमचं दर्शन ? आणि अशा पिशाच वेळीं ? मग तुम्हीं दिवसां कोणत्या कामांत गुंतलां होतां ?

**रंभा**—( स्वगत ) अगदींच खुळा दिसतोय बिचारा ! ( उघड ) म्हटलं–आम्ही आपला उपदेश घ्यायला आलों आहोंत उपदेश.

**तुका०**—आमचा उपदेश ? आणि या मध्यरात्रीं ! तुम्हाला रात्रिच्या वेळिंच उपदेश घ्यायची संवय आहे कीं काय ?

**रंभा**—नाहीं हो, अशा शांत, निवांत वेळिंच एकांतीं उपदेश घ्यायचा असतो असं म्हणतात.

**तुका०**—ते म्हणणारे झक् मारतात. हा तुकाराम जातिचा कुणबी आहे. तो कोणाला उपदेश करीत नाहीं, आणि त्याला उपदेश करण्याचा अधिकारहि नाहीं. पण कायहो बाई, अशा अपरात्रीं आपलीं गुरं दुसऱ्याच्या कुरणांत चरायला पाठिवणारा असा तुमचा यजमान तरी कोण हो ?

**रंभा**—(स्वगत) आतां कुणाकुणाचीं म्हणून नावं सांगूं ? (उघड) आमच्या सगळ्या यजमानांचीं नांवं लिहायला आतां कारकूनच ठेवले पाहिजेत.

**तुका०**—अहो, जन्म जन्मांतरींच्या यजमानांचीं नांवं नको आहेत. फक्त चालु घडिच्या यजमानाचं नांव सांगा.

**रंभा**—( जरा लाजून ) मग तें,–आपलंच–नांव ध्याना.

**तुका०**—अरे ! अरे !! अरे !!! हिनं तर अगदींच ताळ सोडला. हिला लाज नाहीं, भीड नाहीं, जात नाहीं, गोत नाहीं, वय नाहीं, रूप नाहीं, शहाणा नाहीं, खुळा नाहीं, कांहीं नाहीं; सब गोलंकार. बेवारसी मढंच जसं. वाटेल त्या जनावरानं यावं नि लचका तोडून खुशाल जावं. अहो बाईसाहेब, ज्या कुणा भाग्यवंताच्या पदरीं तुमच्यासारखीं रत्नं पडलीं असतील, त्याच्यावरच अनुग्रह करून त्याला आणखी पुण्यवंत करा जा. असे गुंगारे मारून त्याला फसवूं नका.

**रंभा**—हे असले लपंडाव नाहीं गडे कामाचे. मला जें कांहीं हवं आहे, तें सर्व आपल्याजवळ आहे नि मला तें आवडलं पण आहे.

**तुका०**—तें काय काय आवडलं आहे ? हें नाक आवडलं ? चला कापून घ्या. डोळे आवडले ? काढून घ्या. कान आवडले ? उपटून घ्या. आमचं चंद्रमुख आवडलं ? ही मान कापून घ्या. कांति आवडली ? आमच्या अंगावरचं कातडं सोलून घ्या. काय आवडलं असेल तें खुशाल कापून घ्या, आम्ही या शरिराची किंमत कांहींच समजत नाहीं. विश्वकर्म्यांनं बनवलेली ही एक पांच खाणितल्या मातिची ओबड-धोबड मूर्ति आहे.

**रंभा**—ती कसलिका मूर्ति असेना, मला आपली पतकरली.

**तुका०**—पण मला पतकरलं पाहिजेना ? बाई, तुम्हाला कसंही पतकरतं, मग हा तुकारामच कशाला हवा ?

**तुका म्हणे तुम्हां पाहिजे भ्रतार ॥**
**तरी काय नर थोडे झाले ॥**

**रंभा**—( बोटं मोडून ) ते काय मेले जाळायचे आहेत ? अहो तसं नव्हे बुवा साहेब.

**तुकाराम**—मग कसं हो बाईसाहेब ?

**रंभा**—आम्ही कीं नाहीं मनोभावानं आपल्यालाच वरलं आहे.

**तुकाराम**—तर मग तुम्ही घसरलांत. अहो, माझी एक लग्नाची सुंदर बायको असून, तिला चार पोरंबाळंहि आहेत; इतक्या बिडया माझ्या हातापायांत असतां, चांगल्या मोकळ्या गळ्यांत आणखी तुमचं लोढणं अडकवून घेऊं कशाला!

**रंभा**—संसार सुखाचा होऊन काळ आनंदांत जायला.

**तुकाराम**—पण आम्ही दुःखांत आहोंत, असं सांगितलं कुणी तुम्हाला? राहण्या करतां हें सुंदर विश्वमंदिर, नामामृताचं पंचपक्वानाचं भोजन, पांडुरंगासारखा प्रेमळ पिता, रुक्मिणी सारखी मायाळू माता, पुंडलिकासारखा वत्सल बंधु, कान्हुपात्रेसारखी दयाळु बहीण, ज्ञानदेवादिकांसारखे जिवलग सोयरे, नामदेवादिकांसारखे प्यारे दोस्त, आमच्या बायकोसारखी गोडगोड बोलणारी आमची आवडती बायको, आणि सदा आनंदी असणारीं हीं मुलं. अशा परिवारासह आमचा योगक्षेम, आनंदानं आणि सुखानं चालला आहे.

**रंभा**—मातिचा सुखानं चालला आहे. सगळं गांव तर म्हणतं, किं आपल्या गळ्यांत एक कर्कशा पडली आहे.

**तुका०**—छे, छे; ती तर आमची गृहलक्ष्मि आहे.

**रंभा**—अहो नाहीं, लक्ष्मिची वडिल बहीण अवदसा आहे.

**तुका०**—ती कशी जरी असली तरी आमच्या दृष्टिनं, ती आम्हाला संसारांत लक्ष्मि, भाषणांत सरस्वती, संगोपनात पार्वती आणि योग्य वेळांत रंभाच आहे. तिच्यापेक्षां रंभेंत तरी अधिक काय आहेहो! रंभेला नाक आहे आणि आमच्या बायकोला काय नाक नाहीं! उलट मापटंभर धान्य जास्त राहील, इतकं तिचं नाक मोठं आहे. रंभेला कान आहेत आणि तिला कान नाहींत! अहो रंभेच्या दुप्पट आमच्या बायकोचे कान लांब आहेत. तोंड नाहीं म्हणावं, तर सगळा दिवस वाजत राहलं, तरी फुटणार नाहीं; इतकं भलं भक्कम आमच्या हिचं तोंड आहे. मग सांगा पाहूं, कोणतं व्यंग आमच्या हिच्यांत आहे, म्हणून तिला सोडून आम्ही तुम्हाला कवटाळावं!

**रंभा**—आतां काय करावं बाई ! त्या कजाग, भांडखोर, द्वाड बायकोला, आपण सद्गुणी समजता ?

**तुका०**—हो, आमची दृष्टिच तशी.

**रंभा**—तर मग तीच दृष्टि आमच्याकडे वळवून आम्हांला निरखून तर बघा ? आमच्या पुढं ती तुम्हाला कुब्जा दिसेल. स्वरुपांत आम्हि रती तर ती अष्टवक्रा.

**१ ली सखी**—रंगांत, आम्ही पूर्णिमा तर ती अमावास्या.

**२ री सखी**—आम्ही सिंहकटी तर ती मृदंगकटी.

**रंभा**—आमची चाल गजगती तर तिची चाल उंदगती.

**१ ली सखी**—आमचे दांत कुंदकळ्या तर तिचे दांत दुकानाच्या फळ्या.

**२ री सखी**—आमचे ओंठ तोंडल्यासारखे तर तिचे ओंठ बोंडल्यासारखे.

**रंभा**—फार तर काय ! आमचं बोलणं मंजुळ.

**१ ली सखी**—हसणं मधुर.

**२ री सखी**—स्वभाव शांत.

**रंभा**—खाणं बेताचं.

**१ ली सखी**—रहाणं गमतीचं.

**२ री सखी**—वागणं झोंकाचं.

**रंभा**—चालणं डौलाचं; अस्सं कित्ती कित्ती तरी सांगतां येईल. सारांश काय ! तुमची बायको हिडिंबा, तर आम्हि सगळ्या जणी प्रत्यक्ष रंभा. म्हणून म्हणतें, अशा सुंदर देहाच्या, पवित्र आचरणाच्या आणि निर्मळ अंतःकरणाच्या स्त्रियांचा, जर आपण अव्हेर केलात, तर आपण जन्माला येऊन कांहींच सार्थक केलं नाहीं असं होईल.

**तुका०**—तर मग, या जन्मीं आमचं घसरलंच; पण पांडुरंगानं पुनः आम्हाला जन्माला घातलंच, तर मातोश्री, आम्ही तुमच्याच सुंदर, निर्मळ आणि पवित्र उदरीं जन्म घेऊन जन्माचं सार्थक करूं. आइसाहेब, या आतां. आम्ही तुम्हांला निक्षून सांगतों कीं,--

पराविया नारी रुक्मिणी समान ।
तुका म्हणे आण विठोबाची ॥

**रंभा**—हाय, हाय ! कसली मी नीच, दुष्ट अधमाधम, चांडाळीण ! व्यर्थ, व्यर्थ, मी रांडेनं या महात्म्याच्या छळाची इच्छा धरली ! धिक्कार, धिक्कार असो माझ्या या जिण्याला. ( सर्वजणी तुकारामाच्या पायां पडतात. तुकाराम त्यांच्या पायां पडतो. ) महाराज क्षमा करा, क्षमा करा. आम्ही सर्वस्वी अपराधी आहोंत.

**पद**—( अब तूं मेरा मनमा, )

**श्रीगुरुराया सदया तुकया द्या अभय वरदान ॥**
**रूप यौवनें मदांध झालों गेलों विसरुनि भान ॥**
**हितबोधांजन घालुनि नयनीं हरिला तुम्हि अभिमान ॥**
**दुष्ट बुद्धिनें तुम्हासि छळिलें केला बहु अपमान ॥**
**परि बोधामृत पाजुनि आम्हां मार्ग दाविला छान ॥**
**तुम्ही माउली आम्ही मुली या हीन दीन अज्ञान ॥**
**यांतुनि तारा आणि उद्धारा करूं नका अनमान ॥**

**तुका०**—मातोश्री, उठा उठा; तुम्हाला अभय आहे. हें पहा, पूर्व जन्मींच्या कांहीं पातकामुळं तुम्ही या जन्मीं वेश्या झालांत, मग आतां आणखी पातकाचा संग्रह करून, पुढं कोणता जन्म मिळवणार ? म्हणून म्हणतों—अद्याप सावध व्हा. डोळे उघडा. पुढं काय होणार तें पहा. हें तुमचं सौंदर्य तरुणपणा पर्यंतच आणि तरुणपणा हाहि केवळ दोन दिवसांचाच. पुढं उतारवयांत पायांत नेट राहणार नाहीं, कमरेंत जोर राहणार नाहीं, हातांत तकवा राहणार नाहीं, छातींत उमेद राहणार नाहीं, ती तुमची मान, आपला अभिमान सोडून, नको हा प्राण असं म्हणूं लागेल; मग लोकांचे गळे कापून मिळवलेल्या संपत्तीनं, अंगावर टवटवी आणूं म्हणाल, तर सुरकुतलेल्या शरिरावर संपत्तीचा मुलामा चढणार नाहीं. जगांत तुमचं हसं होईल. लोक चेष्टा करतील. पोरंबाळं तोंडावर थुंकतील. तुमच्या अंगावर तुकतुकी आहे, तोंपर्यंत कुणिहि कुलुंगी कुत्र्याप्रमाणं

तुम्हाला मांडीवर खेळवील; पण पुढं, लूत भरलेल्या कुत्र्याप्रमाणं हडहड करतील. सारांश, तुमचं सुंदर आणि नाजुक शरीर, नाना प्रकारच्या रोगांनीं जर्जर होऊन जिवंतपणींच तुम्हाला नरकवास भोगावा लागेल ! आणि अखेरीस—

( अभंग. )

**काळाचि हे उडी पडेल बा जेव्हां ॥**
**सोडविना तेव्हां मायबाप ॥**
**सोडाविना राजा देशिंचा चौधरी ॥**
**आणीक सोयरीं भलीं भलीं ॥**
**तुका म्हणे तुम्हां सोडाविना कोणी ॥**
**एका चक्रपाणी वांचोनियां ॥**

**रंभा**—अहाहाहा ! महाराज, आमच्या नीचपणाचं असलं भयंकर चित्र, आमच्या डोळ्यासमोर आजपर्यंत कधींच कुणीं उभं केलं नाहीं. महाराज, आमच्या अघोर पातकाबद्दल, शेवटीं रौरव नर्कावांचून आम्हाला दुसरी गतिच नाहीं काय ?

**तुकाराम**—असं कां म्हणतां ? महानंदा आणि आमची कान्हुपात्रा, या कांहीं कुणी अग्निहोत्रि ब्राम्हणाच्या मुली नव्हत्या, त्या देखिल वेश्याच होत्या; मग त्यांचं नाहींका कल्याण झालं ? त्यांचा प्रत्यक्ष भगवंतांनींच उद्धार केला. त्या वेश्या असून त्यांच्या नामस्मरणानं साधुसंत उद्धरून गेले, आणि तेंच पवित्र कथामृत आमच्याकरतां त्यांनीं मागेंहि ठेवलं आहे. बाई, हा महिमा त्यांच्या सद्गुणाचा, त्यांच्या सद्बुद्धीचा, त्यांच्या सत्कर्माचा. त्यांना यजमान होते, तुम्हालाहि आहेत; मग त्यांना सद्गति कां, आणि तुम्हाला अधोगति कां, या पाहूं याचं उत्तर ?

**रंभा**—महाराज, आतां आमच्या तरणोपायाचा मार्ग आपणच सांगा, आणि आजपासून या शिष्यिणीकडून, आपण वाटेल ती सेवा घ्यावी.

**तुकाराम**—नको, नको. जो या जडदेहाविषयीं उदासी, अशा या दगडोबाची तुम्ही सेवा ती कसली करणार ?

**रंभा**—आम्ही आजपासून खांद्यावर पताका ठेवूं, हातांत टाळ घेऊं, पांडुरंगाचं भजन करूं, भजन रंगांत आपल्याबरोबर नाचूं, आणि आपण दमलांत, म्हणजे आम्ही आपले पाय देखिल चुरूं.

**तुकाराम**—पण या तुक्याला मुळिं कधीं श्रमच होत नाहींत, मग याचे पाय चुरण्यांत काय अर्थ? तुम्हांला व्यर्थ त्रास मात्र होईल, पण माझ्या पांडुरंगाच्या पायाला नुसता स्पर्श केलात, तर उद्धरून जाल. याच्या तोंडाकडे अहोरात्र पहात बसाल, तर कदाचित् डोळे फुटतील; पण माझ्या पांडुरंगाच्या मुखाकडे, प्रेमानं क्षणभर पहाल, तर तुमची दिव्यदृष्टि होईल. सारांश, या तुक्याकरतां तनमन झिजवलंत तर फुकट शीण होतील, पण माझ्या पांडुरंगासाठीं देह झिजवलात तर पांडुरंगस्वरुपि व्हाल. म्हणून म्हणतों, भक्तिभावानं माझ्या पांडुरंगाला शरण जा, त्याचीच सेवा करा, त्याचेच पाय चुरा, आणि त्याच्यावरच भाव ठेवा. म्हणजे—

**जेथें जाल तेथें तो असे सांगाती ॥**
**चालवील हातिं धरोनियां ॥**

**रंभा**—अहाहा! गुरुराज, हा आपला कळवळ्याचा उपदेश ऐकून, आम्हांला कृतकर्माचा पश्चात्ताप होऊन, लाज वाटूं लागली आहे. देवा, कुठं हे तुकाराम महाराज सद्गुरु आणि कुठं तें जनावर मंबाजी गुरू. गुरुराज, आपण आम्हांला ज्ञानामृत पाजून सन्मार्ग दाखिवलात; आतां हे उपकार आम्हीं कसे हो फेडूं?

**तुका०**—माझे कसले उपकार? कर्ता करिवता तो पांडुरंग आहे. तो तुमचं कल्याण करो. सदासर्वदा तुमचा पाठिराखा होऊन, तुम्हांला सद्गति देवो; जा. माझ्या पांडुरंगाचं भजन करा, आणि नेहमीं आपल्या मनाला हाच उपदेश करा कीं,—

**पद**—( सिताराम सिताराम, )

**"पांडुरंग श्रीरंग भजरे मना ॥ भजरे मना बा भजरे मना ॥ पांडुरंग० ॥ अमोलिक जातें वय ॥ आतां तरी धरि सोय ॥ असा काय मानवदेह**

**येईल पुन्हां ॥ पांडुरंग० ॥ विषयाचें सुख द्वाड ॥ येथें आहे बहु गोड ॥ पुढें आहे अवघड यमयातना ॥ पांडुरंग० ॥ रात्रंदिन करिसि मजा ॥ केव्हां येइल यमराजा ॥ घेउन जाइल प्राण तूझा ॥ निजसदना ॥ पांडुरंग० ॥ तुका ह्मणे एक करा ॥ हरि चरण दृढ धरा ॥ चुकेल चौऱ्यांशिंचा फेरा ॥ तुझिया प्राणा ॥ पांडुरंग० ॥"**

**रंभा—** **पद.**

**भज श्रीरंगा ॥ भज मन श्रीरंगा ॥ धरिं सत संग ॥ करि पाप भंग ॥ भज श्री०॥ सोड सोड या विलास ढंगा ॥ तोड तोड या विषयतरंगा ॥ यम मांडिल दंगा ॥ नातरी यम मांडिल दंगा ॥ मग तव कुणी न अशा प्रसंगा ॥ म्हणोनि अझूनि तरि हो जागा ॥ त्या शुभांगा ॥ पांडुरंगा ॥ निशिदिनिं नमूनि ॥ गुणगणि रमूनि ॥ गाइ अभंगा ॥ भज मन श्री० ॥**

(रंभा वगैरे भजन करीत गेल्यावर मंबाजी रागानं जाऊं लागतो व निजलेल्या जिजाइला पाय लागून अडखळून पडतो.)

**जिजाई—**(गडबडिनं उठून मंबाजिला धरते.) अग बाई! चोर, चोर, धांवा, धांवा–(मंबाजिला उशीनं धोपटते.)

**तुका०—**अग, अग, त्या म्हातारिला मारूं नकोस. ती पटकन मरेल बिचारी (तिला सोडवतो) आजिबाई! फार लागलं कांहो? (बुरखा काढतो व मंबाजीस पाहून) अरे वा! अग ए, ही आजिबाई नव्हे, हे आपले आजोबा आहेत, मंबाजीबोवा!

**जिजाई—**कोण, कोण? तो मेला बोकड मंब्या! अरे मेल्या मंब्या! साधूचीं ढोंगं करतां करतां, मेल्या आतां बायकांचीं सोंगं आणूं लागलास होय? बायल्या मेला! थूः तुझ्या तोंडावर. देऊं का एक मुस्कटांत भडकावून. (मारायला जाते, तुकाराम आडवतो.)

**तुका०—**अग थांबग. त्यांना मारूं नकोस. ते प्रसिद्ध साधू मंबाजिबुवा आहेत. बुवासाहेब, कशाला बरं ही लुगडं नेसून

तसदी घेतलीत ? तुम्हाला जर आमची परिक्षाच पहायची होती, तर आम्हाला तसं सांगायचं होतं. आम्हीच तुमच्या पायांशीं चालत येऊन, आपली छाती फोडून दाखिवली असती. आमच्या या देह-मंदिरांत पांडुरंगाशिवाय कुणाचंच वास्तव्य नाहीं. अग, जरा आंबे-हळद किंवा रघतबोळ आण पाहूं.

**जिजाई**—कशाला ?

**तुकाराम**—बुवांच्या पाठिला लेप द्यायला.

**जिजाई**—जळूं या मेल्याची पाठ. माझ्या घरीं कांहीं मिळा-यचं नाहीं. जातोस किं नाहीं रे भामट्या, का उपटूं दाढी ? ( दाढी उपटायला जाते तोंच मंबाजी पळून जातो ) हातू तुझं मढं गेलं पळपुट्या. भागुबाइ मेला. पळालास, म्हणूनच जिवंत सुटलास. हं. चला आतां घरांत. ( जांभई देते ) चला म्हणतेंना ?

**तुकाराम**—येतोंग. पण साधुसंतांना शिव्या देऊं नये. माण-साच्या हातून चूक होते; त्याबद्दल त्यांना मारून त्यांची दाढी उप-टलीस हें फार वाईट केलंस.

**जिजाई**—नाहीं, चांगलं केलं. मेला रात्रंदिवस आमची निंदा करित असतो. ( जांभई देते. )

**तुकाराम**—चाललंच आहे. ॥ **निंदकाचें घर असावें शेजारीं** ॥

**जिजाई**—( जांभई देत ) कशाला ? माझं तोंड नेहमीं वाजा-यला ? हँ–चला एकदांचे. ( जांभई देते. ) जांभया देऊन देऊन माझं तोंड फाटायची वेळ आली. ( तुकारामाला ओढीत नेते )

---

**प्रवेश ३ रा.—( स्थळ–रस्ता. )**

( रंभा व तिच्या मैत्रिणी येतात. )

**रंभा—** पद—( कैसी होरी खेलूंगी, )

**सोडवि सोडवि गिरिधारी तोडुनि खलजन संग ॥**
**ढंग हे तोडी ॥ निज भजनरंगिं दे गोडी ॥ मन पूर्ण**

**रंगवुनि सोडी ॥ सोडवि गिरिधारी तोडुनि० ॥**
**वैष्णव साजति तव गुण गाजति वाजति टाळ मृदंग ॥**
**वास घडो मन जडो त्या स्थलीं पडो झडो हें अंग ॥**
**आमुचें पडो झडो हें अंग ॥ देवा पडो० ॥**
**फिरति चहुंकडे सदां वांकडे दुर्जनरूपि भुजंग ॥**
**त्यांस निवारी तारी तारी कैवारी श्रीरंग ॥ आमुचा०॥**

**मंबाजी**—( मंबाजी धांवत येऊन रंभेचा हात धरतो. ) सोडीं ! आतां कुठं सोडीं ? चांगलं कंबरडंच मोडीन. रांडे रंभे, त्या तुक्याच्या ढोंगाला भुलून संतिण बनलीस नाहीं का ? थांब, अगोदर तुझं नाक कापतो. नि त्यांत चांगलं मीठ भरतों.

**रंभा**—मंबाजीबुवा, तोंड आंवरून बोला बरं. आतां जर तोंड मोकळं सोडाल तर चांगलीच खरडपट्टी काढीन.

**मंबाजी**—खरडपट्टी ! माझी खरडपट्टी ! ! या श्रीमंबाजीबुवा-महाराजांची खरडपट्टी ! ! ! आणि ती तूं हलकट रांड करणार ?

**रंभा**—हो, हो. तोंडांत शेण घालणार. तुम्हीच नाहीं का, तुकाराम महाराजांना भ्रष्ट करायला मला पाठवलं ?

**मंबाजी**—पुन्हां माझं नांव–पुन्हां माझं नांव घेतेस ? तुला तसं करण्याबद्दल श्रीमारुतिरायाची आज्ञा होती.

**रंभा**—हो. तुमच्यासारख्या रंडिबाज मारुतिची आज्ञा असेल.

**मंबाजी**—हं, खबरदार; उर्मटपणानं तोंड वर करून बोलशील तर, मी महारुद्र खवळलों तर एकेकीचं कंबरडंच मोडून टाकीन.

**१ ली सखी**—नि आम्ही आपल्या पायांतलीं खेटरं कांहीं घरीं नाहीं विसरलों; असल्या दळभद्र्या महारुद्राची तेव्हांच खेटरपूजा करूं.

**२ री**—तुम्ही पुरुष आहांत, म्हणून कदाचित् दोन तडाखे अधिक माराल, पण आम्ही सगळ्याजणीं उलटलों, तर एकाच खासड्यानं, तुमचं थोबाड लाल करून तुम्हांला बजरंग बनऊं.

**रंभा**—समजलं का बुवासाहेब ! विंचवाची नांगी एवढिशी असते; पण ती मोठ्या विषारी सापालाहि घायाळ करते.

**१ ली**—सनकाडी लहान असते, पण ती घरंच्या घरं जाळते

**२ री**—फासाची दोरी बारिक असते, पण ती धिप्पाड दरोडे-खोरांचा प्राण घेते.

**रंभा**—तसंच, आम्ही रांडा कवडि किंमतिच्या टिमक्या दिसतों; पण तुमच्यासारख्यांच्या बेअब्रूचा डांगोरा पिटतांना, नगाऱ्यापेक्षांहि मोठ्या होतों.

**मंबाजी**—(स्वगत) अरेच्या! या रांडा तर अगदीं एकेरीवर आल्या! मला मुळिंच भीत नाहींत; पण मी भितों हें यांना कळतां कामा नये.

**रंभा**—कां गुरगुरू? आतां थोबाड बंद कां झालं? तुमच्या हलकटपणाचा सगळ्या गांवभर वाजवूं का डंका?

**मंबाजी**—अग जा. तुझ्यासारख्या हलकट बायकोच्या बोलण्या-वर विश्वास ठेवायला, लोक कांहीं मूर्ख नाहींत. या श्रीमंबाजीबुवांची किर्ती, बुवांचं वैराग्य, बुवांचं साधुपण, यावर सगळ्या जगाचा विश्वास आहे. अग, प्रत्यक्ष रामेश्वरशास्त्री देखील मला सत्पुरुष समजतात.

**१ ली सखी**—आणि तुम्हां दोघांनाहि, आम्ही आमचे जोडे उचले समजतों. तुम्ही चोर नि तुमचा थोरला भाऊ रामेश्वरभट दरोडेखोर.

**२ री**—नाहीं तर काय? या मेल्याला नायकिणी आवडतात, नि त्या मेल्या रामेश्वर शास्त्र्याला गरती आवडतात.

**रंभा**—अगदीं खरं, शास्त्र्याचं शास्त्र, पुराणिकाचं पुराण, हरदासाचं कीर्तन, नि तुम्हां ढोंग्यांचीं सोंगं सगळीं बायकांपुढंच.

**मंबाजी**—अरेच्या! हिचं तोंड फारच सुटलं. आतां अधिक उणं बोलशील, तर खाडकन् मुस्कटांत भडकावून डोळ्यांपुढं काजवे आणीन.

**रंभा**—आणि मी कमी करीन. मलाहि आपलं अवसान एकदां अजमावून पहायचंच आहे. ये पाहूं मेल्या लफंग्या पुढं, किं तुझी बत्तिशिच रंगवतें. ( मारायला जाते. )

**मंबाजी**—( स्वगत ) अरे बापरे! हिची तर मारामारीपर्यंत तयारी दिसते, आतां आपणच जरा आटोपतं घ्यावं. (उघड) असं काय बरं रंभाजी, या महापवित्र ब्राह्मणाचा तूं कांहींच मान ठेवित नाहींस.

**१ ली**—कसलारे मेल्या तूं ब्राम्हण? तुझं तोंड घुबडासारखं अमंगळ, म्हणून तूं ब्राह्मण?

**२ री**--किं आचरण मांगासारखं करतोस, म्हणून तूं ब्राह्मण ?

**रंभा**—का स्नानसंध्येच्या ऐवजीं तुकाराम महाराजांच्या नांवानं बोटं मोडतोस, म्हणून तूं ब्राह्मण ?

**रंभा**--का कुटाळक्या करीत शेण खात गांवभर फिरतोस, म्हणून तूं ब्राह्मण ? तर मग खरं खरं पाहिलं तर एका अर्थी माझ्या तुकाराम महाराजांनाच ब्राम्हण म्हणतां येईल. त्यांच्या तुटक्या खेटराची किंमत तुला यायची नाहीं. अरे, ते शांतिचे सागर तर तूं घाणेरडं डबकं.

**मंबाजी**--( स्वगत ) हॅट !

**१ ली**--ते वैराग्याचे सुवर्णमेरु तर मेल्या तूं उकिडर्यांचा ढीग.

**मंबाजी**—( स्वगत ) शि-शि-शि !

**२ री**--ते आनंदाचे कल्पतरु तर ढोंग्या तूं एरंडाचं झाड.

**मंबाजी**—( स्वगत ) अरेच्या !

**रंभा**--त्यांच्या वाणींत उपदेश तर अघोऱ्या तुझ्या वाणींत घाण.

**मंबाजी**—( स्वगत. ) थूः थूः थूः थूः

**१ ली**—ते समाधानाची पोळी खातात. तर कुत्र्या, तूं विषयाचीं हाडकं चघळतोस.

**मंबाजी**—( स्वगत ) अरे राम, राम, राम !

**रंभा**—सारांश, तुकाराम महाराज पवित्र गंगाप्रवाह आहेत, तर बोकडा तूं एक घाणेरडा नाला आहेस. तूं माकडानं त्यांची बरोबरी काय करावीस ?

**मंबाजी**—अग चल. साबण लाऊन धुतलं, म्हणून गाढवाचं घोडं थोडंच होणार आहे.

**१ ली**—आणि माग घर करून, तुझ्यासारखं गाढव कितीहि खिंकाळलं, म्हणून तुला सूर्याचा घोडा का कुणि म्हणणार आहे.

**२ री**—तूं दगड्या कुंभाराचं गाढव आहेस तूं तुकोबाला डोक्यावर घेऊन, विठ्ठल विठ्ठल करितंच नाचलं पाहिजे. तें सोडलं नि मेला साधू बनला आहे साधू.

**१ ली**—साधूचं कोणतं लक्षण तुझ्या अंगीं आहे? ही-ही-ही दाढि वाढवलीस, म्हणून तूं साधू ? मग तो बोकड कां नाहीं साधू ?

**२ री**—रुद्राक्षाच्या माळा घातल्यास म्हणून तूं साधू ? मग घुंघुरमाळा घातलेला तो नंदिबैल कां नाहीं साधू ?

**मंबाजी**—( दिमाखानं ) अग होहो. तुला 'साधु' शब्दाचा अर्थ तरी ठाऊक आहे ? 'सा' म्हणजे सहा रिपु ज्यानं धुवून टाकले आहेत तो मी साधु समजलीस ?

**१ ली**—मेल्या, सहा रिपु तर धुतले नसशील, पण साऱ्या रांडांचीं लुगडीं मात्र धूत असतोस खास.

**२ री**—अगदीं खरं. मेल्याच्या भक्तिणी पहाव्या तर रांडा, दृष्टि बघावी तर सदा बायकांकडे, शिष्य बघावे तर सगळे भामटे, उनाडटप्पू—

**रंभा**—आणि हा मेला गळेकापू—

**मंबाजी**—बरं बुवा, तसंच कां होइना. मी कसाहि असलों, तरी पण रंभाजी, मी तुझा गुरु आहे ना ?

**रंभा**—होय, पण हें ओढाळ गुरूं आतां भलतिकडेच तोंड घालूं लागलं, म्हणून त्याच्या नाकांत मी वेसण घालणार आहें !

**मंबाजी**—छे: तूं तर मला बोलूंच देत नाहींस. मग मी आतां कसं करूं म्हणतेस ?

**रंभा**—मला मातोश्री म्हणून, माझ्या पायांवर डोकं ठेवलं पाहिजे.

**मंबाजी**—डोकं ठेवलं पाहिजे? आणि तें मातोश्री म्हणून ? छे: बुवा! हा फारच मोठा अपमान! फार तर पा-यां प-ड-तों; पण मातोश्री कसं म्हणूं ग ?

**रंभा**—आतां मुकाट्यानं मी सांगितलं तसं करतोस, का लोकांना जमवून तुझ्या तोंडावर थुंकायला लावूं ? बाबासाहेब, अहो काकासाहेब—

**मंबाजी**—अग, अग, जरा थांब तरी. (स्वगत) पस्तावंच झालं पाया. या दोघि चौघिशिवाय इथं कोण पहायला आलं आहे ? कुणी पाहिलंच

तर त्यांचे डोळे फोडरे बाप्पा बजरंगा. ( उघड ) जय आई मातोश्री, क्षमा कर. मी पुन्हां कधीं तुझ्या वाटेला जाणार नाहीं. ( मोठ्या कष्टानं पाया पडतो. )

**रंभा**—जा आतां मुकाट्यानं. पुन्हां असं कधीं बायकोचं सोंग घेऊं नकोस. साधुसंतांचा छळ करूं नकोस. आई–बहिणींची ओळख ठेव. आणि—

पद—( मज सोडुनि जातां, )

**रंभा—जा येथुनि चांडाळा न दावीं वदन मला ॥**
**रे खल कुटिला ॥**
**मंबा०—मच करूं कोपा धरि अनुकंपा स्मरुनि आपुल्या वचनाला ॥**
**रंभा—रे खलकुटिला ॥ जा येथुनि० ॥**
**मंबा०—नसोनि कारण उगाचि दूषण लाविसि ब्राह्मण निजगुरुला ॥**
**रंभा—रे खल कुटिला ॥ जा येथुनि० ॥**
**तव जळो गुरूपण अभद्र लक्षण येई समजुन सकलांला ॥ रे खल कुटिला ॥ म्हणोनि मी तुज कथितें हितगुज सद्भावें भज तुकयाला ॥**
**मंबा०-प्राणांतिहीं तें नच होई परि तव पायीं हा जडला ॥**
**रंभा—धिःक्कार तुला ॥ जा० ॥**

( सर्वजणी त्याचा धिःक्कार करित निघून जातात. )

---

## प्रवेश चौथा—( तुकारामाचें घर. )

( तुकारामाचा मुलगा मुतखड्यानं आजारी असून जिजाई त्याची दृष्ट काढते आहे. )

**जिजाई**—इडापिडा टळो, अमंगळ जळो, कुणा पापि चांडाळाची दृष्ट दूर पळो. ( दृष्ट काढून बाहेर टाकायला जाते, तों पंडितराव सईबाई, हिरोजी वगैरे दिसतात ) अगबाई ! हो तुम्ही ! इतक्या

रात्रीं इथं कशाला आलांत ! चोरी करायला ! माझ्या नवऱ्याला आणखी खुळा करायला ? अँ ! चला व्हा मेल्यांनो चालते.

**पंडि०**—मातोश्री, आपण आम्हाला ओळखलं नाहीं. आमच्यापैकीं हे शिवाजीमहाराजांचे जामदार हिरोजी फर्जंद.

**हिरोजी**—हे न्यायशास्त्री पंडितराव.

**पंडित०**—आणि या आमच्या मातोश्री–शिवाजी महाराजांच्या धर्मपत्नी आहेत.

**जिजाई**—खरं किं काय ! मला अवदसेला मुळिं धीरच नाहीं. कुणाला काय बोलावं याचा मला सुमारच रहात नाहीं. बाई रागावूं नकाहो, मी जरा फटकळ तोंडाची बायको आहें. ये बाई, अशी घरांत तरी ये आधीं; मी तुझी दृष्ट काढतें. ( सईबाईला हातीं धरून जातां जातां ) आणि तुझी सासू तरी कशी दीड शहाणी ! भरल्या सरल्या घरांतून सुनेला रात्रिचं बाहेर पाठिवणं म्हणजे मूर्खपणाच हा !

**सई०**—सासूबाईंना आपण दोष देऊं नये. निरुपायच झाला, म्हणून त्यांनीं मला आपल्याकडे पाठिवली आहे.

**जिजाई**—माझ्याकडे ! माझ्याकडे कशाला मरायला पाठवली आहे ! मी कांहीं आमच्या खुळ्याप्रमाणं, साधूचीं ढोंगं माजावित नाहीं; किं कुणाला उपदेश करित नाहीं. हो, नाहीं म्हणायला, माझ्याजवळ मंगळाइचा अंगारा असतो, म्हणून माझ्याकडे पाठवली असेल. तर मग ये बाई, घरांत तरी ये; तुला माझ्या मंगळाइचा अंगारा लावतें. ( पदराचा आंगारा सोडून लावते. ) सांग पाहूं आतां, कां आली होतीस ?

**पंडि०**—मातोश्री, कांहीं जरुरीचं काम असल्यामुळं, तुकाराम महाराजांच्या दर्शनाकरतां वयनीसाहेब आल्या आहेत.

**जिजाई**—चुलित गेलं त्यांचं दर्शन. अहो, त्यांना लागलं आहे खूळ, आणि तुमच्या मूर्खपणाला काय म्हणूं ! त्या शिवाजी राजाला दर्शनाला आणून त्याची तश्शी वाट लावलीत, आणि आतां हिला दर्शनाला आणून कोणत्या मुलखावर धाडणार ? कांहो पंढरिभाऊ,

आमच्या खुळ्याप्रमाणं, तुम्हां सगळ्या पुरषांना चळ भरला किं काय ! मला तरी सांगा. म्हणजे एकूण एक सगळ्या पुरषांच्या कानशिलावर डाग तरी देतें.

**पंडि०**—तसं नव्हे मातोश्री. आमच्या शिवाजी महाराजांनीं वैराग्य घेतल्यामुळं, आमच्या राज्याचा पाया ढांसळला आहे, तो बेमालूम बसवावा, अशी प्रार्थना करण्याकरतां, आम्हीं तुकाराम महाराजांकडे आलों आहोंत.

**जिजाई**—पंढरिभाऊ, तुम्हि तरी आपले चावटच दिसतां हो. एवढे शिवाजी राजाचे सरदार म्हणवतां, नि तुमची अक्कल कुठं चुलींत गेली ? अहो, आमच्या या पिसाटाच्या हातून, असे राज्याचे आणि घराचे पाये जर मजबूत बसायला लागले, तर आमच्या हातांत झोळी, नि आमचं घर चंद्रमौळिं कां ? अहो, आमच्या या खुळयानं, ढुंगणाचं सोडून डोक्याला गुंडाळलं आहे. तसं तुम्हाला करायचं आहे ? माझं ऐकायचं असेल तर माझ्या मंगळाइचं नांव घ्या, आणि हा माझ्या मंगळाइचा आंगारा राजाच्या कपाळीं लावा. ( अंगारा देऊं लागते पंडितराव हसतो.) हंसतां काय ? माझ्या मंगळाईचा तडाका तुम्हाला ठाऊक नाहीं वाटतं ? हं. घ्या आंगारा, नि लावा आपल्या कपाळाला ( लावतात ) पण तसं कशाला ? शिवाजीराजे, आतां आमच्या पिशाची भाकडकथा ऐकायला येतील; ते आले- म्हणजे राणीसाहेब, बेलाशक त्यांचा हात धरा, नि फरफर ओढित घरीं घेऊन चला.

**सई०**—छेः बाई ! अशी दांडगाई केली, तर आमची चांगली पूजाच करतील.

**जिजाई**—मग, तुमचं तोंड कुठं शेण खायला गेलं आहे ? माझं तोंड पहा बरं, कसं फटाफट फटाफट फुटाणे भाजतं आहे तें. अहो, या पुरुषांना माझ्यासारखा सवाई सोट्याच भेटला पाहिजे. मी तर आमच्या खुळ्याचा पिच्छा पुरवतें, म्हणून ते माणसांत तरी आहेत. नाहींतर मलासुद्धां कोणा चोरापोराला विकून टाकायचे. अहो, बायकापोरांच्या नावानं बोंब मारून बसलों आहें, असंच ते नेहमीं म्हणतात.

**सई०**—बरं पण ते आत्तां आहेत कुठं ?

**जिजाई**—( वैतागून ) मरणांत आहेत ! त्या मेल्या विठ्याच्या नांवानं बोंबलत, एखाद्या देवळांत बसले असतील.

**सई०**—तर मग सासूबाई, कसंहि करून मला त्यांचं दर्शन करवाहो ! मी तुमच्या पायां पडतें, पदर पसरतें, नाक घासतें, मला सौभाग्यदान द्याहो ! ( पायां पडते. )

**जिजाई**—उठा, उठा, रडूं नका. या पोराला माझ्या मंगळाइचा अंगारा लावतें, घटकाभर गुण पडतो किं नाहीं ते पहातें, नाहींतर एका हातांत जोडा नि एका हातांत या कारट्याची तंगडी धरून, त्या विठ्याला बडवायला|निघतें, तेव्हां तुम्हीहि निघा माझ्याबरोबर, म्हणजे देतें धरून तुमचा नवरा. ( मुलाला अंगारा लावून सईबाईसह औषध उगाळीत बसते तोंच तुकाराम भजन करीत येतो. )

**तुका०**— ( येग येग विठाबाई, )

**घेइ घेईं माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥**
**तुम्हि घ्यारे डोळे सुख । पहा विठोबाचें मुख ॥**

( सईबाई, पंडितराव वगैरे पायां पडतात, तुकारामहि उलट पायां पडतो. )

**नित्य तुम्ही ऐका कान । माझ्या विठोबाचे गुण ।**
**मना तेथें धांव घेईं । राहे विठोबाचे पायीं ॥**
**तुका म्हणे माझे जीवा । नको सोडूं त्या केशवा ॥**

**जिजाई**—( एका हातांत जोडा व दुसऱ्या हातांत मुलाची तंगडी धरून ओढीत ) नाहींच सोडणार त्या केशवा. या जोड्यानं त्या केश्याचं थोबाडच फोडतें. ( तुकाराम तिला आडवतो व मुलाला मांडीवर घेतो. )

**महा०**—( कुंथत ) आई, त्या केशाचं खुशाल थोबाड फोड, पण सध्यां मला तर सोड. केशाचं प्रायश्चित्त म्हाद्याला कां ?

**जिजाई**—कां म्हणजे ? ( म्हाद्याच्या पाठींत धपका मारून ) अलबत देईन. आज चार दिवस झाले, माझं पोरं मुतखड्यानं तळमळून सारखं ठणाणा करतं आहे.

**तुका०**—त्या पोराला मुतखडा झाला आहे, म्हणून त्या बिचाऱ्याचा ठणाणा घरांत तरी चालू आहे; पण तुला कांहीं बाधिक भरली नसतां तुझा धिंगाणा गांवभर चालू आहे.

**जिजाई**—आणि अजून तरी कुठं संपला आहे ? जेव्हां त्या विठ्याच्या डोक्यांत घालीन जोडा, तेव्हां माझा जीव थंड होइल थोडा.

**तुका०**—पण, आधीं तो जोडा बाहेर फेंक पाहूं. ( तुकाराम जोडा फेकतो. ) माझ्या पांडुरंगाचे पाय जोडायचे सोडलेस, आणि गोम्या चांभाराचं हें तुटकं खेटर जोडलंस, तेव्हां काय म्हणावं तुला ?

**जिजाई**—मला विन अकली म्हणा पाहिजे तर, पण त्या पोराचं दुखणं माझ्यानं कांहीं पहावत नाहीं.

**तुका०**—पाहवत नाहीं, तर आमच्या जवळ औषध मागा. महादेवा, हें पांडुरंगाच्या पायाचं तीर्थ घे पाहूं; हेंच आपलं रामबाण औषध. ( तीर्थ पाजतो ) पोटच्या आजारी पोराला फराफर ओढित घेऊन चाललीस, या तुझ्या ममतेच्या झपाट्यानं त्या पोरानं वाटेंतच डोळे पांढरे केले नाहींत हें नशिब म्हणायचं ?

**महा०**—(उडी मारून) आई-आई, आतां मी साफ बरा झालों.

**जिजाई**—होणारच. माझ्या मंगळाइचा अंगारा जेव्हां तुझ्या कपाळीं लावला, तेव्हांच मीं भाकित केलं होतं, कीं घटकाभऱ्यानं तुला गुण पडलाच पाहिजे. हो, बरी आठवण झाली. त्या शिवाजी राजाची, वाट तरी काय लावलीन ? ही पहा, एवढ्या मोठ्या राजाची राणी-पण आम्हां भिकारड्यांच्या घरीं येऊन माझ्या पायां देखिल पडली, नि मला म्हणाली, 'सासूबाई' चुलींत गेली रांड सासुबाई ! मोठ्या आर्जवानं मला म्हणाली, " सासूबाई मला सौभाग्यदान द्या. " आतां तिला नवरा आणून देऊं कुठचा नि तिचे रडून रडून सुजलेले डोळे पुसूं तरी कुठवर ! ( सइबाईला ओढून ) ये बाई अशी, फोड यांच्या पायांवर डोकं. पण थांब, तुला माझ्या मंगळाइचा अंगारा लावायला विसरलेंच. ( पदराची गांठ सोडून अंगारा लावते व सईबाई तुकारामाच्या पाया पडते. )

**तुका०**—( तुकाराम उलट पाया पडतो ) पांडुरंग, पांडुरंग, मातोश्री, पांडुरंगावर विश्वास ठेवा.

**जिजाई** - ( सइबाईला मागं ओढून ) नका हो त्या फसव्यावर विश्वास ठेवूं. त्या मेल्या बहुरुप्याचे चाळे तुम्हाला समजायचे नाहींत. ते माझे मीच जाणें. तुम्ही यांच्याच पुढं डोकं फोडून आपला नवरा परत मागा. ( शिवाजी येतो त्याला पाहून ) पण तसं कशाला ? ते-पहा-शिवाजी राजे इकडेच येताहेत, धरा त्यांना नि अस्सेच्या अस्से परत फिरवा.

**सई**--( शिवाजीच्या पायांला मिठी मारून ) आतां कांहीं झालं; तरी हे पाय म्हणून मी सोडायची नाहीं.

**शिवा०**—अरेच्या ! कुठंहि जा, पण तिथं मायेचा प्रवेश नाहीं असं ठिकाणंच नाहीं. हेंच पहाना-पांडुरंगाच्या मंदिरासारखा दुर्भेद्य किल्ला, त्याला लागून इंद्रायणीसारखा खंदक, सद्गुरु तुकाराम महाराजांसारखे जागते पाहरेकरी, इतकी जय्यत तयारी इथं असतां पुन्हां आपली दुष्ट माया हजरच ! राणीसाहेब, आमच्या मार्गांत तुम्ही कितीहि मोठमोठ्या धोंडी आणून ठेवल्या, तरी आपल्या बाहु-बलानं, हा शिवाजी त्या धोंडी अशा बाजूला सारील. ( सईबाईला बाजूला ढकलून तुकारामाचे पाय धरतो. ) महाराज—

**जिजाई**—( सईबाईला सावरून तिचे डोळे पुशीत ) मसणांत गेले महाराज ! राजे, तुम्हि तरी अगदीं कसाई आहांत हो ! सोन्या-सारखी पोर, इतक्या लांब चालत येऊन जवळ आली, नि तिला तुम्हि अशी ढकलून दिलीत ? म्हणावं काय तुमच्या अक-ळेला ! इश्श ! असली अरेरावि मला नाहीं खपायची. मनुष्यानं अगदींच जगांतून उठूं नये.

**शिवाजी**—मातोश्री, सर्वांनींच भंडावून सोडल्यावर माणसानं जगांतून उठूं नये तर काय करावं ? या मायाममतेनंच तर आज-पर्यंत सर्वस्वी घात केला आहे. म्हणूनच—“ **आम्ही विठ्ठलाचे दास झालों आतां ॥ नको मायाममता आणिकांची** ” ॥ असं तुकाराम महाराज म्हणतात.

**जिजाई**—ते झक्क मारतात. त्यांना काय धोंडे कळतं. अहो, असलीं फुसकीं कवनं मी सुद्धां घटकेंत शंभर करतें. हसुं नका. तुम्हाला थट्टा वाटते होय? ऐका हवंतर माझं कवन—

( जात्यावरचें गाणें )

**मंगळाइच्या दरबारिं ग ॥ मायाममता आहे सारि ग ॥ माझि हैस झाली बरि ग ॥ नवसानेग नवसानेग नवसानेग ॥ माझा नवरा झाला वेडा ग ॥ त्याच्या पायीं घाला खोडा ग ॥ जिजाईच्या पायिं तोडा ग ॥ सोनियाचा ग । सोनियाचा ग । सोनियाचा ग ॥**

अहो असले यांचे अभंग. तेव्हां यांच्या नादिं कशाला लागतां, नि आपला संसार बुडवून भीक कशाला मागतां?

**तुकाराम**—राजे, आमच्या कुटुंबाचं कीर्तन तुम्ही ऐकलंतच, आतां आम्ही काय म्हणतों तें ऐका. कौरव-पांडवाचं युद्ध व्हायच्या पूर्वी, दोन्ही सैन्याच्यामधें भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाचा रथ उभा केला, त्यावेळीं तुम्ही होतांच. सांगा पाहूं, त्यावेळीं काय काय झालं, आणि भगवंतांनीं काय काय सांगितलं तें?

**जिजाई**—त्यांनीं आपलं डोंबल सांगितलं. पण तुम्ही राजांना काय सांगतां तें आधीं सांगा.

**शिवाजी**—कौरव सैन्यांत आपले आप्त-इष्ट-मित्र पाहून, अर्जुनाला मोह उत्पन्न झाला, "आणि आप्त-बांधव मारून मला हें राज्यवैभव नको, मी आजन्म वनवासांत राहीन, पण युद्ध करणार नाहीं" असं म्हणून अर्जुनानं आपलं गांडिव धनुष्य खालीं टाकलं.

**जिजाई**-( तुकारामास ) तें धनुष्य गेलं चुलींत, पण आधीं राजांना मनुष्यपण सांगा.

**तुका०**—पुढं, अर्जुनाचं अनाठायीं वैराग्य पाहून भगवान् श्रीकृष्णांनीं अठरा अध्याय गीता सांगितली. त्यांतलेच कांहीं शब्द आम्ही तुम्हांला सांगतों. आम्ही आपल्या गांठचं कांहीं सांगत नाहीं. तर—

संतांचीं उच्छिष्टें बोलतों उत्तरें ॥
काय म्यां गव्हारें जाणावें तें ॥
तुका म्हणे मज बोलवितो देव ॥
अर्थ गुह्य भाव तोचि जाणे ॥

**शिवाजी**—महाराज, आपली वाणी अभंग असून, शिरसावंद्यहि आहे. आपण उपदेश करावा, मी अनुग्रहाला पात्र आहें.

**तुका०**—शिवबा, राजे शहाजी आणि मातोश्री जिजाबाई, यांच्या क्षात्रवीर्यापासून तुमची उत्पत्ति आहे. अर्थात् तुम्हीं मनानं, गुणकर्मानं, जातीनं, कुलानं, क्षत्रिय आहांत. तुमच्या हातून आपल्या क्षात्रधर्माचा भंग झाल्यास भगवंताची आज्ञा मोडल्याचं पातक लागेल. म्हणून म्हणतों, तुम्ही हल्लीं स्वीकारलेलं कर्म तुमचं नाहीं. तुमचं कुल, तुमचं बीज, तुमची वासना, आणि तुमचा स्वभाव, हीं पूर्णपणें क्षात्रधर्माचीं आहेत. तुम्हीं आपला धर्म मोडून महापापाचे अधिकारी होऊं नका.

**शिवाजी**—हें काय महाराज! माझं मन भगवत्‌चिंतनाकडे वळवून, मोक्षाचा खरा मार्ग आपणच दाखिवलात; पण तो मार्ग पापाचा म्हणतां, आणि मला पुन्हां संसारांत पडण्याविषयीं उपदेश करतां, याचा अर्थ काय?

**तुका०**—राजे, उगाच भलत्याच शंका घेऊन, आडमार्गानं जाऊं नका. भगवंतानं जो राजमार्ग तुमच्यापुढं ठेवला आहे, त्याच मार्गानं जाऊन, अंबरीष, जनक, धर्म, इत्यादि राजांप्रमाणं राजर्षि व्हा. त्यांतच तुम्हांला इहलोकीं कीर्ति आणि परलोकीं मोक्ष मिळणार आहे. पण मातोश्रीचं मन मोडून तुमचं कल्याण होणार नाहीं. पत्निला नाखुष करून तुम्हांला पुण्य मिळणार नाहीं. इष्ट–मित्रांना सोडून देऊन तुम्हांला स्वर्गप्राप्ति व्हायची नाहीं. या सर्वांना संतुष्ट करून, त्यांचे धन्यवाद जेव्हां मिळवाल, तेव्हांच तुम्हांला सद्गति मिळेल. कुटुंबाची दैना करणं, हा केव्हांहि पुरुषार्थ नाहीं.

**जिजाई**—ध्या! आणि यांनीं आपल्या कुटुंबाची वाताहात चालवली आहे, हा मात्र मोठा पुरुषार्थ आहे. काय बघा, " लोकां सांगे ब्रह्म ज्ञान आणि आपण मेले कोरडे पाषाण."

**तुका०**—असो. शिवबा, तुम्ही आपला स्वभाव धर्म विसरून गेलां होतां, पण तुम्हाला आम्ही तुमचं खरं खरं स्वरूप दाखवून दिलं आहे. आतां तुम्ही हा हीन वेष टाकून, खऱ्या स्वरूपाला योग्य, असा पूर्वींचा राज वेष परिधान करून, आपल्या क्षात्र कुलाचं ब्रिद संभाळा. पंडितराव, शिवबाला राजवेष परिधान करवा, ( शिवाजी वेष बदलण्यास जातो. )

**जिजाई**—( सईबाईस ) झालं बाई तुझ्या मना सारखं? मिळाला तुला नवरा. माझ्या मंगळाइच्या अंगाऱ्याचा गुण आलाच पाहिजे.

**तुका०**—अग ए, जरा इकडे ये पाहूं. राजे शिवाजी आपल्या घरीं सहकुटुंब आले आहेत; तर घरांतून त्यांनां कांहीं प्रसाद आणून दे पाहूं.

**जिजाई**—ध्या! एकादशीच्या घरीं शिवरात्र. आपल्या घरांत काय धोंडे आहेत म्हणून ते आणूं?

**तुका०**—धोंडे नकोत ग, ते आपल्या घरींच ठेवा; केव्हां तरी उपयोगी पडतील.

**जिजाई**—हो, माझ्या मड्यावर घालायला. मग आतां माझे हात पाय तोडून त्यांना प्रसाद द्या.

**तुका०**—छे, छे. तुझ्या हाता पायांचा प्रसाद तुझ्या मुलांना रोज मिळाला पाहिजे, नाहीं तर त्यांना चुकल्यासारखं होऊन तीं रोडावतील. घरांतले सर्व कोनेकोपरे नीट कुत्र्याप्रमाणं हुंगून पहा, म्हणजे कांहीं तरी सांपडेल.

**जिजाई**—त्यापेक्षां घराला आग लावून तुम्हीच त्या उजेडांत पहा, म्हणजे कांहीं तरी सांपडेल.

**तुका०**—अरे हो! खरंच, तो पहा–पांडुरंगापुढं नारळ दिसतोय. तोच आणून राणीसाहेबांना दे.

**जिजाई**—राणीसाहेबांना काय भीक लागली आहे ? तो नारळ वरणांत घालायला होईल. ( नारळ घेऊन जाऊं लागते. )

**तुका०**—( नारळ हिसकाऊन ) वेडिच आहेस. आण इकडे. ( नारळ सईबाईच्या ओटींत घालतो सईबाई दोघांच्याहि पाया पडते ) आतां, राजेसाहेबांना प्रसाद द्यावा कसला ?

**जिजाई**—( वेडावून ) त्यांच्या गळ्यांत झोळी अडकवलीत नेवढा प्रसाद पुरे झाला.

**तुका०**—अग ए, तें–तें–तें काय दिसतं आहे बरं ?

**जिजाई**—ती तुम्हाला गिळायला दिलेली दुपारची शिळी भाकर आहे.

**तुका०**—अरे वः बरंच झालं. तीच भाकर राजांना प्रसाद म्हणून दे.

**जिजाई**—आतां काय करूं तुमच्या या वेडेपणाला ! आतां किं-माहीं तुमच्या कानशिलावर डाग देऊन, तुम्हाला खोलींत कोंडून ठेवले पाहिजेत. कोंड्या मांड्याच्या शिळ्या भाकरीचा तुकडा, त्या राजाला द्यायला सांगता ? बाई, बाई, बाई ! आतां हा तुमचा वेडे-पणा वाढणार तरी किती नि माझ्या मंगळाइचा आंगारा वरचेवर लावु तरी किती ? ( तुकारामास आंगारा लावते )

**तुका०**—कुठची मंगळाई आणि भुंगळाई घेऊन बसली आहेस ग !

**नव्हे जाखाई जोखाई ॥ मायराणी मेसाबाई ॥**
**रंडि चंडि शक्ती ॥ मद्य मांसातें भक्षीती ॥**
**वेताळें फेताळें ॥ जळो त्यांचें तोंड काळें ॥**
**जो या देवांचाही देव ॥ बळिया माझा पंढरिराव ॥**
**तुका म्हणे चित्तीं ॥ धरा रखुमाईचा पती ॥**

**जिजाई**—( वेडावून ) त्याच्या तोंडांत पडो माती ! माझं काय जातं, शिळी भाकरीच देतें. ( शिवाजी येतो. ) घे बाबा ही भाकरी

आणि मोड शिळे तुकडे. ( भाकरीचे तुकडे शिवाजीच्या पदरांत टाकते. )

**तुकाराम**—बरं शिवबा, तुम्ही आतां मातोश्रींच्या दर्शनाला चला कसे. पंडितराव, शिवबाच्या प्रयाणाची तयारी तुम्ही केली असेलच. राजे, तुम्हाला मी शेवटचं इतकंच सांगतो, कीं—

**आत्मारामीं मन ठेवुनियां राहें ॥**
**रामदासीं पाहें आपणें या ॥**
**तुका म्हणे राया धन्य जन्म क्षितीं ॥**
**त्रैलोकीं हे ख्याती कीर्ति तुझी ॥**

**शिवाजी**—महाराज, आपली आज्ञा शिरसावंद्य आहे. येतों आतां आम्हीं. पण पुन्हां एकदां, पांडुरंगाच्या नामसंकीर्तनानं आमचे कान पवित्र व्हावेत अशी इच्छा आहे.

**तुका०**—ठीक आहे. पांडुरंगानं तुमच्या संबंधाचं आमच्यावरचं मोठंच अपेश टाळलं. तेव्हां, चला सर्वजण पांडुरंगाच्या चरणाजवळ, आणि करूं या त्याच्या नांवाचा जयजयकार. (सर्व जातात. )

**जिजाई**—( सई बाई जाऊं लागते तिला परत फिरवून, ) तुम्ही नकाहो त्या पांड्याच्या नादीं लागूं. तुम्ही आपल्या चला घरांत. मी तुमच्या करतां लसणीची चटणी वाटतें, बाजरिची भाकर भाजतें, तुम्हाला जेऊं घालतें, माझ्या मंगळाइचा आंगारा लावतें, ओटी भरतें नि मग तुम्हाला वाटेला लावतें.

**सई०**—तर मग सासूबाई, तुम्ही-आम्ही बरोबरच भाकर खाऊं.

**जिजाई**—छे. छे! तेवढं मात्र बोलूं नका! मी जरी फटकळ तोंडाची गांवढळ बायको आहे, तरी माझ्या नवऱ्याला जेवायला घातल्याशिवाय, मी तोंडात पाणी देखिल घेत नाहीं. अहो तिन तिन चार चार दिवस उपास काढतें. याला साक्ष माझ्या सासरचा खंडोबा नि माझी माहेरची मंगळाई आहे बरं. ( जातात )

---

## प्रवेश ५ वा. स्थळ–विठ्ठलमंदिर.

(शिवाजी व इतर लोक बसले असतां तुकारामाचें कीर्तन सुरू आहे.)

**तुका०–"गोपाळकृष्ण । राधा कृष्ण ॥**
**श्रीकृष्णाप्रती । गोपाळ बोलती ॥**
**सकळ । न कळसी तूं अकळ ॥**
**अहा हा हा हा हा ॥ गोपाळ० ॥**
**कान्होबाचि संगती । ब्रह्मादिक इच्छिती ॥**
**धन्य आम्हां म्हणती । अहाहाहाहाहा ॥ गोपाळ०" ॥**

**पंडित०**—(गडबडिनें येतो) महाराज, महाराज! चाकणच्या किल्लेदारानं पाळत ठेवून, आपल्याला धरणं पाठिवलं आहे. त्यांच्या लोकांनीं मंदिर पुरं वेढलं नाहीं, तोंच या चोरवाटेनं वहिनीसाहेबांना घेऊन आपण निसटून जावं. आमचा प्राणान्त होइपर्यंत, तुकाराम महाराजांची आपण काळजी करूं नये. मात्र, महाराजांनीं आतां त्वरा करावी; प्रसंग मोठा आणिबाणिचा दिसतो!

**शिवाजी**—आणखी–अशा आणिबाणिच्या प्रसंगीं, मला इथून पळून जायला सांगतां? छे, छे. पंडितराव, तुम्ही या शिवाजिला अजून ओळखलं नाहीं. तुमच्यासारखे जिवाला जीव देणारे साह्यकारी मित्र, परमपूज्य तुकाराम महाराजांसारखे सद्गुरू, आणि भजनरंगांत दंग असलेले भाविक हरिभक्त. यांचे प्राण शत्रूंच्या हातिं देऊन, आपल्या क्षुद्र देहाची पर्वा धरून, एखाद्या नामर्द, बेहिमती, पळपुट्या, शेंदाड शिपायाप्रमाणं, आपल्या नांवाला, कुलाला, ब्रिदाला, कलंक लावून, आपलंच काळं तोंड घेऊन, कल्पांतिंहि पळून जाणारा हा शिवाजी नव्हे, हें पक्कं लक्षांत ठेवा. कुडींत प्राण असेपर्यंत, हजारों शत्रूंशीं मी एकटाच झुंजेन. इतकंच नव्हे, तर माझी गर्दन छाटली गेली, तरी नुसत्या धडाकडून शत्रूला लोळवीन, तेव्हांच मी आपले प्राण विसर्जन करीन.

**तुकाराम**—वाहवा! वाहवा!!
**"केशियासि मारिलें ॥ शकटासि चूर्ण केलें ॥**
**दोन्हि वृक्ष उन्मळीले ॥ अरेरेरेरे! गोपाळ० ॥"**

**पंडित०**—महाराजांनीं असं साहस करूं नये. शीर सलामत तर पगड्या पंच्यायशीं.

**शिवाजी**—कोणत्या काळतोंड्या नामर्दांच्या डोकीवर, मग त्या पंच्यायशीं पगड्या घालायच्या ? पंडितराव, मी तुम्हाला निक्षून सांगतों, कीं धरूं आलेल्या सर्व शत्रूंचीं शस्त्रंच काय, पण प्रळयकाळचा विद्युल्लोळ जरी माझ्या डोक्यावर पडला, तरी जोपर्यंत, तुकाराम महाराजांच्या मुखांतून, पांडुरंगाचं नामसंकीर्तन, माझ्या कानीं पडत आहे; तोंपर्यंत मी कसल्याहि, संकटाची पर्वा न करतां, इथून एक पाऊलसुद्धां मागं घेणार नाहीं. आज एकादशी पुण्यकाळ आहे, हजारों वैष्णव माझ्या सन्निध आहेत; अशावेळीं, पांडुरंगाच्या किर्तनांत, मला मरण आल्यास, माझ्यासारखा भाग्यवान्, पुण्यवान्, त्रिभुवनांतहि कोणी नाहीं असं समजून, मी मोठी धन्यता मानीन. पांडुरंगाच्या अतुल सामर्थ्यावर माझा पूर्ण भरंवसा आहे.

**तुका०**—अहाहा ! गोड !! गोड !!!

**" अजगर मारिला ॥ वणवाहि ग्रासिला ॥ गोवर्धन उचलीला ॥ अबबबबब ! गोपाळकृष्ण ॥ राधाकृष्ण० " ॥**

**शिवा०**—झालं तर मग. त्या प्रचंडशक्ति परमेश्वराला अशक्य काय आहे ? भक्तांना उपसर्ग होऊं नये, म्हणून ज्यानं समुद्रांत द्वारका वसवून, त्यांचं रक्षण केलं, त्याच दयाळु गोपाळकृष्णाला, आज आपल्या भक्तांचं रक्षण करतां येणार नाहीं किं काय ? महासमर्थ, वैराग्य-शाली, अशा तुकाराम महाराजांच्या मुखांतून निघालेलं, प्रेमळ नामसंकीर्तन ऐकायला, भगवान् रुक्मिणीपती या ठिकाणीं उभे आहेत. खुद्द भगवंतच म्हणतात–' **माझे भक्त गाती जेथें ॥ पांडवा मी उभा तेथें** ' ॥ त्यांचा विरस होऊं नये, म्हणून त्यांचं सुदर्शन, प्रत्येक भक्ताभोवतीं त्यांच्या रक्षणार्थ फिरत आहे. अशा वेळीं, काळाचा काळ जरी या ठिकाणीं आला, तरी त्याला सुद्धां आपलं तोंड लज्जेनं काळं करून परत जावं लागेल, मग इतरांची काय कथा ?

**तुका०**—योग्य ! योग्य !!

**" मामा मारुं गेलासी ॥ आपटिलें गजासीं ॥**
**मल्लयुद्ध खेळसी ॥ हुतुतुतुतु ॥ गोपाळ० " ॥**

**शिवा०**—महाराज, कां, थांबलांत कां? नामामृताचा अखंड प्रवाह असाच चालूं द्या; अमृतानं कधींच नाश होत नाहीं.

**तुका०**—शिवबा, तुम्ही म्हणतां तेंच खरं आहे.

> **फुटो हें मस्तक तुटो हें शरीर । नामाचा गजर सोडूं नये ॥ नाशिवंत देह झाला जरि भंग ॥ तरि किर्तनरंग सोडूं नये ॥ तुका म्हणे ऐसा नामिं ज्या निर्धार ॥ तेथें निरंतर देव असे ॥ गोपाळ कृष्ण ॥ राधा कृष्ण० ॥**

( तोंच किल्लेदाराचे शिपाई गडबडिनं धांवत येतात. )

**१ ला शिपाई**—चलो, पकडो, सबको कैद करो. किदर है वो सेवाजी? ( शिवाजी पळून गेल्याचा भास होतो ) ओहो! वो देखो, वो काफर सेवाजी भागता है. ए बदमाष, हमारे सामने कहां भाग जायगा? चलो, दौडो, पकडो. ( धांवत जातो. )

**तुका०**—

> " **ऐसे तूझे पोवाडे ॥ ब्रह्मादिक झाले वेडे ॥**
> **विष्णुदास नामा म्हणे ॥ अहाहाहाहाहा! गोपाळ०" ॥**

**१ ला शिपाई**—(मायावि शिवाजीला पकडून आणून आनंदानं) अच्छा हुवा ! ए सैतान सेवाजी मिलगया ! अब, बादशाहाके तरफसे, सरदार नहीं तो नहीं, लेकिन दरकदार तो जरूर बनजांयगे !

**२ रा शिपाई**—( दुसऱ्या बाजूनें दुसऱ्या मायावी शिवाजीला पकडून आणून फुशारकीनें ) ओहो! बहोत खूब ! बडे बडे सरदारोंके काबूमें, जो आज दिनतक नहीं आया, वो सैतान सेवाजी मैंनें पकडके लाया. अबी जिस किल्लेमें सेवाजी गिरफदार, उस किल्लेका मैं बी किल्लेदार बनजाउंगा !

**१ ला शिपाई**—अबे ए, सैतानखां किल्लेदार, ए देख, मैने सेवाजिकूं गिरफदार करके लाया है! ( शिवाजीस दाखवतो. )

( दोघेहि आश्चर्यानें दोन्ही शिवाजींनां निरखून पाहतात. )

**२ रा शिपाई**—( दुसरा शिवाजी पुढं करून ) ए बेवकूब हैवानखां, सेवाजी तो येहि है. तुम अंधे तो नहीं ?

पुणे ... नारायण ... पुणे २.

**१ ला शिपाई**—अबे अंधेके गद्धे, यहां देख सिधे सिधे. ये सेवाजी नहीं, तो क्या तेरा बावाजान है ? ( पहिल्या शिवाजीला पुढं करतो.)

**२ रा शिपाई**—क्यंरे काफर, तुम् कौन है ?

**२ रा शिवाजी**—मी शिवाजी आहें.

**१ ला शिपाई**—क्योंबे बदमाष, तुम् कौन है ?

**१ ला शिवाजी**—मी शिवाजी आहें.

**१ ला शिपाई**—ये क्या आफत है ! ए सैतान सेवाजी है तो बी कितने ! ( दोन्ही शिवाजीस निरखून पाहून ) दोनोबि एकसारिखे दिखतें है. नहीं, नहीं, हमारा सेवाजी सच्चा है,

**२ रा शिपाई**—नहीं, नहीं. हमारा सेवाजी सच्चा है. तुम् झूटा है. ( तुम् हैवान है, तुम् सैतान है, तुम् बदमाष है, असं म्हणून दोघेहि भांडतात व हातघाईवर येतात. )

**कोतवाल**—(तिसऱ्या मायावि शिवाजीच्या मागून धांवत येतो.) ए सैतानखां, ए हैवानखां, ऐसे आपसमें झगडते क्यों ? दौडो, दौडो. वो देखो सेवाजी भागता है.

**१ ला व २ रा शि०**—अजि वो कहां है ? कहां है ? दौडो–पकडो– ( असं म्हणून तिघेहि मायाबि शिवाजींच्या पाठिमागं धांवत जातात. )

**तुका०—ऐसे तुझे पोवाडे ॥ ब्रह्मादिक झाले वेडे ॥**
**विष्णुदास नामा म्हणे ॥ अहाहा हा हा हा ॥**
**गोपाळकृष्ण ॥ राधाकृष्ण ॥**

( देवळाच्या आसपास जिकडेतिकडे सर्व शिवाजी दिसूं लागतात, तोंच कोतवाल वगैरे येतात. )

**कोत०**—( चकित होऊन )तोबा ! तोबा ! इनशाल्ला ! लाहोल-बिला ! जहां देखना वहां सेवाजीहि सेवाजी दिखतें हैं. ( किर्तनांत बसलेले सर्व लोक शिवाजीसारखे दिसतात. ) इधर तो सेवाजिकी पलटण दिखती है; ये साले सैतान सेवाजी है तोबी कितने ? अब किसकूं पकडना ! और किसकेसाथ झगडना ! ( आश्चर्यानें उभे राहतात व तुकारामासह सर्व कीर्तनांत तल्लीन होतात. )

# अंक तिसरा.

## प्रवेश १ ला.—स्थळ–रस्ता.

( मंबाजी शिष्यांसह भजन करीत येतो. )

**मंबा०—** पद ( सबसे रामभजन, )

**सद्गुरु नाम निरंतर घेईं ॥ मनुजा राहीं गुरुपायीं ॥**
**सगेसोयरे बाइलपोरें मायबाप भाई ॥**
**दोदिवसांचे असती साचे जिविंचे कोणी नाहीं ॥ मनुजा०॥**
**उगाच रडसी कां धडपडसी बुडसी भवडोहीं ॥**
**बोध परिसुनी करी शोध मनिं अजुनी सावध होई ॥ मनु० ॥**
**जाळिल पोळिल काळ खुळया मग पळसि कुण्याठायीं ॥**
**हृदय कळवळे ह्मणुनी बोले मंबाजि गुरुमायी ॥ मनुजा० ॥**

**रंभा—**(संतिणीच्या वेषानं भजन करीत येते. )

**निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई ॥**
**एकनाथ नामदेव तुकाराम गुरू तुकाराम ॥**
**तुकाराम गुरू तुकाराम ॥**

**मंबा०—**( रंभेला आडवून ) चल हो दूर. आली " ग्यानबा तुकाराम " करीत, अपशकुन करायला पुढं.

**तुंबा०—**पण गुरुजी, ती आपली रंभा आहे रंभा !

**मंबा०—**क्षकू मारते ती रंभा. आम्हाला तिच्याशीं काय कर्तव्य आहे ? आम्हीं स्नान–संध्या करून नगर–प्रदक्षणेला निघालों आहोंत, हें दिसत नाहीं ? एक वेळ कुत्रं शिवलेलं पत्करेल, पण अशा अमंगळ माणसाचं आम्हांला दर्शनहि खपणार नाहीं.

**तुंबा०—**( स्वगत ) कांहीं दिवसांपूर्वीं आलिंगन खपत होतं.

**मंबा०—**आणि मुमुक्षुजनांना तरी आम्हिं काय सांगतों ? कीं–

**वाटेंत न हो वो वेश्येचें दर्शन ॥**
**मंबाजीची खूण ध्यानीं राहो ॥**

**तुंबा०**—( स्वगत ) **वाटेंत न होवो वेश्येचें दर्शन ॥**
**एकांतिं भेटेन ध्यानीं राहो ॥**

**रंभा— हरिजनाची कुणा न घडावी निंदा ॥**
**साहत गोविंदा नाहीं त्याचें ॥**

( बाजूनं जाऊं लागते. )

**मंबा०**—( आडवा येऊन ) अरेच्या ! अंगावरून, पुन्हां आमच्या अंगावरून जातेस ? आम्हीं कोण आहोंत ? बेशरम ! जगद्वंद्य, जगन्मान्य, राजमान्य, लोकमान्य, साधुमान्य, सर्वमान्य—

**तुंबा०**—( स्वगत ) सर्वसामान्य, रांडापोरं मान्य.

**मंबा०**—असे आम्ही, श्रीमंबाजीबुवा-महाराज आहोंत, हें तूं विसरलीस ?

**रंभा**—छे, छे. तें मी कसं विसरेन. तुम्हांला मी चांगली ओळखतें. आणि म्हणूनच म्हणतें, कीं मुकाट्यानं माझी वाट सोडा.

**मंबा०**—नाहीं सोडित. या वाटेनं आम्हीं सत्पुरुष चाललों आहोंत हें दिसंत नाहीं ? ( पुन्हां आडवा होतो. )

**रंभा**—पण ही वाट, सत्पुरुषांनाच कोणी आंदण का दिली आहे ?

**मंबा०**—( रागानं ) तुझ्या बापानं दिली आहे.

**रंभा**—बुवासाहेब, आपल्या सारख्यांनीं असं बोलूं नये.

**मंबा०**—( अधिक चिडून ) अलबत बोलणार ! काय करणार तूं ? तूं आमचं काय करणार ?

**रंभा**—मी काय करणार ?

**मंबा०**—तूं काय करणार ? ( असं म्हणून मुद्दाम तिच्या अंगावर धांवून धांवून जातो, तोंच रामेश्वरशास्त्री व संन्याशी येतात. )

**रामेश्वर**—अरे, अरे, अरे ! बुवासाहेब, ही काय भानगड ?

**मंबा०**—(भाषणाचा रोख बदलून) कोण ? शास्त्रिबुवा ? यतिमहाराज ! बरे वेळेवर आलांत ! तुम्हींच आतां समक्ष पहा ! हे सगळे खेळखंडोबा त्या तुक्याचे ! जिथ्थं तिथ्थं बेटा आम्हाला अस्सा नडतो आहे.

या असल्या हलकट लोकांना बगलेंत घेऊन, गुलाम आमची पदोपदीं मानखंडना करतो आहे. हेंच पहाना, त्याच्या कुशितलं ( रंभेवर खेंकसून ) हें-हें-हें-रांडरू, आम्हाला भररस्त्यांत विचारतं, कीं " हा रस्ता तुम्हांला कोणी आंदण दिला आहे का ? " सांगा आतां. आमचं साधूपण आणखी ब्राम्हणपण कुठं राहिलं ?

**तुंबाजी**—( स्वगत ) चवाठ्यावर आलं.

**संन्याशी**—अब्रह्मण्यम् ? अब्रह्मण्यम् ! हा कलियुगाचा परिणाम बरं ! या कलियुगांत ब्राह्मण्याला कुणी विचारणारच नाहीं, असं मुळिं भविष्य-पुराणान्तरींच म्हटलं आहे जेहैते !

**रामेश्वर**—( गर्वानं ) असेल कोणी मूर्खानं म्हटलं. पण आम्हीं आतांपासूनच क्षुद्रांना असे भिऊन वागूं लागलों, तर आजच जगाचा अंत होणार ! कायग ? तूं म्हणजे शास्त्रभ्रष्ट, धर्मभ्रष्ट, मतिभ्रष्ट, तनुभ्रष्ट, अशी अपवित्र वेश्या आहेस. तुझ्या तोंडचे अमंगल शब्द, आम्ही वेद-शास्त्र-संपन्न, धर्म-कर्म-परायण, महा-पवित्र ब्राह्मणांनीं ऐकून घेणं, म्हणजे महत्पाप ! महत्पाप ! ! महत्पाप ! ! !

**संन्याशी**—नारायण ! नारायण ! ! नारायण ! ! !

**मंबाजी**—उघडच आहे. आमच्या तोंडाला तोंड भिडवतेस ?

**तुंबाजी**—( स्वगत ) आणि भर रस्त्यावर असं करतेस ? एकांतांतली गोष्ट निराळी !

**मंबाजी**—आमचीं तोंडं म्हणजे तूं काय समजतेस ?

**तुंबाजी**—( स्वगत ) पिंकपात्र समजते.

**रामेश्वर**—अग, आमच्या तोंडांतून जो शब्द निघेल, तो वेद-वाक्यासारखा पवित्र असला पाहिजे ! प्रत्यक्ष भगवंताला सुद्धां आमचा शब्द मोडतां येणार नाहीं !

**संन्याशी**—ब्रह्मदेवाला खोडतां येणार नाहीं !

**मंबाजी**—महादेवाला तोडतां येणार नाहीं !

**तुंबाजी**—( स्वगत ) मारुतिला चावतां येणार नाहीं !

**रामेश्वर**—त्या-आमचा शब्द, तूं-यःकश्चित् बाजार बसवी-तूं मोडशील, तर भयंकर पापाची अधिकारी होशील !

**मंबाजी**—महाशापाला पात्र होशील. तूं कोण ? तूं आपल्याला कोण समजतेस ? तूं म्हणजे चोर, जार, चेट, वीट, नट, यांचं थुंकण्याचं पिंकपात्र आहेस.

**रंभा**—असं खरंना; मग विनाकारण तें पिंकपात्र, आपल्या पवित्र अंगावर कां ओतून घेतां ? जाऊं द्या मला. ( जाऊं लागते. )

**संन्या० रामे०**—कुठं जाऊं द्या ! थांब. म्हणे जाऊं द्या ! ( दोघेहि तिला आडवतात. )

**तुंबाजी**—( स्वगत ) अरे, अरे, अरे ! या गुलामानीं तर आट्यापाट्यांचा डाव सुरू केला.

**रामे०**—पण, आमचा तुला असा प्रश्न आहे, कीं—तूं आमच्या बुवासाहेबांच्या वाटेला गेलीस कां ? ते किती पवित्र आहेत हें तुला दिसत नाहीं ? त्यांचं कडकडित वैराग्य तुला ठाउक नाहीं ? कां ? आतां कां बोलत नाहींस ?

**रंभा**—तुम्हींच सांगितलंना, किं अवाक्षर सुद्धां बोलूं नको म्हणून.

**रामे०**—अग पण, तुझा नि आमच्या मंबाजीबुवांचा काय संबंध ?

**रंभा**—संबंध ! सांगतें पाहिजे तर सगळा संबंध !

**तुंबाजी**—( स्वगत ) सांग, सांग लौकर. गुरुजींची अब्रू घेउंद्या उकिडर्यावर.

**मंबाजी**—( स्वगत ) अरेच्या ! ही रांड आतां मागचं पुढचं सगळं बडबडते किं काय ?

**रामे०**—सांग कायतो संबंध ! (असं म्हणून रामेश्वरशास्त्री रंभेला खोदून खोदून विचारतो व आपलं बींग फुटूं नये म्हणून मंबाजी रामेश्वराला दाबतो.)

**मंबाजी**—शास्त्रिबोवा, तुम्हीं तिच्याशीं काय बोलतां, आणि तिला विचारतां तें काय ? तुम्हीं आपले इकडे या. जाउद्या तिला. अहो, हें सगळं त्या तुक्याचं स्तोम आहे स्तोम !

**तुंबाजी**—( स्वगत ) आणि इथंच तर आमच्या गुरुजींची गोम आहे गोम.

**मंबाजी**—काय ग, आमच्या तोंडाकडे पहात कां उभी राहिलीस ? चल, नीघ इथून.

**रंभा**—जातें बापडी. चला, जावंच इथून. " असंगाशीं संग नि प्राणाशीं गांठ. "

**तुका म्हणे देवा जळो हे संगती ॥**
**नाहीं लाज चित्तीं निर्लज्जांतें ॥**

( जाऊं लागते तोंच तुकाराम अभंगांच्या वह्या डोकीवर घेऊन येतो, रंभा त्याच्या पायां पडते व अभंगांच्या चोपड्या आपल्या डोक्यावर घेते. तें पाहून मंबाजी अधिक चिडतो. )

**मंबाजी**—( शास्त्रिबुवास ) पाहिलंत, पाहिलंत. इतका वेळ इथं आपण उभे असतांना, आपले पाय सोडून ही रांड त्या कुणबटाच्या पायां पडते. आम्ही म्हणजे तिच्या मतें जणूं काय–' दर्यामें ख़सखस.'

**तुकाराम**—( सर्वांच्या पायां पडून ) पांडुरंग, पांडुरंग, पांडुरंग.

**मंबा०**—( तिरस्कारानं ) नव्हे. बजरंग, बजरंग, बजरंग.

**तुका०**—शास्त्रिबुवा, पाटिलबुवांच्या घरीं आपण आज्ञा केल्याप्रमाणं, या अभंगांच्या वह्या इंद्रायणींत बुडवायला चाललों आहें.

**रामे०**—बरं केलंस. एकूण एक अभंग, जितकं कवित्व केलं असशील तितकं, सर्व बरोबर घेतलं आहेसना ?

**तुका०**—जी. ( लवून होय म्हणतो. )

**मंबा०**—तुंब्या, पहा–पहारे तें दफ्तर सोडून.

**तुंबा०**—( दफ्तर सोडून पाहून. ) गुरुजी, हा वेळपर्यंत केलेलं कवित्व तर बरोबर घेतलंच आहे, पण पुढं होणाऱ्या कवित्वाचं साहित्य, म्हणजे–शाईचं मडकं, पिंजलेले बोरू, मोडक्या बोथट लेखण्या, कागदाचीं चिटोरीं, पाठखर्डे, हिराच्या काड्या, फळकटाचं पुष्टिपत्र हें सुद्धां बुडवायला बरोबर घेतलं आहे. तेव्हां कवित्व करणाऱ्या, तुकोबांना तर बुडवायला नको ना ?

**मंबा०**—अरे, तुक्यालाच काय ! पण त्याला लिहिणं, वाचणं शिकवणाऱ्या, तात्या पंतोजिलाहि बुडवलं पाहिजे.

**तुका०**—सांगाल तर धांवत जाऊन, तात्या पंतोजिलाहि आणतों बुडवायला. ( जाऊं लागतो )

**मंबा०**—चूप रहा गुलामा, किती वटवट करशील.

**तुका०**—राहिलं. ( स्वगत ) " **गुरुजी ह्मणे चूप्प रहावें ॥ जें जें होइल तें तें पहावें.** "

**रामे०**—( अभंगांच्या वह्यांचा अस्ताव्यस्त पसारा पाहून ) तुकाराम, हा काय फाजीलपणा लावला आहेस?

**तुका०**—मूर्खांचा बाजार आहे हा ! शहाण्यानं त्यातलं गिऱ्हाईक व्हा कशाला ?

**मंबा०**—( दांत ओंठ खाऊन ) कसा टोंचून बोलतो आहे, कसा टोंचून बोलतो आहे पहा गुलाम ! आणि या अभंगांतसुद्धां लेकाचा काय म्हणतो—" **वेदाचा तो अर्थ आम्हासींच ठावा ॥ इतरांनीं वहावा भार माथां** " ॥—कशी घमेंड आहे पहा ! हरामखोराचे दाखवायचे दांत निराळे, आणि चावायचे दांत निराळे ! दिसायला साधु पण आंत पक्का भोंदू !

**संन्या०**—अहो कसला आला आहे साधु ? साधूचं कोणतं ल[illegible]ण तुझ्या अंगीं आहे रे? असा कोणता जय तूं केला आहेस? तप कसं करायचं हें तुला ठाउक तरि आहे ? अष्टांगयोगसाधन, ध्यान धारणा समाधी, या शब्दांचा अर्थ तरी तुला कळतो? कळत असेल, तर कर पाहूं आमच्याशीं वाद. होउं दे तुझ्याकडूनच पूर्वपक्ष. ना[illegible] ! नारायण ! !

**तुका०**—महाराज, **कुणबियाचे वंश[illegible] घातलें जगदीशा ॥ संस्कृत भाषा आम्हा कैंची ॥**

**मंबा०**—बरोबर. तुझी योग्यताच नाहीं, वेदांत-विषयावर बोलण्याची आणि वेदोच्चारहि करण्याची.

**तुका०**—खरं आहे. **वेद आम्हा[illegible]री रुसूनियां गेला ॥ आम्हीं त्याच्या बाला धरिलें हातीं ॥**

**मंबा०**—( चिडून ) कसं, कसं, कुजकं बोलतो आहे ! पण कायरे, संत संत म्हणून जो तूं आपला डांगोरा पिटतो आहेस, तो तूं संत

कसला? तुला संत केलं कोणीं? तुला संतपणा आला कशामुळं? काय? वेडया वांकडया चार ओळी जुळवल्यास, म्हणून तूं संत?

**तुका०—नव्हती ते संत करितां कवित्व ॥**
**संतांचे ते आप्त नव्हति संत ॥**

**रामे०**—असं सरंना? मग तूं आपल्याला महंत म्हणवून, हें-हें-हें रांडापोरांचं संताळं कसलं गोळा केलं आहेस? सत्पुरुष व्हायला काय लागतं, हें तुला ठाउक तरी आहे? इकडे बघ. या श्रीमंबाजिबुवांकडे बघ, त्यांच्या डोळ्यांकडे बघ—

**तुंबाजी**—( स्वगत ) कसे विषयाच्या धुंदिनं चढले आहेत बघ.

**रामे०**—त्यांच्या वेषावरूनच त्यांचं साधुपण दिसून येतं.

**मंबाजी**—( संन्याशाकडे बोट करून ) आणि यांच्या या तेजा-वरूनच यांचं परब्रह्म-नारायणस्वरूप समजून येतं.

**संन्यासी**—( रामेश्वराकडे बोट करून ) आणि यांच्या कांति-वरूनच यांचं विद्वत्व दिसून येतं. हे रामेश्वरशास्त्री, म्हणजे प्रत्यक्ष सेतुबंध-रामेश्वराचाच अवतार!

**रंभा**—अहाहा! काय पण एकमेकांची स्तुति चालली आहे? अथवा बरोबरच आहे-

**वांझेनें दाविलें गऱ्हार लक्षण ॥**
**चिरगुटें घालून फळ काय ॥**

**मंबाजी**—तूं कशाला-तूं कशाला, मधें मधें बोलतेस?

**रंभा**—कां बोलूं नये? डोमकावळ्यासारखे, चोंहीं बाजूनं तुम्ही आमच्या आंगावर तुटून पडलां, तरी आम्ही बोलूं नये?

**रामे०**—मुळिंच बोलूं नये. आणखी आमच्या बुवासाहेबांशीं, इतका अति परिचय करायला, तुझी वरचेवर छाति तरी कशी होते? त्यांच्या तपोतेजाचं तुला कांहींच भय वाटत नाहीं? अग, त्यांचा भव्य देह पहा. आंगलट पहा. पाणिदार डोळे पहा. कपाळ पहा. तोंड पहा-

**रंभा**—ते सगळं तुम्हीच पहा. शास्त्रिबुवा, या मंबाजीबुवांना मी आजच ओळखत नाहीं बरं! देउंका त्यांच्या परिचयाची ओळख?

**रामे०**—दे पाहूं ओळख. (असं म्हणून रंभेला पुन्हां खोदून विचारतो, व मंबाजी त्याला दावतो.)

**मंबाजी**—पण शास्त्रिबुवा, तुम्हीं सत्पुरुषांचा महिमा तिला काय विचारतां? तुम्हि मुळीं तिच्याशीं बोलूंच नका.

**तुंबाजी**--(स्वगत) हो. बोलाल तर गुरूजींचं बिंग बाहेर पडायचं!

**मंबाजी**—तुम्ही आपले मूळ मुद्यावर या. आणखी हें पहा.

(तिघेजण आपसांत खलबत करतात).

**तुंबाजी**—(स्वगत) सगळे गुलाम भामटे जमले आहेत.

**रामे०**—रास्त आहे. तुकाराम, तुम्हां लोकांशीं हुज्जत घालायला आम्हांला सवड नाहीं. पण आमची तुला अशी आज्ञा आहे, कीं तूं रचलेलं हें भारूड आतांच न बुडवतां काळोख पडल्यावर बुडीव.

**तुकाराम**—जशी आज्ञा. काळोख पडल्यावर बुडवतों.

**संन्याशी**—कां म्हणून नाहीं विचारलंस?

**तुकाराम**—तें कशाला विचारूं? आपली आज्ञा वायफळ थोडीच असणार आहे?

**माझा स्वामी तुमची वागवितो लाथ ॥**
**तेथें मी पतीत काय आलों ॥**

**रामे०**—हें तुझं पांडित्य नको आहे. तूं दिवसा अभंग बुडवलेस, तर तुझे तेली, तांबोळी शिष्य तुला आडवे येतील, किंवा साळी, माळी, कोळी, बुडि मारून ते अभंग पुन्हां बाहेर काढतील. तेव्हां तें नाहीं उपयोगाचं. रात्रीं बुडिव.

**तुका०**--बरं आहे, रात्रीं बुडवतों.

**तुका म्हणे तुम्हीं देवांद्विजां वंद्य ॥**
**मी तो काय नींद्य हीन याती ॥**

(अभंगाच्या वह्या डोकीवर घेऊन जाऊं लागतो.)

**संन्या०**—आणखी अगए, कोण रांड आहे कुणाला ठाऊक!

**रंभा**—मी तुकोबाची शिष्यीण आहें.

**संन्या०**—का तुकोबाची नायकीणं आहेस. पण ए, अभंग बुडवल्याची गोष्ट खबरदार बाहेर फोडलीस तर. ही आज्ञा मोडलीस, तर आमच्याशीं गांठ आहे. नारायण! नारायण!! (मारण्याची भीति घालतो.) समजलीस!

**रंभा**—समजलें, समजलें बरं!

**दोदिसांचा पाहुणा चालतो उताणा ॥**
**कांरे नारायणा न भजसी ॥**

जिरेल मस्ती. चला महाराज.

**तुका०**—चला-( जातां जातां. )

**लोह परिसाशीं रूसलें ॥ सोनेंपणासीं मूकलें ॥ येथें कोणाचें काय वा गेलें ॥ ज्याचें त्यानेंच अनहित केलें ॥**

**मंबा०**—( वेडावून ) अरे समजलें, समजलें. चल, चालता हो--

पद ( दिलदार दिलारा, )

**कर कृष्णवदन हें ॥ तन मन मम बघ तुजसि बघोनि जळे ॥**
**घडी घडी किति तरि फिरति फिरति नव ढंग तुझे ॥**
**नव रंग तुझे । हें तन मन मम बघ तुजसि बघोनि जळे ॥**

**तुकाराम**—

**परम सुखद होवो तो तुम्हां श्रीमुरारी ॥**
**तळमळ तव मनिची घालवो आज सारी ॥**
**मरण मजसि दे, या रक्षुनी सज्जनांसी ॥**
**चरणिं नमुनि हेंची मागणें विठ्ठलासी ॥**

( तुकाराम व रंभा जातात. )

**मंबाजी**--बस्स. ठरलं तर शास्त्रिबुवा, अस्संच करायचं. ‘लकडिशिवाय मकडी वळत नाहीं’ हेंच खरं. बरं तुंबाजी, हे आमचे शास्त्रिबुवा नि यतिमहाराज यांच्या संबंधानं तुमं कसं काय मत आहे?

**तुंबाजी**—( स्वगत ) ते अगदीं नीच आहेत ( उघड ) माझं गरिबाचं कसलं मत. ते आपल्या सारखेच मला दिसतात! ( स्वगत ) बदमाश.

**रामे०**—खरं आहे. अर्थात्, आम्ही सर्व तुला गुरुस्थानीं आहोंत.

**तुंबाजी**—हो हो तर. ( स्वगत ) पण इतक्या गुरांनां बांधायला दावीं कुठचीं आणूं ?

**मंबाजी**—तेव्हां काय समजलास ? तुला ठाउकच आहे, कीं मी आतां लौकरच संन्यास घेऊन काशियात्रा करणार आहें.

**तुंबाजी**--इतक्यांतच ?

**मंबाजी**—अरे बाबा, आतां हे मायापाश तोडून, पुढली कांहीं-तरी व्यवस्था लावली पाहिजेना! त्याशिवाय मोक्ष कसा मिळतो ?

**तुंबाजी**--( स्वगत ) मला सांगा. तुमचा कपाळ मोक्ष मी करतों!

**मंबाजी**—तेव्हां तुला मठाधिपति करून, आपल्या बजरंग मठाची मालकी, मी तुझ्या स्वाधीन करणार आहें.

**रामेश्वर**--परंतु, बजरंग हें दैवत, मोठं जाज्वल्य असल्या कारणानं, त्याचा उपासकहि तसाच जाज्वल्य असला पाहिजे.

**तुंबाजी**--त्याची नको तुम्हांला काळजी. मारुतिनं एकट्या रावणाचीच दाढी जाळली, पण मी तर इथून तिथून-( मंबाजिच्या दाढीला हात लागलासें दाखवून ) सगळ्यांच्या दाढ्यामिशांची होळि करीन. मारुतिनं नुसत्या लंकेलाच आग लावली, पण मी तर सगळ्या जगाला आग लावीन.

**रामेश्वर**—( पाठ थोपटून ) शाबास ! शाबास ! मोठा पाणि-दार शिष्य आहे खरा ! तेव्हां आमची तुला अशी आज्ञा आहे, कीं आज रात्रीं, तुकाराम आपलं कवित्व बुडवायला इंद्रायणीवर जाणार आहे. काय समजलास ?

**तुंबाजी**—समजलों, तुमचा मतलब समजलों. म्हणजे कवित्वाबरोबर, कवित्व करणाऱ्या तुकारामालाहि मारून, ठोकून, इंद्रायणींत बुडवून टाकायचा ! असंचना ?

**मंबाजी**—अरे वः ! तूं तर मोठा धोरणी आहेस ? पण थोडा घसरलास. रात्रिच्या काळोखामधें तुकारामाला तर ठोकायचाच, पण,

त्याच्या बरोबर दुसरं कोणी असलच, तर–त्यालाहि यथेच्छ–हँ–हँ ! ( मारण्याचा आविर्भाव दाखवतो )

**तुंबाजी**––ठीक आहे. तें माझं काम. पांच सहा गुरुबंधु घेतों मदतीला, आणि आज रात्रीं बेलाशक हँ–हँ–हँ ! पण गुरुजी, त्याच्या-बरोबर तुमची रंभा असली तर ? तिलाहि तसंच करायचं ?

**रामेश्वर**—हो, हो, बेलाशक. स्त्रीहत्या म्हणून घाबरूं नकोस. रामानं ताटिकेला, कृष्णानं पुतनेला, परशरामानं आइला सुद्धां मारलंच आहे. झालं तर मग " महाजनोयेन गतः सपंथः "

**मंबाजी**—आणखी मारतांनां धोरण असं ठेवायचं, कीं मार खाणाराची सबब म्हणून ऐकायची नाहीं. यंत्राप्रमाणं, न थांबतां हात चालू ठेवायचा आणि बेलाशक हँ–हँ–हँ.

**तुंबाजी**–त्याची नको काळजी. त्यानं जरी मार खातांना, तुमचं–तुमचंच काय पण शास्त्रिबुवांच्या बापाचं यतिमहारा-जांच्या आज्याचं नांव सांगितलं, तरी सोडणार नाहीं, बेलाशक हँ–हँ–हँ!

**रामे०**—ठीक आहे. खासा बेत जमला. हें तुझं शौर्याचं काम पहायला आम्हीहि जवळपास असूंच म्हणा !

**मंबाजी**—चला तर मग आतां मठांत. शास्त्रिबुवा–आपल्या पंक्तिचा लाभ आम्हांला देतिलच म्हणा ! पण यतिवर्य, आज आप-लाहि प्रसाद आम्हांला मिळाला पाहिजे. आपणहि पुढिला चलायचं.

**संन्याशी**—नारायण ! नारायण ! !

**मंबाजी**—तर मग चला आतां, बापहो;—सन्मार्गानं वागा, मनांत सद्बुद्धि ठेवा, कोणाचा घातपात करूं नका, साधुसंतांविषयीं आदर धरा—

पद–( आम्ही गोंधळि हो गोंधळी, )

**साधू वंदावे वंदावे ॥ कधींहि ना निंदावे ॥**
**साधू शांतीचे सागरू ॥ जाणा मोक्षाचे आगरू ॥**
**अंतर कोमल दीन दयाळ ॥ तैसे केवळ दुर्जन काळ ॥**
**त्यांसि भाव बळानें बाधावें हो ॥ साधू० ॥**

**साधुस्मरणें जळती पापें । त्यांच्या भेणें काळहि कांपे ॥**
**साधू त्रैलोक्या आधार ॥ ऐसा धरोनियां निर्धार ॥**
**ज्याचें स्वहित तयानें साधावें हो ॥ साधू० ॥**
**जो का वैकुंठीचा नाथ । मिरवी हृदयिं साधुची लाथ ॥**
**ऐसे साधु महा बलवंत ॥ सांगे मंबाजी कविसंत ॥**
**याहुनि काय तुम्हांसी बोधावें हो ॥ साधू० ॥**

(सर्व नाचत जातात).

---

## प्रवेश दुसरा. स्थळ–इंद्रायणीतीर.

(तुकाराम अभंगाच्या वह्या डोकीवर घेऊन येतो.)

**तुका०**—हुश्श ! पांडुरंग आणि नामदेव महाराज, यांनीं स्वप्नांत येऊन आज्ञा केली कीं कवित्व कर. केलं कवित्व ! अथवा, कसलं कवित्व—

**कविश्वराचा तो आम्हांसी विटाळ ॥**
**प्रसाद ओंगळ चीवडितों ॥**

आतां ब्राह्मणाच्या मुखानं पुन्हां त्यानं आज्ञा केली, कीं केलेलं कवित्व श्रीकृष्णार्पण कर. तसं करतों. आपल्याला काय ? जय आई गंगे इंद्रायणी, पांडुरंगाला आमची अभंगवाणी अमंगळ वाटली, म्हणून आपल्या पवित्र, आणि निर्मल उदरांत, माझ्या बोबड्या अभंगवाणीला तूं अक्षयींचा ठाव दे. (इंद्रायणींत अभंग सोडतो.) अहाहा ! लाडक्या लेंकराला, ज्याप्रमाणं आई पोटाशीं धरते, त्याप्रमाणं, कोणाची दृष्ट लागूं नये, म्हणून आमच्या कवित्वाला, गंगामाईनं आपल्या पदराखालीं घेऊन घट्ट कवटाळलं. ठीक झालं. पण, आतां करायचं काय ? गपचुप बसलों, तर बायको धंदा करीं म्हणते. बरं, धंदा करून पैसे मिळवले, तर डोळ्यांवर धूर येतो. कीर्तन करावं, तर लोक म्हणतात कांहींतरी भकतो. कवित्व करावं, तर लोक येडबंबू म्हणतात. सारांश, कांहीं केलं तरी यश म्हणून नाहीं ! मग जगा कशाला ? आपला अवतारच संपवा झालं !

तुका म्हणे कांहीं न करावेसें झालें ॥
थकितचि ठेलें चित्त उगें ॥

बस्स. आजपासून गंगातीर, हेंच आमचं वस्तिस्थान. गंगामाइचं निर्मल उदक, हेंच आमचं खाणं पिणं. इथंच आम्ही धरणं घेऊन बसणार.

संसार तो आम्हां सरला सकळ ॥
लोपुनियां काळ ठेला धाकें ॥
तुका म्हणे झालों निर्मल मानसीं ॥
जोडलिया राशी सुखाचिया ॥

पांडुरंग, पांडुरंग, पांडुरंग ! ( डोळे मिटून नामस्मरण करीत बसतो. तोंच मारेकऱ्यांच्या वेषानं तुंबाजी साथिदारांसह लपत छपत येतो. )

**तुंबाजी**—गड्यानों, माणसाची चाहूल ऐकूं येते. बांधा पाहूं आपापल्या कंबरा. हो ! नाहीं तर आपण पडलो ब्राह्मण भाई ! कढि-भात खाई ! ढिलेकासोटे असणार !

**अंबाजी**—अरे जा ढिले] कासोटे कुठपर्यंत ? छातिला कंचर बांधली नाहीं तो पर्यंत. हूँ. चला, व्हा तयार.

**तुंबाजी**—गाठा शिकार. पण फटके अगदीं कसून मारायचे बरंका ! दमावर–दम, दमावर–दम, मारतांना, बापाला बाप म्हणायचं नाहीं, मग तुक्याची पर्वा कोण करतो.

( तुकारामाला कसं मारतात तें बघायला, संन्याशी, रामेश्वर, व मंबाजी वेष पालटून येतात, पण त्यांनाच तुकाराम समजून, मारतात. )

**संन्याशी**—( पाठ चोळीत ) अरे नारायणा ! मेलों ! मेलों ! मेलों ! अरे, मी तो संन्याशी !

**तुंबाजी**—( बेपर्वाइनें ) तर मग हो स्वर्गवासी ! तूंच आम्हांला हवा होतास. ( आणखी मारतात व संन्याशी विव्हळत पडतो. )

**रामेश्वर**—अरे देवारे ! अरे बाबा, मी तो ! अरे मी तो !

**तुंबाजी**—मी कुठं नाहीं म्हणतों, आणि म्हणूनच लगावतों. ( आणखी मारतात व मंबाजी विव्हळत पडतो. )

**मंबाजी**--अग बयाग ! अरे, मेलों ! मेलों ! मेलों ! अरे मी तो मंबाजी ! ( जमिनीवर पडतो. )

**तुंबाजी**—कोण मंबाजी ! वः ते तर आमचे गुरुजी ! ते कशाला मरायला इथं येणार आहेत. छेः तूं मार चुकवण्या करतां खोटं सांगतोस. चलने देव भैया ! लगाव सरवत्ती ! ( मारतात. )

**मंबाजी**—अरे, बजरंगाची शपथ ! मी तो मंबाजी रे बाबा ! अग आइग ! ( विव्हळतो. )

**तुंबाजी**—( मंबाजीच्या तोंडावरचा बुरखा काढून ) कोण ! आमचे मंबाजी गुरुजी ! अरे-अरे-अरे-अरे ! गुरुजी, तुम्हींचि कसे हो सांपडलांत ? अरे-अरे-अरे-अरे ! ( स्वगत ) अशी गुरूची विद्या गुरूलाच फळेल असं आमच्या स्वप्नांतहि नव्हतं !

**मंबाजी**--अरे गुलामा, आम्ही प्राण जाईपर्यंत ओरडून सांगत असतां, आमच्यावरच तुझा हात वाहवला तरी कसा ? आईग !

**तुंबाजी**—पण, तुम्हींच सांगितलं होतंना, कीं तुकाराम मार खातानां आमचीं नाव सांगेल, पण तूं तें ऐकूं नको म्हणून.

**मंबाजी**—अरे पण, मारतांना हात जरा हलका ठेवायचा होतास ! अरे देवारे !

**तुंबाजी**—आतां मारतांना हलका नि भारी कोण पाहत बसतो. त्यांतून तुमचीच आज्ञा होती, कीं मारतानां कसर करूं नकोस म्हणून. मी काय बापडा, आपला आज्ञाधारक शिष्य !

**मंबाजी**—चांगली आज्ञा बजावलीस बाबा ! आमचंच घसरलं तें ! अरे पण, आतां आम्हांला मठांत तरी अगोदर नेऊन पोचीव.

**तुंबाजी**—( स्वगत ) कशाला ? शिव्या खायला ? इथंच बरे आहांत. मरा आतां तडफडून झालं. ( साथिदारांस ) गड्यानों, खोड्याच्या कपाळीं कुऱ्हाडिचा घाव, या न्यायानं गुरुदक्षिणा चांगली फिटली बरंका ! आतां गुरुजी कांहीं यांतून वाचत नाहींत, मठ कांहीं चालत नाहीं. तेव्हां आपण तरी कशाला इथं राहा. चला, मठातलं

सर्व चंबुगवाळं आटपूं, सर्वांनीं तें वाटून घेऊं, मठाला आग लाउन देऊं आणि खुशाल आपआपल्या घरीं चालते होऊं. (पळून जातात.)

**मंबाजी**—(संतापानं) अरे तुंबाजी, अरे अंबाजी, हे सगळेच बेटे निमकहराम! रामेश्वऱ्या, तुझ्यामुळंचरे गुलामा मी या खाडयांत पडलों!

**रामेश्वर**—नाहींरे सोद्या! तुझ्यामुळंच मी असा बोंबलत पडलों!

**संन्यासी**—नाहींरे लुच्च्या, तुझ्यामुळंच मी या गोत्यांत झालों!

(इतक्यांत दिवटी घेऊन पुढं रंभा व तुकारामाचं जेवण घेऊन मागून जिजाई अशीं येतात व तुकारामास शोधतात.)

**रंभा**—(तुकारामास ध्यानस्थ पाहून) मातोश्री, इकडे या, इकडे या. हे पहा तुकाराम महाराज. महाराज, तुम्हांला मातोश्री, जेवण घेऊन आल्या आहेत. (कांहीं बोलत नाहींसें पाहून) अगबाई! यांची समाधि लागलेली दिसते!

**जिजाई**—(तुकारामाला ओढून) चुलींत गेली यांची समाधी! म्हटलं-अगोदर हें आणलेलं गिळा नि मग सावकाश समाधिस्त व्हा.

**मंबाजी**—अग आईग! (विव्हळतो)

**जिजाई**—अग बाईग! (दचकते.) रंभे, कोणग हें रडतं? पहा पहा बरं! भूत बित तर नाहीं? मी माझ्या मंगळाइचा अंगारा पण आणायला विसरलें!

**रंभा**—(दिवटीच्या उजेडांत निरखून पाहून) अगबाई! हे तर आपले मंबाजीबुवा, अरे देवा! देवा! यांना मार बसला आहे वाटतं;

**जिजाई**—(जवळ जाऊन) काय? मंब्याला मार बसला? भली झाली. चांगली खोड मोडली. आतां अस्साच मरूं द्या मेल्याला. मर मेल्या मर. मर मेल्या मर. (मारते.) तूं पुरा मेलास म्हणजे माझ्या मंगळाइला मी सवंध पईची खडिसाखर वाटणार आहें.

**रंभा**—बुवासाहेब, एवढ्या रात्रीं तुम्हाला इथं कुणिंहो गुरुदक्षणा दिली?

**जिजाई**—अहो खुळोबा, तुमच्या मंब्याला मार बसला आहे मार.

**तुका०**—( एकदम उठून ) काय? आमच्या मंबाजिबुवांना मार? कुठं आहेत ते? ( मंबाजीजवळ जाऊन ) बुवासाहेब, कुणिं बरं तुम्हांला मारलं? कुठं लागलं काहो? फार वाईट झालं! आम्ही अभंग बुडवतों किं नाहीं तें पाहण्याकरितां तुम्हिं आलां असाल, नि ती संधि साधून कुणिं तुम्हाला मारलं असेल! माझ्यामुळंच तुम्हाला मार बसला! थांबा हं. मी तुमचे पाय चेपतों! ( पाय चेपूं लागतो. )

**जिजाई**—(तुकारामास मागं ओढून) जळूं या मेल्याचे पाय. जो मांग तुम्हांला रोज शिव्या देतो. गांवांत राहूं देत नाहीं, आज मारायला सुद्धां उठला; त्या मेल्याचे पाय चेपता?

**तुका०**—कां चेपूं नयेत? ते मोठे हरिभक्त आहेत.

**काय सांगूं मी या संतांचे उपकार ॥**
**मज निरंतर वागवीती ॥**
**आपणासारिखे करिती तात्काळ ॥**
**नाहीं काळ वेळ आणि मिती ॥**

**मंबाजी**—( उठून स्वगत ) कांहीं म्हणा, पण या तुकारामाच्या हातांत जादू आहे खास! सबंध आंगाचा ठणका एकदम बंद राहिला किंहो!

**तुका०**—मंबाजीबुवा, तुम्हांला कसं काय वाटतं?

**जिजाई**—त्यांना शेण खावंसं वाटतं. तुम्ही आपले चला घरीं.

**मंबाजी**—काय सांगूं महाराज, आतां नाक वर करून बोलायला तर काय, पण आपली क्षमा मागायलाहि जागा राहिली नाहीं. आपण प्रत्यक्ष भगवंताचे अवतार, गंगाजळाप्रमाणं निर्मळ आहांत, पण मी मात्र अधमाधम, चांडाळ मनुष्य आहें. माझं साधूपण, म्हणजे हलकटपणाची कमाल! आजपर्यंत, मी नकली साधूपणाच्या धुंदींत अंध होतों, पण मी साफ चुकलों. आतां माझे डोळे उघडले. साधूपणा भगव्या वस्त्रांत नाहीं, भस्माच्या राशींत नाहीं, आणि रुद्राक्षांच्या माळांतहि नाहीं. तुकाराम महाराज, आजपासून आपण माझे गुरू झालांत. आपले उपकार मी जन्मजन्मांतरींहि विसरणार नाहीं. मला

क्षमा करा, माझ्यावर दया करा, माझा उद्धार करा, मी शरण आहें, ( तुकारामाचे पाय धरतो. )

**तुका०**---( मंबाजीला उठवतो. ) ' पुंडलीकवरदे हारीविठ्ठल ' उठा उठा, मंबाजीबुवा.

**रामेश्वर**---( विव्हळतो. ) अग आईग !

**जिजाई**---( दचकून ) अग बया ग ! हें कोण आणखीं रडतं ? आज इथं रडायची साथ आली किं काय ? पहा पहाग रंभे !

**रंभा**—( दिवटीनं निरखून पाहून ) अगबाई ! हे तर आपले रामेश्वरशास्त्री !

**तुका०**---( जवळ जाऊन ) अरे, अरे, अरे! शास्त्रिबुवा, तुम्हाला-सुद्धां चोप मिळाला कांहो ?

**रंभा**—कुणींहो एवढ्या रात्रीं तुमची इथं पाद्यपूजा केली ?

**तुका०**—थांबा हं. मी तुमचं आंग रगडतों. ( त्याचे पाय चेपतो )

**जिजाई**—(मागं ओढून) थांबा, थांबा. त्या शारुयाच्या कांयाला मींच चांगलं रगडतें. ( मारायला जाते, तुकाराम तिला आंवरतो. )

**तुका०**—अग, असं करूं नये.

**चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ॥**
**व्याघ्रहि न खाती सर्प तया ॥**

**रामे०**—( उठून स्वगत. ) अहाहा ! साधूपणा याच्याच आंगीं दिसतो, याचा हात अंगावरून फिरतांच, माझ्या सगळ्या वेदना एक-दम बंद झाल्या किं हो !

**तुका०**—बरं, शास्त्रिबुवा, तुम्हाला कसं वाटतं ?

**जिजाई**—त्यांना मस्णांत जावंसं वाटतं. तुम्ही आपले चला घरीं.

**रामे०**—काय सांगूं महाराज, मी अधमानं आजपर्यंत आपल्याला ओळखलं नाहीं, पण आज मला पुरतं कळून चुकलं, कीं पुष्कळ अध्ययनानं ज्ञान येत नाहीं, तर ज्ञानाचं दार उघडण्याची किल्ली ज्ञाना-जवळच आहे. आम्ही शास्त्री, म्हणजे शास्त्रांतले नुसते सिद्धांत तोंडपाठ करून, निष्कारण घटपटावर वाक्पांडित्य करणारे. त्या सिद्धां-

तांचा अनुभव घेतला असेल तर शपथ ! आमचा वेदांत, म्हणजे वाचाळपणाचा सुकाळ ! महाराज, केवळ देवाच्या इच्छेनंच आम्हीं ब्राह्मण झालों, थोडंसं वेदाध्ययनहि केलं, पण अहंकाराच्या स्वाधीन होऊन आम्ही तें सारं गमावलं.

**तुकाराम**—तर मग—

**बरा देवा कुणबी झालों ॥ नातरि दंभें असतों मेलों ॥**
**भलें केलें देवराया ॥ नाचे तुका लागे पायां ॥**

**रामे०**--छे, छे. महाराज, मीच आपले पाय धरतों. ( पायां पडतो. ) मीच महान् अपराधी, मीच महामूर्ख—

**संन्याशी**—( मध्येंच कातावून ) अहो, मी पाहिजे तर तुम्हांला शतमूर्ख म्हणतों! पण तुमची चर्पटपंजरी जरा बंद करा, नि तुकाराम-महाराजांना आमच्याकडे पाहण्याची सवड द्या !

**जिजाई**—हा आणखी मेला कोण घाईला आला ?

**संन्याशी**—अहो, तुकारामबुवा! मी तुमच्या पायां पडतों. तुमचा अमृतकर माझ्याहि अंगावरून फिरवा आणि मला वांचवा हो!

**तुका०**--अरे हो ! मी तुम्हाला विसरलोंच. कोण तुम्ही ?

**रंभा**--( निरखून पाहून ) अहो, हे तर आपले स्वामी ! स्वामी, एवढ्या रात्रीं तुम्हांला इथं कुणींहो पुडि दिली ?

**तुका०**—अरे, अरे, अरे, अरे ! मला क्षमा करा बरं ! स्वामी-महाराज, तुम्हीं विदेहि, मुक्त, नारायणस्वरूप, आणि तुम्हांलाच कसं हो कुणीं ठोकलं ? बरं आहे, ठोकलं तर ठोकलं—

**ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें ॥**
**चित्तीं असूं द्यावें समाधान ॥**

**संन्याशी**—( त्रासून ) मी समाधान मानून असाच पडून राहिलों, तर घटकेनं मरेन हो !

**जिजाई**—आणि मेलास तर काय चंद्राला खळं पडणार आहे ? मरच तूं भिक्कारडया. काय, नाहीं मरत ? थांब तर. मीच तुझा नारळ

फोडतें, म्हणजे तरी तरफडून मरशिल किं नाहीं ? ( डोक्यावर मारूं जाते, तुकाराम आडवतो. )

**तुका०**—आणि जगणार आहे कोण ! जो जन्मला तो मेला, नि मेला तो जन्मला. स्वामिमहाराज, पांडुरंग तुमचं कल्याण करील. ( त्याचे पाय चेपूं लागतो. )

**जिजाई**—त्याचं वाटोळं कां करिना ! लागले त्या मेल्याचं अंग चेपायला ! अहो, तुम्ही सगळ्यांचं अंग रगडून, या ढोंग्यांना जिवंत करण्याचा मक्ता का घेतला आहे ?

**तुका०**—बरं स्वामिमहाराज, आपल्याला कसं काय वाटतं ?

**जिजाई**—त्यांना खाड्यांत निजावंसं वाटतं. तुम्ही आपले चला घरीं. छे बाइ ! आपणच आपलं तोंड इथून काळं करावं. चलग रांडे रंभे. ( जाते. )

**तुका०**—कसं काय स्वामिमहाराज, आपल्या तब्येतिला थोडा तरी आराम आहे कां ?

**संन्याशी**—थोडा कां ? अगदीं साफ बरा झालों. तुकाराम महाराज, आपले गोडवे या माझ्या पापि मुखानं किती गावे ! मी महादुष्ट, नष्ट, पापिष्ट आहें. आजपर्यंत मला वाटे, कीं देहाचं मुंडण केलं म्हणजे मनाचं मुंडण झालंच. पण नाहीं, कोरडं नारायणाचं नांव घेण्यांत संन्यास नाहीं, वरवर भस्माचं लेपन करण्यांत संन्यास नाहीं, आणि नुसतं वरवर मुंडण करण्यांतहि संन्यास नाहीं. तर खरा मोक्षाचा मार्ग आपल्या जवळच आहे महाराज. ( तुकारामाचे पाय धरतो. )

**तुका०**—छेः छेः आमचे पाय सोडा. पाय धरावे, तर त्रिपादानं त्रिभुवन व्यापणाऱ्या पांडुरंगाचेच. इच्छा करावी, तर शुभंकर अशा पांडुरंगाच्याच वरदहस्ताची. दर्शन घ्यावं, तर सुदर्शनधारी पांडुरंगाचंच. बरं, तुम्हां सर्वांना आतां बरं वाटत असेल तर हळुहळु घराकडे चला.

**रामे०**—छेः छेः छेः महाराज, आतां हे आपले पाय सोडून आम्हा कुठंहि जाणार नाहीं. ज्या ठिकाणीं आपण त्या ठिकाणीं आम्हीं.

**तुका०**—पण, आम्हांला कुठं जायचंहि नाहीं, आणि कांहीं करायचंहि नाहीं. कारण यापुढं कवित्व देखिल करायचं नाहीं, अशी तर आपली आज्ञा आहे.

**रामे०**—अहो, जळली आमची आज्ञा. आम्हां पढतमूर्खांचा तो शुद्ध गाढवपणा. आम्हां ढोंग्यांचा तो भयंकर अपराध. भलत्याच अभिमानाला चढून तुमच्या प्रासादिक अभंगवाणीला आम्ही बुडिवलं. अहो ती वाणी नव्हती, तर पंचप्राणांची संजिवनी होती !

**संन्या०**—अमृताचा प्रवाह होता !

**मंबा०**—प्रपंचाची तळमळ दाबून टाकणारी ती शांतिदेवता होती !

**रामे०**—मोक्षाचं कपाट उघडायची गुरुकिल्ली होती, पण आम्हीं मूर्खांनीं ती हरवली, आणि आतां पश्चात्ताप करीत बसलों आहोंत !

**तुका०**—अहो, पण तुम्हीं उगाच वाईट वाटून कां घेतां ? अभंग इंद्रायणीमातेच्या उदरांत सुरक्षित आहेत.

**रामे०**—तर मग इंद्रायणीमातेजवळ ते अभंग परत मागावे.

**तुका०**—पण, माझ्यासारख्या कुणबटाच्या वाणींतून निघालेले अपवित्र अभंग, इंद्रायणीमाता परत कशी बरं देईल ?

**रामे०**—महाराज, असं बोलून आम्हां ढोंग्यांच्या दुःखावर आतां डाग देउं नका. आपण हट्टच घेतलात तर इंद्रायणीमाता आपल्याला काय पाहिजे तें देईल.

**मंबा०**—महाराज, कराच एवढी कृपा.

**तुका०**—बरं आहे, तुम्हां सर्वांची इच्छा आहे तर आमचं काय जातं ? माते इंद्रायणी, करच सर्वांची इच्छा पूर्ण. आइचं अंतःकरण प्रेमळ असतं, म्हणूनच शास्त्रांत—" न मातुः परदैवतम्," असं म्हटलं आहे. तर मातोश्री, पुरीव या लेंकराचा हट्ट. देच तें कवित्व परत. तें या माझ्या संवगड्यांना खेळायला हवं आहे.

**पद**—( नामदेव कीर्तन करी, )

**येई येई सत्वरि माझे माये इंद्रायणी ॥ माझे० ॥**
**आलों लोटांगणीं चरणीं जोडोनी पाणी ॥**

अभंग दे स्वयें येउनी गंगे तूं या क्षणीं ॥ येउनि० ॥
दावुनि अघटित करणी सजवीं बोबडि शिशुवाणी ॥
प्रसंग हा कोण निवारिल तुझ्याविणें स्वामिणी ॥
मनांतली जाचणी कवणा सांगूं गाऱ्हाणीं ॥ चाल ॥
नच अंत आतां पाहीं ॥ बालक लागे जननीपायीं ॥
प्रिय माय लोटुनी देई ॥ तरि मग जावें कवण्या ठायीं ॥
बाळासीं निष्ठुर वागे ॥ ती माय कशाची सांगे ॥
तरि दयाळ माउलि तूं गे ॥
आतां धांवे पावें वेगें गंगे ऐशा निर्वाणीं ॥
आला लोटांगणीं चरणीं बाळ तुका वाणी ॥

( इंद्रायणी, अभंगांच्या कोरड्या वह्या घेऊन प्रत्यक्ष प्रगट होते. )

इंद्रायणी— पद-( श्रीरामचंद्र किरपाल, )

श्रीपांडुरंग-पदभृंग ।
जयजया घेइ तुकया हे अभंग ॥
रविशशि तोंवरि तव यश भूवरि ।
भरवो सज्जनिं नवविधरंग ॥
मंगल वेद तसे हृदयंगम ।
तुझे अभंग अभंग ॥ श्रीपांडुरंग० ॥

तुका०—माते इंद्रायणी, तुला माझा प्रणाम असो.

इंद्रा०—तुकारामा, तुझा विजय असो. पण मला आधीं ओळखलंस का ?

तुका०—त्यांत ओळखायचं काय कठिण आहे ! तुम्ही पांडुरंग महा नाटकी आहांत, हें आम्ही कधींच ओळखून ठेवलं आहे. मातोश्रीच्या रूपानं आज आम्हांला दर्शन द्यायचं होतं, हें आम्हीं केव्हांच जाणलं.

इंद्रा०—तुकारामा, तूं धन्य आहेस. वत्सा, नामदेवानं या भक्तिमंदिराचा पाया घातला, आणि तुकारामा, तूं या भक्तिमंदिरावर कळसच ठेवलास. अहाहा ! तुझी थोरवी मीं किती वर्णन करावी !

तुझं यशोवर्णन त्रिभुवन गाईल. तुझ्या अभंगवाणीचा कधिंहि भंग होणार नाहीं. वत्सा, तुझा जयजयकार असो.

**सर्व०**—तुकाराम महाराजकी जय!. (सर्व जयजयकार करून अभंगांच्या वह्या मोठ्या नम्रतेनं डोकिवर घेतात.)

**रामे०**—महाराज, हें अभंग कवित्व वाजत, गाजत, गांवांत मिरवीत न्यावं, अशी आमची इच्छा आहे.

**तुका०**—जशी तुमची इच्छा. आतां आमची मात्र कोणतीच इच्छा उरली नाहीं. पांडुरंगानं आम्हांला अगदीं निरीच्छ केलं. आतां आम्ही वैकुंठीं जाणार.

**सर्व०**—आणि आम्ही तरी इथं कशाला राहणार? पांडुरंगा, या पाप्यांनाहि आपल्या चरणीं ठाव दे.

**पद**—(जमुनातट राम राम खेले होरी,)

**करुणामयि माय विठाबाई ॥ करुणामयि ॥**
**कंस काल खल। पापि अजामिळ ॥**
**सुगति तयांसि अहा देई ॥ करुणा० ॥**
**ध्रुव केवळ शिशु। गजेंद्र तो पशु ॥**
**त्यास्तव धांव झणीं घेई ॥ करु० ॥**
**अमंगला ती। दासि पिंगला ॥**
**स्वपदिं सदेह तिला नेई ॥ करु० ॥ चाल ॥**
**उदकांतुनि अभंग तारी ॥**
**दासाची लाज निवारी ॥**
**निज संत सुजन कैवारी ॥**
**तुकयाची आई ॥ करुणामयि० ॥**

(अभंगाच्या वह्या डोकीवर घेऊन भजन करीत नाचत जातात.)

---

**प्रवेश तिसरा. स्थळ–तुकारामाचें घर.**

(रिकाम्या घागरी डोकिवर घेऊन जिजाई येते.)

**रंभा**—हं हं आईसाहेब, इतक्यांत नका इंद्रायणीवर जाऊं.

**जिजाई**—नका जाऊं म्हणजे! मग पाणी कोण तुझा बाप आणील?

**रंभा**—माझा बाप कशाला ? मी आणीन.

**जिजाई**—तूं पाणी आणशील ? आणि वाटगे, तुझ्या हातचं पाणी मी पिऊं ? चल नीघ.

**रंभा**—नका पिऊं. पण मी असं म्हणतें, कीं रस्त्यावर फार गर्दी झाली आहे.

**जिजाई**—अग चल. रस्त्यावर होवो, नाहींतर दारांत होवो; ही जिजाई अशी खंबीर आहे, कीं त्या सगळ्या मेल्यानां बाजूला सारून अश्शी पुढं जाईल. ( फलकारा मारते त्यामुळें डोक्यावरची घागर पडून फुटते, म्हणून रंभेला शिव्या देते. )

**रंभा**—ऐका तरी आधीं. अहो, तुकाराम महाराजांच्या साधूपणाचा सर्वांना प्रत्यय आल्यामुळं, लोकांनीं ही त्यांची मिरवणूक काढली आहे हो !

**जिजाई**—होय का ? काय मेले लोक तरी चावट. आमच्या पिशाच्या नादानं सगळ्यानांच पिसं भरलं, कीं त्यांच्या बोकांडिचं भूत, तुमच्या बोकांडिं बसलं ? तुम्हां सगळ्यांचं भूत काढायला, माझ्या-जवळ मंगळाइचा अंगारा पण शिल्लक नाहीं. पण कायग रांडे, असा त्यांच्या साधूपणाचा कोणता ग अनुभव आला ?

**रंभा**—अहो, इंद्रायणींत बुडविलेले महाराजांचे अभंग वर आले.

**जिजाई**—मग टवळे यांत साधूपणा कसला ? मेल्या माणसांनीं जर जीव दिला, तर त्यांचीं मढीं सुद्धां फुगून वर येतात, मग हीं तर कागदाचीं चिटोरींच ! फुगून वर आलीं यांत सटवे नवल तें कसलं ? असल्या खुळसटांना जर साधु म्हणायचं, तर माझ्या अंगांत मंगळाइचं वारं येतं, मग मी कां नाहीं साधू ?

**रंभा**—तुकाराम महाराजांच्या सहवासानं तुमचीहि तशीच योग्यता आहे.

**जिजाई**—खेटराची आली आहे योग्यता ! साधुपणा असा फुकट मिळत नसतो. जे मातीचं सोनं करतात तेच खरे खरे साधु.

**रंभा**—मग, एका बाईनं तुकाराम महाराजांकडून तेल आणवलं, तें म्हणे किति तरी वाढलं !

**जिजाई**—तुझं डोंबल वाटलं ! अग, ती बाईच दोन दिवस फोडणी द्यायला विसरली, तेव्हां आणखी दोन दिवस तेल पुरलं.

**रंभा**—आणखी त्या शेतकऱ्याच्या एवढ्याशा जमिनींत, महाराजांमुळं एका खंडीच्या ठिकाणीं सतरा खंडी धान्य पिकलं तें !

**जिजाई**—तुझं टाळकं पिकलं. अग ते मोजायला चुकले असतील, किंवा मुळिं सुगिचेच ते दिवस असतील. माझ्या बापाच्या कांहीं कांहीं जमिनी अश्शा आहेत, कीं सुगी असली तर हातभर जमिनींत खंडिभर दाणा पिकतो ! आमच्या मुळ्याच्या हाताला जर असं यश असतं, तर आम्हाला कशाला त्याच्या नांवानं रडत बसावं लागतं !

**रंभा**—बरं, तें राहूं द्या. पण जरा पुढं येऊन महाराजांची ही थाटाची मिरवणूक तर पहा.

**जिजाई**—तूंच पहा रांडे रिकामटवळे ! मला अजून शेणपोतेरं करायचं आहे. पण तसं कशाला, तूं देखील चल माझ्याबरोबर पाणी आणायला. चल, घे घागर. ( तिला जबरदस्तीनें घेऊन जाते. )

---

## प्रवेश चौथा. स्थळ—इंद्रायणीतीर.

( तुकारामाची दिंडी भजन करीत व नाचत येते. )

**दिंडिवाले**—पुंडलीकवरदे हरिविठ्ठल ! ज्ञानदेव–तुकाराम–( असं म्हणून नाचतात, तोंच तुकाराम, रामेश्वर, वगैरे भजन करीत येतात. )

**तुका०—रामसीता कृष्णराधा विठ्ठल रखुमाबाई ॥**
**गोपिजनमन मोहन व्यापक हरी सर्वांठायीं ॥**

संतजनहो, माझ्या विनंतीला मान देऊन, आपण आलांत हे माझ्यावर मोठे उपकार झाले. सज्जनहो, मी तुम्हांला खरंच विचारतों, कीं—

**सखेहो सज्जन स्मरा नारायण ॥**
**संगें येतो कोण सत्य सांगा ॥**
**" आमुच्या गांवींचें जरि रत्न गेलें " ॥**
**नाहीं सांगितलें म्हणाल कोणी ॥**

**गांवकरी**—महाराज, आम्ही सर्व आपल्या बरोबर यायला तयार आहोंत, पण जायचं कुठं तें कळतं तर बरं झालं असतं.

**तुका०**—अहो, आम्हीं आज वैकुंठीं जाणार.

**गांव०**—म्हणजे, आपलं नेहमींचंच वैकुंठ ना?

**तुका०**—नव्हे, नव्हे. तुम्हाला इकडे तिकडे कांहींच का दिसत नाहीं. तीं पहा—

**इंद्रायणीवरी उतरलीं विमानें ॥**
**आम्हांपाशीं आले विष्णुदूत ॥**

**गांव०**—( चोंहोकडे पाहून ) पण महाराज, आम्हांला तर कुठेच कांहीं दिसत नाहीं.

**तुका०**—वः सगळं गगनमंडळ तर विष्णुदूतांनीं भरून गेलं आहे. आतां आम्हीं त्यांच्या बरोबर जाणार! कारण—

**मृत्युलोकीं माझें पूर्ण झालें मन ॥**
**गाइलें कीर्तन विठोबाचें ॥**
**माहेरिंचा मज आलासे मुळारी ॥**
**आतां या सुवेळीं जाणें मज ॥**
**बहुकाल माझा केलासे सांभाळ ॥**
**पांडुरंगें मूळ पाठविलें ॥**
**हींच आम्हां भेटी लोभ असों द्यावा ॥**
**पुन्हां मी केशवा न ये येथें ॥**

मग कसं काय? असे भांबावलांत कां? नाहीं येत तुम्हीं आमच्या बरोबर? मर्जी तुमची! कोण आहेरे महादेवा, घरीं जा आणि तुझ्या आईला घेऊन ये पाहूं. ( महादेव जातो. ) सज्जनहो, आमच्या विनंतिचा अव्हेर केलात! घरीं चालत आलेलं वैकुंठपीठ हातानं दवडलंत! अनायासं घडणारं गंगास्नान आळसानं चुकवलंत. बरं असो. आतां शेवटची विनंति ऐका.

**घरचीं दारचीं मज्या पांडुरंगा ॥**
**वडिलांसी सांगा दंडवत ॥**

गंगेच्या हा ओघ सागरीं मिळाला ॥
नाहीं मागें आला कदाकाळीं ॥
ऐशिया शब्दाचा बरी करा सोय ॥
गेला तुका नये मागुता तो ॥

( शेणाची टोपली आणि खराटा घेऊन जिजाई येते. ) आलांत ? या.

**जिजाई**--हो आलें. काय काम आहे तें लवकर सांगा. मी कांहीं तुमच्यासारखी रिकामटेकडी नाहीं. मला अजून म्हशिचा गोठा साफ करायचा आहे.

**तुका०**—आजपर्यंत घाण उपशीत आलीस, तरी हौस फिटली नाहीं ? नरकांतला किडा नरकांतच मरायचा ! तरी पण, ज्या अर्थी आम्ही तुमचा हात धरला आहे, त्या अर्थी तुमचा उद्धार आम्हांला केलाच पाहिजे.

**जिजाई**—कांहीं नको माझा उद्धार करायला. मीच हवी तर तुमचा उद्धार करतें.

**तुका०**—आमचा उद्धार आजपर्यंत तूं नित्य नियमानं आणि दक्षतेनं केलाच आहेस, त्याबद्दल आम्ही तुझे आभारी आहोंत. पण आतां आमचं थोडं ऐक. आतां आम्ही वैकुंठिं जातों आहोंत, तर आमच्या बरोबर यायची इच्छा असल्यास आमचा हात धरून चल कशी. ( हात धरतो. )

**जिजाई**—( हात झिडकारून ) चल कशी ! मला नको तें वैकुंठ नि फैकुंठ. घरदार, गुरं ढोरं, सोडा नि यांच्याबरोबर भीक मागत फिरा ! मला नाहीं जरूर. म्हणे वैकुंठपीठ ! आहे काय तिथं ? धोंडे. मेलं नांव मात्र मोठं आणि लक्षण खोटं. म्हणे वैकुंठपेठ ! पण चणे-कुरमुऱ्यांचं दुकान तिथं मिळायची पंचाईत.

**तुका०**—खरं आहे. हें घोड्याचं खाणं आमच्या वैकुंठिं कुठून मिळणार ? तिथं म्हणजे जागोजाग अमृतानं भरलेलीं कुंडं असणार ! अमृत प्यावं आणि दिवसभर हरिनामाचा गजर करावा, हें तिथं काम. म्हणून म्हणतों वैकुंठीं चल. हें पहा, नेहमींप्रमाणंच

आज आम्ही वैकुंठिं जातों, असा जर तुमचा समज असेल तर तो चुकीचा आहे. पांडुरंगाचे चरण स्मरून सांगतों, कीं आज आम्ही खरोखरच वैकुंठिं जाणार ! मागाहून पश्चात्ताप होऊं नये म्हणून तुला वरचेवर बजावून सांगतों ! योगी, जपी, तपी, संन्याशी, यांनां दुर्मिळ अशी संधि तुझ्या सुदैवानं आली आहे, ती मूर्खपणानं दवडूं नकोस. क्षणिक मायामोहाला भुलूं नकोस. हीं पोरंबाळं आपलीं नव्हत.

**जिजाई**—आपलीं नव्हत ! तर काय लोकांचीं मागून आणलीं आहेत ?

**तुका०**—उघडच आहे. तुला नाहींका आम्ही मागून आणली आहे, मग तूं आपल्या आईबापांची कितपत राहिली आहेस ? तर आतां तुझ्या मुली तुझ्या सारख्या होणार आहेत. अग, मुली या नव-यांच्याच. त्याच प्रमाणं मुलांची गोष्ट. ते एकदां आपल्या बायकांचे झाले, म्हणजे तुझे हाल कुत्रा सुद्धां खाणार नाहीं ! म्हणून म्हणतों—

**नको धरूं आस व्हावें या बाळांस ॥**
**निर्माण तें त्यांस त्यांचें आहे ॥**
**आपुला तो गळा घेई सोडवोनी ॥**
**चुकवी जाचणी गर्भ वास ॥**

**जिजाई**—सगळ्यांनींच आपले असे गळे सोडवून घेतले, म्हणजे त्या अज्ञान लेंकरांनीं आणि मुक्या जनावरांनीं करायचं काय ?

**तुका०**—तें आम्हीं सांगतों—

**म्हणे मेलीं गुरें भांडीं नेलीं चोरें ॥**
**नाहींत लेंकुरें झालीं मज ॥**

अशी आपल्या मनाची समजूत करावी म्हणजे झालं.

**जिजाई**—( वेडाऊन ) म्हणजे झालं. जळलं तुमचं ब्रह्मज्ञान. माझं नाहीं असलं कठोर मन. माझी म्हैस व्यायला झाली आहे तिची काय वाट ?

**तुका०**—तिची वाट मी सांगतों—

**द्विजा पाचारोनी शुद्ध करीं मन ॥**
**देईंवो हें दान यथाविध ॥**

**जिजाई**—आणखी मला पांच महिने लोटले आहेत ते ? का तो गर्भहि दान करायला सांगता ?

**तुका०**—तो गर्भ घे आपल्याबरोबर. त्या पुण्य पुरुषाच्या योगानं तुला वैकुंठी जातांना—

**संतमहंत सिद्ध येतिल सामोरे ॥**
**सर्व सुखा पुरे कोड तेथें ॥**

**जिजाई**—ते संतमहंत माझ्या मंगळाइला बळी द्या. त्यांच्यानं का माझं बाळंतपण निस्तरलं जाणार आहे ? उनाडटप्पू मेले !

**तुकाराम**—पण तुझं बाळंतपण करायला वैकुंठीं लक्ष्मी मातुश्री आहेना ?

**जिजाई**—हो–हो ! जिचं पाऊल घटकाभर देखिल एके ठिकाणीं ठरत नाहीं, ती भटकभवानी लक्ष्मी माझं बाळंतपण केव्हां करणार ? अहो ती तर सगळ्या मुलखाची चवचाल !

**तुकाराम**—बरं, भगवति पार्वतीला आम्ही बोलावूं तुझं बाळंतपण करायला, मग तर झालं.

**जिजाई**—कोण, कोण ? त्या म्हाद्याची पार्वती का ? ती तर सगळ्या मुलखाची वांझ ! ती वांझोटी माझं बाळंतपण कसं करणार आणि तिला त्यांत काय कळणार ? अहो, तिला पोर होइना म्हणून तिनं एक गणोबा केला मळाचा. बरं, तो तरि धडाना–गोडाचा ? त्याचं तोंड काय, सोंड काय, कान काय, पोट काय, साराच मेल्याचा अवतार ! ढेरपोट्या मेला ! दुसरा सहातोंड्या कार्तिक्या, तो तर भीक मागूनच आणलेला !

**तुका०**—बरं राहिलं. तुझी इच्छा असेल तर देवि सावित्री येऊन तुझं बाळंतपण करील.

**जिजाई**—वा ! काय पण सुइणिवर सुइणी शोधून काढताहेत ! अहो, त्या सावित्रीला तर मुळिं गर्भार राह्यचाच कंटाळा. तिचा नवरा ब्रह्मदेवच गर्भार राहून आंडीं घालतो म्हणे ! जें जें ऐकावं तें तें मेलं अघटितच !

**तुका०**—तर मग आमच्या कृष्णसख्याच्या सोळाहजार एकशें आठ बायका आहेत, त्यांतून कोणती ती सुइंग पसंत कर.

**जिजाई**—मसणांत गेल्या त्या सुइणी. मला कोणी नकोत. माझी आपली मंगळाइच कुणाच्या रूपानं येऊन, माझा सुईणपणा करील. पण इतकं हवं कशाला, त्या वैकुंठिं कां फैकुंठिं कां मसणांत मला मुळिं यायचंच नाहीं. तुम्हींच जा कुठं जायचं असेल तिकडे.

**तुका०**—ऐकाहो, ऐका. आपण सर्वांनीं ऐकलंच आहे, कीं आमच्या कुटुंबानं आम्हाला वैकुंठिं जाण्याची परवानगी दिली. ठीक आहे. आतां तुम्ही आमचं शेवटचं सांगणं ऐका. तुमच्या उदरीं आमचा कुलदीपक आहे. त्याचं नांव नारायण ठेवा. तेंच आमचं अर्धपुण्य होय. तरी पण तितक्यानंच तुमचा कांहीं उद्धार व्हायचा नाहीं. त्याला थोडिबहुत तरी स्वतःची कमाई लागते. ( आपल्या गळयांतली तुळशीची माळ तिच्या गळ्यांत घालतो. ) आणि ती मिळवायला साधनं हींच.—

**होई बळकट घालोनियां कांस ॥**
**हाच उपदेश तुज आतां ॥**
**सडा सम्मार्जन तुळशी वृंदावन ॥**
**देवाचें पूजन करित जावें ॥**
**वैष्णवांची दासी होई सर्व भावें ॥**
**मुखिं नाम घ्यावें विठोबाचें ॥**
**तुझिये गर्भीं आहे नारायण ॥**
**तो तुजलागोन उद्धरील ॥**

**जिजाई**—उद्धरील, नाहीं तर नर्कांत ढकलील तें पाहीन मी. मला अगोदर म्हशिचा गोठा साफ करूं द्या. ( जाते. )

**तुका०**—चला. संतजनहो,—

**उठा सकळीक भेटूं तुम्हीं आम्ही ॥**
**लक्ष लावा नामीं विठोबाच्या ॥**
**लहान थोर सारे आशिर्वाद घ्यारे ॥**

बोळवीत यारे इंद्रायणी ॥
येथुनी आमुचा खुंटलासे मार्ग ॥
तुम्हीं कृपालोभ असूं द्यावा ॥

( सर्वजण तुकारामाच्या पायां पडून भेटतात. )

गांव०—महाराज, आज आपण हें भलभलतं काय बोलतां ?

तुका०—अहो, भलभलतं नव्हे. खरंच आहे तें.—

बैसा आतां आमुचा रामराम घ्यावा ॥
आम्ही गेलों देवा शरणागत ॥
शरणागत जातां ब्रह्म झाली काया ॥
गेल्या नासोनियां पापराशी ॥
लागोनियां पायां विनवितों तुम्हाला ॥
करीं टाळी बोला मुखें नाम ॥
विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळां ॥
हा सुखसोहाळा कुठें नाहीं ॥
ज्ञानाचा अभिमान सोडा ह्मणे तुका ॥
तरी जोडा सखा पांडुरंग ॥

म्हणा—“ पुंडलीकवरदे हरिविठ्ठल ” ( गजर करतात, नंतर तुकाराम “ ज्ञानदेव ” व इतर लोक ‘ तुकाराम ’ असें म्हणून नाचतात. त्या भरांत विमान येतें तें फक्त तुकारामास दिसतें व तुकाराम तिकडे जाऊं लागतो. )

गांव०—अहो महाराज, हें काय ? तुम्ही चाललांत कोणीकडे ?

तुका०—आम्हीं जातों आपुल्या गांवा ॥
आमुचा रामराम घ्यावा ॥
तुमची आमुची हाचि भेटी ॥
येथुनियां जन्म तुटी ॥
आतां असों द्यावी दया ॥
तुमच्या लागतसें पायां ॥

येतां निजधामीं कोणी ॥
विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ॥
रामकृष्ण मुखीं बोला ॥
तुका जातो वैकुंठाला ॥

संत जनहो, आपल्याला मी शेवटची विनंति करतों, कीं परमेश्वरावर भाव ठेवा. त्याची अनन्यभावानं भक्ति करा, धर्मानं चाला, न्याय नीतिनं वागा, परोपकाराचं व्रत राखा, आपपरबुद्धि दूर ठेवा, भेदाभेद सोडून द्या, म्हणजे तुमचाहि उद्धार होऊन तुम्ही याच मार्गानं चाल. 'नर करनी करे तो नरका नारायन होय' या सत्पुरुषाच्या वाक्यावर विश्वास ठेवा. असो; आतां आमची वेळ भरली. हं. करा एकदां शेवटचा जयजयकार—' पुंडलीकवरदे हरिविठ्ठल ' (विमान खालीं येत असतां घंटारव होतो, तो ऐकून )—

विमानाचे घोष वाजती असंख्य ।
सुरू झाला डंका वैकुंठींचा ॥
शब्दांचा विश्वास झाली आठवण ।
करा बोळवण सज्जनहो ॥
आले विष्णु-दूत तेचि प्रेममूर्ति ।
अवसान हातीं सांपडलें ॥
वाढवेळ झाला उभा पांडुरंग ।
वैकुंठीं श्रीरंग बोलावितो ॥
अंतकाळीं विठो आम्हांसी पावला ।
कुडीसहित झाला तुका गुप्त ॥

म्हणा—'पुंडलीकवरदे हरिविठ्ठल' ( ज्ञानदेव—तुकाराम असें म्हणून सर्व नाचतात व तुकाराम विमानांत बसून गुप्त होतो. )

---

## प्रवेश ५ वा. स्थळ—वैकुंठभुवन.

( श्रीलक्ष्मी—नारायण बसले असून व नारद, तुंबर, सनक, सनंदन, गरुड, हनुमान् इत्यादि हात जोडून उभे आहेत; तोंच तुकारामाला विमानातून दूत आणतात. )

**श्रीविष्णु**—प्रियभक्ता तुकारामा, तुझं स्वागत असो.

**तुकाराम**—( साष्टांग प्रणिपात करून ) भगवन्, आपणाला माझे शतशः प्रणाम असोत.

**श्रीविष्णु**—तुकारामा, योगी, जपी, तपी यांनांहि दुर्लभ, असं हें वैकुंठभुवन केवळ तूं आपल्या निष्काम भक्तीनं मिळवलंस, त्या तुझी थोरवी काय वर्णन करावी ! वत्सा, मी तुझ्यावर सुप्रसन्न आहें, इच्छा असेल तें मागून घे.

**तुकाराम**—भगवंतांनीं मला जन्मतःच निरिच्छ उत्पन्न केला, त्या माझी आतां आणखी काय इच्छा असणार? तशांतून, या दिव्य वैकुंठभुवनांत माझा प्रवेश झाला, आदिमाता श्रीलक्ष्मीदेवीसह, नारायणाच्या श्यामसुंदर मूर्तीचं, आणि या तेहतीस कोटी देवतांचं दर्शन झालं, यापेक्षां माझी इच्छा पूर्ण होण्याची ती काय उरली ? तथापि, कृपा करण्याची इच्छा असल्यास, मृत्युभुवनांतील सर्व प्राणिमात्रांच्या उद्धाराचा कांहीं सुलभ मार्ग सुचवावा एवढंच या दासांचं मागणं आहे.

**श्रीविष्णु**—वत्सा तुकारामा, केवळ पतितजनांच्या उद्धाराची तुझी लालसा किती तरी प्रबल आहे! धन्य धन्य आहेस तूं. ही तुझी निष्काम प्रेमभक्ति चतुर्दशभुवनांत "यावचंद्र दिवाकरौ" गाजत राहील. तुझे अभंग सर्वतोमुखीं होऊन ते अभंग राहतील. जे कोणी तुझे अभंग आवडीनं गातील, ते माझे प्रियसखे बनून माझी समीपता मिळवतीलच; पण, जे कोणी तुझ्या अभंगाचा एखादा चरण, सहज किंवा दुष्टबुद्धिनं उच्चारतील, त्यांचा सुद्धां उद्धार होऊन ते तुजप्रमाणेंच वैकुंठपदाला पोंचतील. ( सर्व देव व अप्सरा "तुकाराम महाराज की जय" अशी गर्जना करून जयजयकार करतात. ) तुकारामा, हे पहा. इंद्रादिक सर्व देव आणि अप्सरा, तुझं स्वागत करण्याकरितां येत आहेत. )

**देव आणि अप्सरा**—( "तुकाराम महाराजकी जय" अशी गर्जना करीत येतात. )

पद—( शांतीकर कृपालु हे, )

आनंदाचा कंद हरि हा देवकि नंदन पाहिला ॥
भक्तासाठीं। ठेउनि कर कटिं। भीमानिकटीं राहिला ॥
कंसभयानें। वसुदेवानें। नंद-यशोदे वाहिला ॥
यज्ञ-याग जप-तपासि न भुले। ध्यानधारणे ना कळे ॥
निश्चल साचा। परि तुकयाच्या। भक्तिगुणासीं मोहिला ॥

(देव हात जोडून उभे राहतात, चिपळ्या वाजवून अप्सरा नाचतात.)

**श्रीविष्णु**—तुकारामा! आतां तूं स्वतःकरितां कांहीं मागणं माग. मी देण्यास सिद्ध आहें.

**तुका०**— पद—( देखा नहि कछु सार, )

देवा करुणनिधान। माधवा द्यावें हें वरदान ॥
घडिभरिही तव विसर न पाडीं तोडिं सकल अज्ञान ॥
गोड तुझ्या गुणगायनिं आवड जोड असो ही छान ॥
माधवा द्यावें हें० ॥

धन मुक्ति संपदा नलगे। दे संत संग अनुरागें ॥
मग गर्भवासिं वेगें। तूं घालिं सुखें हा प्राण ॥
माधवा द्यावें हें० ॥

नरसिमेहता निवृत्ति मुक्ता ज्ञानदेव सोपान ॥
जनीं नामया एका तुकया नामामृत नित पान ॥
माधवा द्यावें हें० ॥

समाप्त.